IRBK-0100261

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र २६१

IRBK-0100261

दा.म.२६७

२६७

# प्रस्तावना.

प्रस्तुत नाटकाचा विषय प्रतिलोमविवाह हा आहे; व यामुळ त्यास वधूपरीक्षा नाटकाची पुरवणी समजण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचें नाटक सुखपर्यवसायि असल्यास त्याचा इष्ट तो परिणाम होणार नाहीं असें वाटल्यावरून हें नाटक दुःखपर्यंवसायि केलें आहे. या नाटकाचा मिश्रविवाहाविषयीं सहानुभूति उत्पन्न करण्याचे कामीं थोडा जरी उपयोग झाला तरी त्याचें मनन वायां गेलें नाहीं असें मी समजेन.

वधूपरीक्षा नाटकाच्या लेखनप्रसंगीं त्यानंतर कधींहि कुणबी भाषेशीं प्रसंग पडणार नाहीं अशी आशा होती; पण हें नाटक लिहितांना ती निराधार ठरली. तथापि या प्रसंगीं रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर व रा. रा. रघुनाथ कृष्ण पिंपळखरे या सद्गृहस्थांनीं ती भाषा हुबेहुब वठविण्याचे कामीं मला बिनमोल मदत करून त्यांतून सुखरूप बाहेर काढिलें, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे.

या नाटकाचें गद्य चालू सालाच्या मे महिन्यांत व पद्य ज् महिन्यांत लिहून तयार झालें. त्यानंतर लवकरच हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे; व हें प्रयोगरूपानें रसि आणण्याचाहि योग लवकरच येईल अशी आशा आहे या काचा नायक ज्याप्रमाणें त्याच्या जन्मानंतर लवक मातापितरांनीं एका दयाळू गृहस्थाच्या पदरांत घात याचा लेखकहि हें याच्या लेखनानंतर थोड्याच

दयाळू वाचकांच्या स्वाधीन करीत आहे. त्या गृहस्थानें नायकाचें जितक्या ममतेनें संगोपन केलें तितक्योच ममतेनें वाचकांनीं या अर्भकाचें संगोपन करावें अशी लेखकाची त्यांस नम्र विनंति आहे. पुष्कळदां पक्षपात रसाच्या माधुर्यापेक्षां रसिकांच्या औदार्यावरच अवलंबून असतो, असा माझ्या नाटकांसंबंधानें मला आजपर्यंत अनुभव आला आहे. तो अनुभव या नाटकासंबंधानेंहि खरा ठरेल असा माझा दृढ विश्वास आहे.

खामगांव,
ता. १७ माहे आगस्ट सन १९१८.

श्री. कृ. कोल्हटकर.

---

IRBK-0100261

॥ श्री ॥

संगीत

# जन्मरहस्य नाटक.

## ईशस्तवन.

[ चाल—देखि ऐसि प्यारी० ]

प्रभुपदिं नति सविनय करित धरित प्रलयसमयिं
ज्यासि ईश निज सुखिं न गणुनि दोप त्यांत ॥ध्रु०॥
विशद सुगम करि सहज नियम कृतिनें निज भजक-
पंक्तिसी। उचितचि अंत्यजभूसुरसुगाढसंगम जरी
घडुनि येत ॥ १ ॥

# अंक पहिला.

——:o:——

## प्रवेश १ ला.

[ दशरथ व कौसल्या. ]

दश०:—द्येवा, समदी पिरतिमी धुंडली, पन आमच पाडास गवासल न्हाई. समद्या बाजून वनवा प्येटल्याला, आन् तवा त्येला सोडूनशेनी आमी प्वोटामाग ग्येलु, त्येच्या पायी तर तूं रागेजला न्हाईस? द्येवा, त्येला आनूनशेनी आमास्नी येकदा दाव. आन् मंग ह्यो परान ग्येला तर म्येअत्तर! त्यो आमास्नी दिसायचा नसल तर असल तत त्येला सुक्शेम ठ्येव, इत्काच तुज्याजवळ हात जोडूनशेनी मागन हाय.

कौस०:—द्येवा, माज्या सोनुल्याच त्वांड पगायापायी ह्ये पायाची अक्षी चाळन क्येली. त्येच हसन पगाया गवसना म्हून ह्ये डोळ्याच पानी रातंदीस खळना. त्येच दरसन जाल मंजी तीच माजी काशीवारानशी. न्यारी काशीयात्रा कराया नग. द्येवा, त्येच दरसन व्हनार नसल तर तूच दरसन द्ये, आन् आमास्नी पायाप घ्येऊनशेनी जा.

दशरथ:—ह्यो वाडा दिसतुया लई मोटा. नानासाव द्येसपांड्याचाची असल. वाइच उगी न्हा. मी पुकारतु. ( मोठ्यानें ) अव नानासाव द्येसपांड, नानासाव!

कल्याण ( प्रवेश करून ):—काय शिंची पीडा पहा! भिकारी ते भिकारी, आणि ऐट आणिली आहे सरदाराची! कायरे, तुम्हांला भिकेला कांहीं काळवेळ सुद्धां लागत नाहीं ना? आणि येवढ्यानें शंख करायला काय झालें? नानासाहेबांची झोंप मोडेल ना!

कौस०:—त्येंचीच तर आमास्नी भ्येट व्होवी.

कल्या०:—नानासाहेब असे वाटेवर पडले आहेत वाटतें वाटेल त्या भिकारड्यानें त्यांची भेट घ्यायला? ते तुमचें कांहीं देणें लागतात वाटतें?

कौस०:—व्हय व्हय! आमच ध्येनच हाय त्येंच्याकड.

कल्या०:—शिव्यांशिवाय दुसरें कोणतें घेणें असेलसें दिसत नाहीं मला.

दश०:—दिवानजी, तिच्याकड काय ध्येन द्येता?

कल्या०:—(एकीकडे) दिवाणजी! हां, हा दिसतो आहे कांहींसा बोलण्यासारखा माणूस. (उघड) काय बाबा म्हणतोस?

दश०:—या वाड्यामंदी कोनी कुनब्याचा प्वार हाय?

कल्या०:—येथें नाहीं कोणी कुणबटाचा पोरगा, आणि आम्हांला कोणा कुणबटाला कामाला ठेवायचेंहि नाहीं.

कौस०:—अर द्येवा! (खालीं बसते.)

दश०:—(कौसल्येच्या कानांत) कारबारनी, अस करून कस चालल? मन वाईच घट कराया व्होव.

कल्या०:—असें हवालदिल व्हायला काय झालें! जगांत आमचेंच एक घर आहे वाटतें नोकरी धरायला? आम्हींहि तुम्हांला कामावर ठेवलें असतें. पण घरांत माणसें इनमीन साडेतीन सुद्धां नाहींत. फक्त नानासाहेब आणि बाळासाहेब.

दश०:—(कौसल्येच्या कानांत) तुज बाळ जित हाय, कारबारनी. आन् हायबी हतच. ऊट. (कौसल्येला उठवितो.)

कौस०:—(दशरथास एकीकडे) ही आस लटकी त व्हनार न्हाईना?

दश०:—(तिला एकीकडे) माज्यावरबी इस्वास न्हाई तुजा! (कल्याणास) दिवानजी, आपुन ज्ये म्हंतल त्येच नानासायांच्या त्वांडामन्न ऐकिल म्हंजी चाललुच आमी.

कल्या०:—म्हणजे माझ्याहून कांहीं निराळें सांगणार आहेत वाटतें ते? माझी या घरांत किती सत्ता आहे हें तुला माहीत नाहीं म्हणून तूं असें म्हणतोस. घरांतला सगळा खर्च माझ्या हातूनच व्हायचा; पाहुण्यारावळ्यांची सारी व्यवस्था माझ्याकडेच असायची; नानासाहेब बाहेर गांवीं गेले तर घर माझ्या स्वाधीन करूनच जायचे; त्यांच्या खालून सगळ्या नोकरांवर माझीच हुकमत आहे. फार काय, पण (हलक्या आवाजांत)

प्रसंगीं नानासाहेबांचा सुद्धां कान धरायचा मला अधिकार आहे. ( उद्धपराव येऊन कल्याणाचा कान धरितात. )

उद्धव०:—कोणाचा कान धरणार तूं ? कानाप्रमाणें जीभ सुद्धां लांबवूं लागलास फार ? बाहेर हो जरा. मला यांच्याशीं एकांतांत बोलायचें आहे.

कल्या०:—नानासाहेब, मी इतक्या वर्षांचा नोकर; आणि मला बाहेर जायला सांगून या नवख्यांशीं कानगोष्टी करणार ? लोक काय म्हणतील ?

उद्धव०:—तुझ्याशीं कानगोष्ट केली ती पुरे नाहीं झाली वाटतें ? हं, एक ब्र न काढतां चालता हो येथून. ( कल्याण पुटपुटत जातो.) जुना नोकर पडला म्हणून कधीं कधीं अशी गय करावी लागते. काय बोवा, तुमचें काय काम आहे माझ्याशीं ?

दश०:—नानासाव, गरीबाची वळखबी इसारला ? पन त्येबी व्येसच्च हाय म्हना. गाट पडल्या धाईस वरस जाली, मंग कोन न्हाई इसरनार ?

उद्धव०:—( एकीकडे ) मी ज्या कर्माला भीत होतों तेंच पुढें उभें राहिलेलें दिसतें. पण अशा महत्त्वाच्या बाबींत अशी घाई उपयोगी नाहीं. कदाचित् 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' या न्यायानें माझा समज चुकीचाहि असेल. ( उघड ) मीं तुह्मांला पूर्वी कधीं पाहिलें आहे म्हणतां ?

दश०:—पंडरपुरच्या जत्रच्या वक्ती आमी आपल्याप आमच परान हवाली क्येल व्हत, त्ये ध्येनामंदी न्हाई म्हंता ?

कौस०:—घेवा, दुनियत इमान न्हायल न्हाई, इत्तच म्हनाया होव.

उद्ध०:—बाई, अशा उतावळ्या कां होतां ? तुह्मीं खरेंच आपलें डबोलें माझ्या स्वाधीन करून ठेविलें असेल तर मीं तें पूर्ण चौकशी केल्यावांचून कोणाहि इसमाच्या स्वाधीन करूं नये अशीच तुमची इच्छा असली पाहिजे ना ?

दश०:—नानासाव, आपुन ठीक बोलला.

उद्ध०:—मग सांगा तर आपली सारी हकीकत.

दश०:—नानासाब, त्ये काळाच वरीस व्हत. समदा मुलूक वैरान पल्डा व्हता. ढोरास्नी योक दानाबी गवसत न्हवता; पान्याबिगर अक्षी परान टाकीत व्हती. असल्या कटिन वक्ती आमा गरीबांचा काय निबाव

लागनार, नानासाब ? आमी आमच्या रगूला संग घ्येतल, आन् घरा-दारावर तुळशीपतार ठ्येवूनश्येनी वनवन करीत भटकाया लागलु. समदा दिस फिराव तवा कुट येक भाकूर पदरामंदी पडावी. कंदी कंदी ती बी न्हाई. हाडाची काड जाली. कंटामंदी परान आल. पन आमी प्वोराच्या त्वांडाकड पगुनशेनी खुशाल व्हतो. म्होर त्येबी पन सुकाया लागल. आमच्या ग्वाड सबदावर त्येच प्वाट कस भरनार ? तवा मातर मंग द्येवाला करुना आली, आन् आपल दरसन घडल बगा. आपुन बी आमास्नी पदरामंदी घ्येतल, आन् प्वोराला—आमच्या रगूला—प्वोसायच हूं म्हंतल. त्येला आपल्या वटीमंदी टाकल, आन् तवा कारभारनीन जो अकांत क्येला त्यो पुसाय नग. तिन रगूस्नी फिरून फिरूनशानी प्वोटाशी काय धरल, त्येच पटापट मुक काय घ्येतल, त्येच्या संग हसली काय आन् रडली काय ! समदा योकच गोंधुळ !

कौस०:—अर माज्या रगू, कुटर भ्येटशील ?

दश०:—जवा त्येला आपल्या वटीत टाकला आन त्येनं आमच्या-कड डोळ लावल, तवा इन तडातडा आपल क्यास काय उपाटल, ऊर काय पिटल, आन ' अर माज्या सोनुल्या ' म्हून हंबरडा काय फ्वोडला ! मी पुरुसावानी पुरुस, पन पगा नानासाब, माज्याबी डोळ्यास्नी पानी आल. पन करायच कस ? आमच काईबी होउ, त्येकराच परान कसबी करून बचवाया व्होवच व्हत.

उद्धव०:—तुमच्या रघूला किती दिवसांनीं परत घेऊन जाण्याचा तुमचा विचार होता ?

दश०:—मनुक्ष करतुया ब्येत लाक, पन त्ये पार पडाया व्होवना ! आमी त्येला घ्येऊनशेनी जानार व्हतो यका वरसात; पन आमास्नी गाटल येका दलालान. म्हंगाला तुमास्नी द्येतो येक चाकरी. आन् जे आमास्नी उचालल त्ये फ्येकल समिंदरापल्याड येका ब्येटामंदी.

कौस०:—मेल्याच निसंतान व्हईल, आन् त्येला किड पडुपडू कुत्र्या-च्या मोतीन मरल.

दश०:—आमी ज्या ब्येटांत ग्येलो व्हतो तत मळवाल्यानी आमास्नी ढोरापुनबी वंगाळ ठ्येवल. प्वाटभर भाकुर आन अंगभर कांबरूनबी दिल

न्हाई. वाइच तब्येत बिगाडली मंजी वढलच कोरड आमच्या पाटाडावरं! अस्स अस्स हाल की परानबी जायच. पन जीव गुतला ल्येकरामंदी, म्हूनच वाचलो बगा. नानासाब, तकड आमची अटरा वरस ग्येली; पन समद डोळ रगूकड. माजा रगू काय करतुया, काय बोलतुया, काय खातुया, शेतामंदी हाय का घरामंदी हाय, घनी त्येला बर बगतु का वंगाळ बगतु, सतंदी अक्षी ह्येच इचार. झोपमंदी सपनामंदी रगू येई, मांडीवर बस आन् गळ्याला मिटी मारी, आन् मोट्यानं वरड, 'आई, बाबा, तुमी मला कंदी भ्येटनार! तुमाबिगर जिव अक्षी हैरान जालाया!' आखरीला योक द्येवमनुक्ष आला. त्येन लई खटपाट क्येली तवा पुना घर दिसल.

कौस०:—द्येवा, त्येला उदांड औक्ष द्ये. आन् संततसंपतबी मायंदाळी द्ये.

उद्धव०:—बाई,

[ चाल—आज अकेलि चैन० ]

त्या काय महती गमे संततीची। जगती अखिल मानि
कन्योपमाची ॥ ध्रु० ॥ त्या थोरवी का विपुल संपदेची।
दीनार्थ जो स्वार्थ मुक्तकर वेंची ॥ १ ॥

दश०:—परतम य्येतवाडी कबज्यामंदी ग्येतली, आन् तडक पंढरपुर गाटल. पन तत आपला पत्या गवसना.

उद्धव०:—पण मीं तुम्हांला आपला पत्ता कागदावर लिहून दिला होता ना?

दश०:—त्यो कागुद मळवाल्यान छिनून घ्येतला. आमी हकड येन्याच्या वक्ती त्येच्या हातापाया पडलु आन् त्येला लई इनवल बगा; पन त्येला कसली दया येतिया! त्येन त्या कागदाचा चुट्टा करूनशानी कंदीच फुकलाबी असल.

उद्धव०:—अरे अरे! तुम्हांला माझा शोध लावण्याकरितां फारच श्रम पडले असतील नाहीं?

दश०:—योक वरीस बगा अक्षी धुंडाळतुया आपनास्नी. गावाच नांव गवसना. पन त्ये कसनस पुर हाय आन् मोटबी हाय, इत्त मातुर ध्यनामंदी. त्येन सुताला सुत गाठुनशेनी कोलापुर, सोलापुर, इजापुर-

तुळजापुर, नागपुर, बऱ्हानपुर, इलिचपुर, बाळापुर संमदी पुर पालथी घातली नगा, आन ततल संमद नानासाव देसपांडवी उलथपालथ क्येल. आखरीला ह्ये जबलपुरला आलु, आन् आज मातुर समद्या कष्टाच पारन फिटल.

कौस०:—आज तुळजापुरची भवानी पावली! आज कोलापुरची अंबाबाई पावली! नानासाव, दावा माज त्येकरू. ह्येच्या म्होर खिनभरवी गाईला वासरापुन तोडू नगा.

उद्धव०:—कौसल्याबाई, त्याची भेट तुह्मी एकदम घ्याल तर वेड्याच ह्याल. जरा दमानें घ्या.

दश०:—कारबारनी, नानासावांच म्हनन खर हाय. तान्हन जी अक्षी जवा याकुळ व्हतो तवा तांब्याभर पानी येका दमात पिऊ न्हव म्हंत्यात.

कौस०:—खर हाय त्ये. माज्या सोनुल्याच दरसन अमृतावानी लई ग्वाड. त्ये न्हानशा घुटक्याघुटक्यानीच घ्येया व्होव. परतम मी त्येच फांवरूनच हातामंदी घ्येईन; मंग त्येच्या पायाचा सबूदच ऐकन; मंग त्येच्या त्वांडचा सबूद ऐकन; मंग त्येच त्वांड पगन; मंग त्येला प्वोटाशीं धरूनशान माज बाळ म्हून हाक मारीन; आन् मंग त्येला पुढ्यांत घ्येऊन त्येच्यासंग कांदाभाकुर खाईन; आन् मंग त्येच्या म्होर त्येला घ्येऊन-शेनी गावाकड जाईन.

उद्धव०:—कौसल्याबाई, अजून तुमचा रघुनाथाबद्दल बराच गैरसमज राहिलेला दिसतो.

कौस०:—मंजी! ह्येहो काय म्हंगता?

उद्धव०:—तुम्हीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या करण्याची तुमची इच्छा उघड उघड दिसते आहे. पण त्या करवून घेण्याची रघुनाथाची इच्छा असेलशी मला नाहीं वाटत.

कौस०:—त्ये काय म्हून?

उद्धव०:—हें पहा, तो जन्मानें जरी शूद्र असला तरी बोलण्याचालण्यांत, खाण्यापिण्यांत, वागण्यासवरण्यांत आम्हां ब्राह्मणांसारखाच आहे.

कौस०:—अर देवा! माज पोर बाटल! बामनाळल! ग्येल कामामन्न!

दश०:—बामन जाल म्हून त्येच्यात इक्त बिथराया काय जाल? येडी न्हाई तर!

उद्धव०:—त्याला हीच स्वतःची भूमि वाटते आहे. त्याच्या हृदयाची पाळेंमुळें तिच्यांत खोल गेली आहेत. तो मलाच आपला जन्मदाता समजतो.

कौस०:—आता त्यो मला आई म्हून कस म्हनल ? आन् मी बाळ म्हनाया ग्येल्ये त मला धुतकारून टाकल. कांदालसन त्येला वंगाळ वाटल. त्यो डोक्शीवर मुंडासबी न्हाऊ न्हाई घेनार. आन् चिलमबी न्हाई प्येनार !

दश०:—श्येनपन त पगा कस व्हाऊनशेनी चाललया ! कांदालसन, मुंडास, चिलम यॅच्यामंदी सरग हाय व्हय ? आपला रगू मोटा अन्यावाधिक्श व्हऊनशानी रयतचा मायबाप व्हईल, त्ये तुला नग ! फकत त्येन आपनास्नी मायबाप म्हंगातल मंजी तू अक्षी खुस व्हनार, न्हाई ? त्येच्या डोक्शीवर चवऱ्या उडत्याल त्ये तुला नग, तू मुंडाशाचा हट धरून बसनार ! त्यो मारवतीच्या शेपटावानी लांब गुडगुडी वढल, त्ये तुला नग जनू ! तुला व्होवी चिलम ! मंग या समद्याच्या पायी त्यो भिकारीबी व्हायला तरी चालल. मोटीच माया हाय तुजी त्येकरावर ! नानासाब, आखिरीपोतुर मी त्येचा बा म्हून त्येला उमागला न्हाई तरीबी ब्वार न्हाई. त्यो चैनीमंदी न्हाऊ म्हंजी समद पावल !

उद्धव०:—शाबास, दशरथबोवा, शाबास ! तुमच्या निःस्वार्थपणाची धन्य आहे.

कौस०:—मी मेल्ये मंजी मला पानी कोन पाजनार आन् माजी किरया कोन करनार ?

दश०:—तुज्या पिंडावर पानी घेयापायी त्येन आपल्या मिजासीवर पानी सोडाव व्हय ?

कौस०:—मंग मला सरग कसा दिसल ?

दश०:—सरगात जानारनीची सुरत त बगा ! त्यो गरीब न्हाऊन नरकामंदी लोळला म्हंजी तुला सरग दिसल व्हय ?

कौस०:—लई पचाईत आली म्हनायची ! नानासाब, आमा गरिबांच्या त्येकराला गरिबावानीच का म्हून न्हाई वागवल ? पायीचा ख्येटुर पायीच व्होवा. तस जाल असत म्हंजी आमी रगूला घ्येऊनश्येनी गांवाकड नसतो ग्येलो ?

उद्धव०:—रघुनाथानें मला पहिल्यापासून इतका लळा लाविला नसता तर मीं सुद्धां त्याला कुणब्यासारखाच वाढविला असता. तुम्ही त्याला माझ्या ओटींत टाकून गेलांत त्या वेळीं तुमची पाठ फिरली असेल नसेल, तोंच त्यानें माझ्या गळ्याला अशी घट्ट मिठी मारली कीं ती सोडवतां सोडवतां मला पुरेवाट झाली. अशा कोमल हातांची मिठी सोडवायला केवळ हातच कठोर लागतात असें नाहीं, तर हृदय सुद्धां तितकेंच कठोर लागतें. त्यानें माझ्या गळ्याला हात घातला नसून काळजालाच घातला असें मला वाटूं लागलें. मुलें खेळविण्याचा मला पूर्वी कधींहि अभ्यास नव्हता. पण तो माझ्या कडेवर इतक्या लडिवाळपणानें वसूं लागला आणि माझ्या अंगाखांद्यावर इतक्या हक्कानें खेळूं लागला कीं, त्याच्या जन्मापासून मींच त्याच्या दाईचें काम केलें कीं काय अशी मला शंका वाटूं लागली. तो माझ्या चेहऱ्याकडे इतकी प्रेमळ दृष्टि लावी कीं, तिनें माझ्या निष्प्रेम हृदयालाहि पाझर फुटावयास लागत. तो माझ्या तोंडाजवळ तोंड आणून पापा देऊं लागला कीं माझे ओंठ आपोआप चुंबनोन्मुख होत, आणि त्यानें हंसण्याकरितां आपले ओंठ उघडले कीं माझे ओंठहि इच्छेविरुद्ध त्याचें अनुकरण करावयास लागत. माझ्या हृदयाला प्रेमळ जोडीदाराची जी तहान लागली होती ती रघुनाथानें शांत केली. त्यानें माझ्या जीवितांत नव जीवनाचा संचार केला. कांहीं कारणामुळें निर्जन अरण्यासारखें वाटणारें जग मला पुन्हां रम्य व प्रेममय वाटूं लागलें. कौसल्याबाई, असें गोजिरवाणें मूल नेहमीं जवळ असतां त्याला जाडीभरडी भाकरी घालून मी स्वतः पंच पक्वान्नांवर ताव मारावयास पाहिजे होता काय? त्याला जाडाभरडा कपडा वापरावयाला लावून स्वतः तलम व उंची कपडा वापरणें माझें कर्तव्य होतें काय? त्याला रकट्यावर तळमळत ठेवून मी स्वतः छप्परपलंगावर लोळत पडणें योग्य झालें असतें काय?

चाल—[ घनिया धनधन० ]

ठेवुनि आत्मा का उपवासी। पोसूं व्यर्थ तनूसी ॥ध्रु०॥
बाल दुजा मम आहे आत्मा। उपेक्षुं त्या सुखधामा।
भोगुनी स्वयें का सुखराशि ॥ १ ॥

कौस०:—नानासाब, माजी लई मोटी चूक जाली बगा. आपन कैयेल त्येच ब्येस हाय.

उद्धव०:—तुम्हीं रघुनाथाला माझ्या पदरांत घातलें तेव्हां मी उद्विग्न होऊन यात्रा करण्याकरितां निघालों होतों. यात्रा संपवून मी परत घरीं आलों, तेव्हां मी प्रवासांतच लग्न केलें असून त्या लग्नाचें हें अपत्य आहे व त्याची माता त्याच्या जन्मानंतर लवकरच स्वर्गस्थ झाली असा माझ्या इष्टमित्रांचा साहजिकच समज झाला, व तोच मीं कायम ठेविला. तेव्हां-पासून आम्ही उभयतां पितापुत्रांप्रमाणें वागत आलों आहोंत. दोघांना आनंदाचे व दुःखाचे अनेक प्रसंग बरोबरच अनुभवावे लागल्यामुळें तो संबंध दृढतर झाला आहे. त्याच्या दुखण्यांत मीं व माझ्या दुखण्यांत त्यानें उशाशीं बसून अलोचन जाग्रणें काढिलीं आहेत. माझ्या दुर्बल अवस्थेंत त्यानें मला आपल्या बाहूंचा, व त्याच्या विकल स्थितींत मीं त्याला आपल्या उपदेशाचा आधार दिला आहे. अनेक प्रसंगीं उभयतांनीं आपापले अश्रु मिसळले आहेत. कौसल्याबाई, दशरथबुवा, तुमचा रघुनाथावर मातापिता या नात्यानें जो हक्क पोहोंचतो तितका माझा पोंचत नसेल. पण आमच्या इतक्या वर्षांच्या निकट सहवासानंतर तुम्हीं त्याजवर हक्क सांगून त्याला माझ्यापासून दूर घेऊन जावें हें तरी तुम्हांला योग्य वाटतें का ?

चाल—[ नादर दर तनदरेना० ]

खचित परिचित विरह अनुभव तुह्मांसि बहु येई ।
देहीं न राही जराहि शमसुख वरवि न गाति ।। ध्रु० ।।
अणुहि गणित मम पूर्व तुह्मि उपकारा । न लोटा मज
विरहिं तरि मानीन ती अचलसम उपकृति ।। १ ।।

दश०:—नानासाब, रगूला आपुन आमच्यापुनबी चड त्येखळ ! आपल लई उपकार जाल बगा ! आपन आमच बी मावाप हैसा. जस ग्वाड दिसल अस करा.

कौस०:—पन नानासाब, आपुन आमच्या रगूची माया वडूनशानी छौनली हे न्हाई ब्येस जाल.

उद्धवः—बरें तर, मी तुमची रहाण्याची वगैरे सोय या सोप्यांत करतों. तुम्हीं माझ्या कुटुंबाच्या माहेराकडील ओळखीचीं म्हणून सांगितलें म्हणजे विशेष अडचण पडणार नाहीं. तुम्हीं मात्र हें घर आपलेंच समजून रहायचें.

दश०:—आमी आमच्या घरामंदी राबतु तसच हतबी राबू.

उद्धव०:—तुम्हीं काम केलें तर मला फारच संकोच वाटेल.

दश०:—नानासाब, त्येच्यात काईबी गैर न्हाई. आमी कामधाम केल्याबिगर खुशालचेंडूवानी ऱ्हायलु तर लोकास्नी संशव न्हाई का यनार?

उद्धव०:—तुमचेंहि ह्मणणें ठीक आहे. तुम्ही या घरीं वाटेल तसें वागायला मुखत्यार आहांत. कल्याण, अरे कल्याण! (कल्याण येतो. त्याच्या कानांत) हें पहा. हीं दोघेंजण माझ्या कुटुंबाच्या माहेरच्या ओळखीचीं आहेत.

कल्याणः—(एकीकडे) तरीच इतक्या गुलगुल गोष्टी चालल्या होत्या त्या! दुधाची तहान ताकावर भागवून घेताहेत झालें!

उद्धव०:—हीं आपल्या घरीं नोकर ह्मणून रहातील. पण यांना आपण होऊन काम सांगायचें नाहीं. यांच्या मर्जीला येईल तें काम हीं करतील.

कल्याण—(एकीकडे) यंवरे नोकर!

उद्धव०:—आपण जें अन्न खातों तेंच यांना घालायचें, आणि यांना नवे कपडे घेऊन द्यायचे. यांची कोणत्याहि तऱ्हेची हेळसांड होतां उपयोगी नाहीं. (जातो.)

कल्याणः—बोवा, तुमचें नांव काय?

दश०:—माज नांव दसरथ, आन कारबारनीच हाय कौसल्या.

कल्या०:—वाः! अगदीं रामराज्यांतलेंच जोडपें आहे तर! दशरथ राजाच्या मुलाला वनवास घडला, आणि तो तुमच्या मुलाला घडत नसून तुह्मांला घडतो आहे, इतकेंच काय तें अंतर! असेंच ना?

दश०:—आपुन ह्मनाल त्ये खर.

कल्या०:—पण आतां तुमचा वनवास संपला. आतां लोळायला मऊ बिछाईत, आणि खायला बासुंदीपुरी. दशरथबुवा, तुम्ही बासुंदी कधीं पाहिली आहे का?

दश०:—आमी गरीब मानस. आमास्नी कुटून दिसायची !

कल्या०:—ऐकली तरी असेल. तुमच्या गुळवणीसारखी गुळचट असते. पण ब्राह्मणांत आणि कुणब्यांत जितकें अंतर तितकेंच तिच्यांत आणि गुळवणींत असतें.

कौस०:—आमाला तुमची बासुंदी नग आन काईबी नग. आमची आपली भाकुर आन लसनीच तिकाटच ब्येस हाय.

कल्या०:—माणसाला कल्पवृक्षाखालीं बसविलें ह्मणून काय होणार ? त्याला मागण्याची अक्कल पाहिजे ना ? तुह्मांला आमच्या पक्वान्नांची चव नाहीं हें मला माहित असतें तर मीं तुमच्याबद्दल नानासाहेबांपाशीं शब्द खर्च केला नसता.

दश०:—तुमीच आमची शिपारस क्येली तर ?

कल्या०:—तुमच्यादेखतच तर आमच्या कानगोष्टी झाल्या.

कौस०:—त्येनी तुमच कान धरल व्हत, तीच कानगोट व्हय ?

कल्या०:—अहो, ती नुस्ती थट्टा हेंहि तुह्मांला कळूं नये ना ! पण आह्मां ब्राह्मणांच्या कोणत्याच रीती तुह्मांला माहित नाहींत, तर थट्टा तरी कुठून कळणार ? तें जाऊं द्या. आतां तुमच्यादेखत आम्ही दोघे कुजबुजलों ना ? तेव्हां आमचें काय बोलणें झालें असा तुमचा तर्क आहे ?

दश०:—आमाला तरक असता तर आमी कुनबट कशापायी जालु असतु ?

कल्या०:—तेंहि खरेंच. ऐका, मी सांगतों. नानासाहेब ह्मणाले, हीं आमच्या सासुरवाडीकडील ओळखीचीं माणसें आहेत, तेव्हां त्यांच्यावर जरा अंमलच गाजविला पाहिजे. मीं नानासाहेबांना साफ सांगितलें कीं, 'तें माझ्या हातून नाहीं होणार. माझ्या नोकरीची आपणांला जरूर असली तर यांना चांगलें सन्मानानें वागविलें पाहिजे, आणि आपल्या बरोबरीनें अन्नवस्त्र दिलें पाहिजे. यांच्या मर्जीला येईल तें काम हीं करतील, नाहीं तर हात जोडून स्वस्थ बसतील.' बाकी तुम्ही कोठचीं स्वस्थ बसायला ह्मणा ! स्वस्थ बसायला लागलांत तर लगेच संधिवात होऊन मढ्यांसारखीं मान बनन जाल.

कौस०:—( एकीकडे ) आपल्या समद्या कामाला जुपायचा ज्योत दिसतुया वामनबुवाचा.

दश०:—दिवानजी, आमच अंग हाय होनतीच. तवा होनतीबिगर आमास्नी ग्वाड कस लागल? मी बिछाइतीच, दिवाबत्तीच संमद काम संभाळीन.

कल्या०:—दशरथबुवा, हें जरा भारीच काम तुम्हीं आपल्या शिरावर घेतलेंत. बिछाइतीवर थोडा सुद्धां डाग पडतां उपयोगी नाहीं. तुह्मां कुणबटांचे हातच मुळीं मळकट असतात. बिछाईत साफ करितांकरितांच घाणेरडी करून टाकायचे! तसेंच हें हंड्याझुंबरांचें काम मोठें नाजूक! एक वेळ गेलेली अब्रू नीट होईल. पण फुटलेली कांच कांहीं केल्या सांधतां येणार नाहीं. तुमचे हात असतात दगडासारखे कणखर. कांच साफ होतांहोतांच फुटायची! बैठकींतले आरसे, खुर्च्या, कोंचें कशीं लख्ख ठेविलीं पाहिजेत. कुलीन घराण्यावरचा कलंक एक वेळ खपेल. पण आमच्या दिवाणखान्यांतील सामानावर धुळीचा एक कणहि नाहीं चालायचा. कौसल्याबाई, तुम्ही कोणतें काम घेणार आपल्याकडे?

कौस०:—तुमच्या धाकट्या यजमानाच कांबरून धून शाप करीन, त्येची खरकट ताटवाटी धुईन; त्ये समद माज्याकड लागल.

कल्या०:—तें काम मजकडे असतें. तुम्हांला नाहीं साधणार तें. त्यांचीं धोतरं साबू लावून स्वच्छ धुतलीं पाहिजेत, आणि हलक्या हातांनीं आपटलीं पाहिजेत. त्यांवर गुलाबी रंग तर चढावा, पण तीं फाटतां मात्र कामा नयेत. धोतरावर गुलाब तर दिसावा, पण काट्यांचा मात्र संशय येतां कामा नये. धोत्राची घडी अशी चापूनचोपून बसवावी लागेल कीं यंव! आणि ती इतकी कडकडीत झाली पाहिजे कीं जणु काय तिला इस्तरीच दिली आहे. तुम्ही अस्तुरी असाल, पण तुम्हांला इस्तरी साधेल असें नाहीं मला वाटत. त्यांचा गडवा आणि फुलपात्र घांसतांना ओचकारा तर पडतां कामा नये, पण निघावें इतकें स्वच्छ कीं त्यांत तोंड पाहून घ्यावें! फार काय, पण बाळासाहेबांचा बूट सुद्धां घासून पुसून इतका लखपख ठेविला पाहिजे कीं त्यांत पाहून तुह्मांला कुंकूहि लावतां येईल.

कौस०:—त्येच्यात हाय काय इक्त अवगाड ? बाळासाब माज त्येकरू असत तर म्या ह्ये संमद क्येलच असत का न्हाई ?

कल्या०:—बाळासाहेब आणि तुमचें लेकरूं ? त्यांच्यासारखें रत्न पोटीं यायला सात जन्म तपश्चर्या केली पाहिजे, समजलांत ? फुकटचें नाहीं. त्यांच्या पायाच्या नखाची तरी तुम्हांला सर येईल का ? उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ! अहो, त्यांच्या पायाचें नख तर राहूंच द्या, पण चालतांना त्यांचा बूट असा कर् कर्‌कर् वाजतो कीं त्याच्यासारखें बोलणेंहि तुम्हांला साधायचें नाहीं.

दश०:—दिवानजी, तिचा लेका हाय, करना का बाळासावांची चाकरी ! न्हाई सादली तर आपसुकाच सोडल.

कल्या०:—दशरथबुवा, तुम्ही भले माणूस दिसता, आणि कोणाशीं कसें वागायचें, कोणाला कोणत्या नांवानें हांक मारायची हेंहि तुम्हांला चांगलें माहित आहे. तेव्हां मी तुम्हांला नाराज करीत नाहीं. तुमच्याच मनासारखें होऊं द्या, मग तर झालें ना ? मी जरी नानासाहेबांच्या साऱ्या नोकरांचा राजा असलों तरी माझा अधिकार तुम्हांला कधींच जाचक वाटणार नाहीं.

[ चाल—जाम भरके० ]

दासनृप मी। नृपदासाहुनि थोर ॥ तरि न जुलमी।
राजासदृश कठोर ॥ लघुजनिं गुरुपण वरें। लघुत्व
थोर जनिं न न धरि जोर ॥ ध्रु० ॥ हृदयहि मम थोर
असे। सदय अगतिकीं वसे। तेजस्वी परि थोरीं।
मृदुल वचानिं मृदुल वने। कठिन कठिन परि वचनें।
नाहीं भीति। मातें कुणाहीसमोर ॥ १ ॥

(एका बाजूनें कल्याण व दुसऱ्या बाजूनें दशरथ व कौसल्या जातात.)

# प्रवेश २ रा.

[ उद्धवराव व मालती. ]

मालतीः—नानासाहेब, रघुनाथ आणि कांता आतां लग्नाजोगीं झालीं आहेत असें नाहीं का आपणांला वाटत ? वयानें, रूपानें, शीलानें, स्वभावानें, बुद्धीनें आणि विद्येनेंहि तीं एकमेकांस शोभण्यासारखींच आहेत.

[ चाल—मोरे अब कैसे० ]

ऐशि अनुगुण अनुरूप जोडी बघाया। लाधे ना मुळिं लोकीं या ॥ ध्रु० ॥ दिनरजनी रविविधु अंबरभू। शोभत यांशिं तुला उभयां ॥ १ ॥

त्यांतून लहानपणापासून बरोबर वाढल्यामुळें त्यांना एकमेकांच्या स्वभावांची ओळख झाली असून त्यांचें एकमेकांवर प्रेमहि जडलें आहे. तें प्रेम लग्नाच्या बंधनानें दृढ करणें योग्य होणार नाहीं का ? नानासाहेब, या प्रश्नाचा कोणत्याहि बाजूनें विचार केला तरी त्याला एकच उत्तर आहे. त्याला येवढा विचार कशाला करायला पाहिजे ?

उद्धव०ः—मालतीबाई, मला तुमच्या प्रश्नाचें उत्तर द्यायला उशीर लागला याचें कारण त्या प्रश्नाचा अवघडपणा हें नाहीं. तुमचा प्रश्न ऐकल्याबरोबर वीस वर्षांपूर्वीचें असेंच एक अनुरूप जोडपें माझ्या कल्पनेपुढें उभें राहिलें. लहानपणापासून एकत्र वाढल्यामुळें त्या बालबालिकांचेंहि परस्परांवर अकृत्रिम प्रेम जडलें होतें. विधीनेंच त्यांची योजना परस्परांसाठीं केली असावी असें प्रत्येकाला वाटत होतें. पण तो तर्क लवकरच खोटा ठरला. विधीनेंच त्यांच्या विवाहाला विघ्न उपस्थित केलें. त्यांच्या मातापितरांनीं त्यांच्या अनुरूपतेपेक्षां पत्रिकांच्या प्रतिकूलतेलाच अधिक महत्त्व दिलें, आणि तें लग्न मोडलें. मालतीबाई, बोला, मी काढिलेल्या चलचित्रपटांतील एक रेषा तरी खोटी आहे का ?

माल०ः—खोटी म्हणणें कदाचित् ब्राह्मण गतभर्तृकेच्या शीलास विशेष शोभेल. पण मी अशा खोट्या शोभेची भुकेलेली नाहीं. मी म्हणतें, एका अनुरूप जोडप्याच्या सुखाचा त्यांच्या मातापितरांनीं विघात

केला म्हणून तो धडा इतर प्रत्येक अनुरूप जोडप्याच्या मातापितरांनीं गिरविला पाहिजे कीं काय ? पुढच्यास लागलेल्या ठेंचीनें मागच्यानें शहाणें व्हायला नको का ?

उद्धव०:—मालतीबाई, मीं ज्या चित्रपटाचें वर्णन केलें तो बाल्यावस्थेंतला होता. आतां तारुण्यांतला एक चित्रपट तुमच्यासमोर उभा करितों. म्हणजे तुमच्या प्रश्नाचें निराळें उत्तर देण्याचें कारण पडणार नाहीं. त्या अनुरूप जोडप्यापैकीं मुलीचा पति एक कन्यारूपि स्मारक मागें ठेवून दैववशानें अकालीं मृत्युमुखीं पडला. अविवाहित तरुणानें तरुण गतभर्तृकेस मागणी घातली. ती मान्य करून त्यासह सुखांत नांदण्याऐवजीं तिनें ती निर्दयपणें अमान्य करून स्वतःला आणि आपल्या बालमित्राला आमरण दुःखात ढकलिलें. त्याची स्थिति त्या वेळीं फारच दुर्धर झाली.

[ चाल—क्यौं मारदा० ]

शून्या धरा झाली । सगळी । तम हृदयिं कोंदलें घोर त्या
कालीं ॥ ध्रु० ॥ छेदि निराशा । जीवनपाशां ॥ चपला
पडे जणुं त्याचिया भालीं ॥ १ ॥

मालतीबाई, या चित्रपटांतील सुद्धां साऱ्या रेषा यथातथ्यच काढिलेल्या आहेत ना ?

माल०:—नाहीं, नानासाहेब. त्या पटांतील एक रेषा अगदीं चुकीची आहे. त्या तरुण गतभर्तृकेनें आपल्या बालमित्राची मागणी नाकारिली ती निर्दयतेनें नसून आपल्या धर्मकल्पनांमुळें नाकारिली. पुनर्विवाहाला शास्त्रांत कोठेंहि आधार नसून तो नरकप्राप्तीचें एक साधन आहे असा तिचा अंतःकरणापासून समज होता. तसा समज नसता तर तिनें आपल्या बालमित्राच्या मागणीचीहि वाट न पहातां व जनलज्जेची पर्वा न बाळगतां त्याच्या गळ्यांत माळ घातली असती. नानासाहेब, त्या बिचारीच्या हृदयांत उठलेलें प्रबळ भावनांचें वादळ तिनें एकांतीं सोडलेल्या असंख्य सुस्काऱ्यांच्या व गाळलेल्या असंख्य अश्रुधारांच्या रूपानें बाहेर पडतांना आपण पाहिलें असतें तर तिजवर निर्दयतेचा आरोप आपण खास केला नसता. नानासाहेब, आपण जर मधून मधून गोड शब्द काढीत जाल तर

माझ्या अंतःकरणांतील काहूर सोसण्याला मला धीर येत जाईल, आणि आपल्या करुणेच्या नावेंत बसून मी त्या वादळांतूनहि मार्ग काढीन. पण नानासाहेब, आपण निर्दय होऊन माझ्यावरहि निर्दयतेचा आरोप करूं लागाल तर माझा एक पळभरहि निभाव लागणार नाहीं.

[ चाल—नाम तुमारा किसन कन्हय्या० ]

दीन जनांना अहांत थारा तेविं निवारा त्यांसि खरा।
दीन उदारा मी असिधारा मजवरि धरितां कां प्रखरा ॥ ध्रु० ॥
तप्तजनां आहांत विसावा स्वभाव ठावा मृदु अपुला।
वीज कडाडलि शिरीं जरी तरि वर्षितसा कां अग्निशिला ॥ १ ॥

( रडूं लागते. )

उद्धव०:—मालतीबाई, मला क्षमा करा. मनुष्य आपल्या गत चरित्रांतील भिन्न वयोवस्थांमधील प्रसंगांचे चित्रपट अगदीं तटस्थ प्रेक्षकाप्रमाणें पाहून त्यांचें कौतुक करितो असा माझा समज होता; आणि तो कांहीं अंशीं खराहि होता. मीं आपल्या बालपणींचें चित्र काढिलें तेव्हां तुम्हीं त्याचें निर्विकार मनानेंच चिंतन केलें कीं नाहीं? पण वर्तमानकालाला बरेंच जवळचें असें तारुण्यांतील चित्र मीं काढिल्याबरोबर तुमच्या मनांत कालवाकालव झाली. मालतीबाई, ती कालवाकालव तुमच्याच हृदयांत झाली असें नसून मीहि तिच्यांत वांटेकरी होतों. तो प्रसंग अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. तुमचा नकार कानीं पडतांच मला सर्व विश्वांत एकदम गर्द अंधकार पसरल्यासारखें झालें! आशेचा एकहि किरण दिसेना! उरलेलें आयुष्य निरर्थक वाटूं लागलें! कोठें तरी कसा तरी कालक्षेप करून अवशिष्ट आयुष्य कंठायचें येवढेंच इतिकर्तव्य वाटूं लागलें! तशा दारुण स्थितींत मला तुमच्या नकाराच्या मुळाशीं निर्दयता असलेली वाटावी यांत नवल नाहीं. पण तारुण्यांतील प्रसंगाचें प्रौढावस्थेंत सिंहावलोकन करितांना सुद्धां मीं दृष्टि विकारवश होऊं द्यावी हें अगदीं अयोग्य आहे. मालतीबाई, मी निर्दयतेचा आरोप प्रांजलपणें परत घेतों. आपल्या नकारानें आपण आपली व माझी नरकापासून मुक्तता करीत आहांत असेंच तुम्हांला वाटत असलें पाहिजे. आपल्या उभयतांच्या पारलौकिक सुखावर नजर देऊन ऐहिक सुखावर लाथ मारणाऱ्या उदार

बुद्धीवर मीं क्षुद्र बुद्धीनें निर्दयपणाचा आरोप केला याची मला फार लाज वाटत आहे.

[ चाल --अपनेसो लगन मोरि० ]

मन करा करुण मज द्या क्षमा। वरा त्यजुनि खेदासि
शमा ॥ ध्रु० ॥ आरोपित मी गुरु लघुपण निज।
इतर जनिं तिळ न धरुनि लाज ॥ १ ॥

माल०:--नानासाहेब, आपणाकडे कमीपणा घेण्याचेंहि आपणांला कांहींच कारण नाहीं. मीं आपल्या मागणीला नकार दिला तो केवळ निर्दयतेमुळेंच दिला अशी आपली समजूत असतांहि आपण माझ्या ठिकाणीं पूर्ववत् आपलेपणा कायम ठेवून माझा सांभाळ केला हें क्षुद्रपणाचेंच का लक्षण ! विधवांना लुबाडायला स्वार्थसाधु लोक नेहमीं टपलेले असतात. आपलें जर मला साहाय्य नसतें तर मी सुद्धां त्यांच्या फांसांत सांपडून सगळें वित्त गमावून बसलें असतें. पण आपण उदार बुद्धीनें मला क्षमा करून या विषम संसारांत पदोंपदीं हात देत गेलांत. पाणिग्रहणाचें सुख मिळत नसतां केवळ त्याची जबाबदारी अंगावर घेऊन आनंदानें पार पाडणारा आपणांसारखा पुण्य पुरुष विरळाच ! कृपा करा, आणि पुन्हां स्वतःची निंदा मला ऐकवूं नका. आपल्या उपकारांची कृतीनें फेड करण्याचें समाधान दैवानें मला ठेविलें नाहीं. त्यांची शब्दांनीं संभावना करणेंच काय तें मला शक्य आहे. पण त्याऐवजीं आपली निंदाच ऐकण्याचें माझ्या कपाळीं येईल तर माझ्यासारखी दुर्दैवी मीच असें म्हटलें पाहिजे.

उद्धव०:--मालतीबाई, मीं तुमच्याकरितां जें कांहीं अल्पस्वल्प केलें असेल तें केवळ निरपेक्ष बुद्धीनें केलें असें तुम्हांला वाटत असल्यास ती मात्र चूक आहे. माझ्या सेवेमुळें प्रसन्न होणारी तुमची मुद्रा, कृतज्ञतेनें ओथंबणारे नेत्र व त्यांमध्यें उभे राहणारे अश्रु या बक्षिसाच्या लालचीनें ती सेवा मजकडून घडत असते. त्या बक्षिसानें माझ्या क्षुद्र उपकारांची भरपाई होते इतकेंच केवळ नाहीं, तर उलट माझ्याच शिरावर ऋणाचा बोजा चढतो.

माल०:--तिशी उलटून गेलेल्या स्त्रीच्या मुद्रेची, डोळ्यांची आणि आसवांची किंमत ती कितीशी असणार !

उद्धव०:—एखाद्या तरुणाच्या दृष्टीनें त्यांची किंमत मुळींच नसेल. पण ज्यानें आयुष्याचा बहुतेक भाग तुमच्या मधुर सहवासांत किंवा चिंतनांत घालविला आहे अशा एकनिष्ठ मित्राला त्यांची किंमत गणितांतील आंकड्यांच्या पलीकडची आहे. आपण दोघें लहान होतों तेव्हां तुमची मूर्ति हल्लींपेक्षां जरी सुंदर असली तरी तिच्याशीं संलग्न अशा मधुर आठवणी फारशा नव्हत्या. सुखाच्या अमर्याद आशा हीच काय ती आपली त्या वेळची मानसिक पुंजी होती. गत स्मृतींचा पाया भक्कम भूतकालावर उभारलेला असल्यामुळें जसा स्थिर असतो तसा आशांचा नसून त्यांची इमारत भाविकालाच्या भुसभुशीत रेतीवर उठलेली असते; व ही गोष्ट आपल्या चरित्रांनीं पूर्णपणें सिद्ध झालेली आहे. हल्लीं तुमचें सौंदर्यपुष्प वयोज्वालेनें किंचित् म्लान झालेलें असलें तरी त्याच्या सुवासाबरोबर इतक्या मधुर आठवणी जागृत होतात कीं, त्यांजपुढें तारुण्यांतील सौंदर्य फिकें पडतें. या आठवणींच्या जोडीला आशेला थारा नाहीं असेंहि समजूं नका. कारण माझ्या करुण स्थितीची कधीं तरी तुम्हांला करुणा येईल अशी आशा अजून लोंचटपणानें माझ्या हृदयांत ठाणें देऊन बसलीच आहे.

माल०:—भलतेंच कांहीं तरी! कोणीं ऐकलें तर त्याला खरें देखील वाटणार नाहीं.

उद्धव०:—ज्या जगांत प्रेम रूपावर, वित्तावर, ऐश्वर्यावर अवलंबून असतें त्यास कदाचित् ही थट्टा वाटेल. पण मालतीबाई, तुमचे विचार असे बहिर्मुख नाहींत, व म्हणून तुम्हांला मी सांगतों यांत आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. ऐका; पुनर्विवाह अशास्त्र आहे हा तुमचा समज ज्या क्षणीं बदलेल त्याच क्षणीं ती शुभ वार्ता मला कळवा; म्हणजे तुमचा स्वीकार करण्याला मी तारुण्यांत होतों त्यापेक्षांहि अधिक तत्पर आहें याचा तुम्हांला प्रत्यय येईल. माझ्या हृदयांत तुमच्याबद्दल किती गाढ प्रेम भरलेलें आहे, हें मुखानें उच्चार करून दुय्यम प्रतीच्या पुराव्यानेंच सिद्ध करणें या क्षणीं मला शक्य आहे. पण जेव्हां तुम्ही मला धन्य करण्याला तयार व्हाल तेव्हां तुम्हांला माझ्या या हृदयावर आपलें

मस्तक ठेवून त्यांतील प्रेमाच्या स्फुरणाविषयीं प्रत्यक्ष पुराव्यानेंच खात्री करून घेतां येईल.

माल०:—ही आपली आशाच आपल्या मुलांच्या सुखाच्या आड येत नाहीं ना?

उद्धव०:—शिवशिव! ही अमंगल कल्पना तरी तुमच्या मनांत कां यावी? रघुनाथाचें कांतेशीं लग्न करण्याला मी प्रतिकूल आहें ही गोष्ट खरी आहे. पण तिच्या मुळाशीं कोणताच स्वार्थी विचार नाहीं. तुमच्या व माझ्या विवाहाला जसें दैव दोनदां आड आलें तसेंच आपल्या मुलांच्या विवाहालाहि येणार आहे. तें या खेपेस त्यांच्या किंवा त्यांच्या वडील माणसांच्या धर्मकल्पनांच्या रूपानें न येतां दुसऱ्याच एका रूपानें येणार आहे, इतकाच काय तो फरक. आपणां उभयतांच्या आयुष्यांतील दोन चित्रपट रेखाटण्यांत माझा हेंच दर्शविण्याचा हेतु होता, कीं आपल्या कुटुंबांच्या विवाहसंबंधावर दैवाची अत्यंत वक्र दृष्टि असल्यामुळें तो घडवून आणण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे.

माल०:—माझ्या नकारासंबंधाचा राग अजून आपल्या मनांतून गेला नाहीं असेंच कोणालाहि या बोलण्यावरून वाटेल.

उद्धव०:—माझ्या प्रतिकूलतेच्या बुडाशीं तुह्मांसंबंधाचें प्रेम नाहीं किंवा रागहि नाहीं. तिची उभारणी अशा संकुचित पायावर झाली नसून विश्वबंधुत्वाच्या भव्य पायावर झालेली आहे. (एकीकडे) देवा, या सद्धेतुक प्रतारणेबद्दल क्षमा कर!

माल०:—मी नाहीं समजलें.

उद्धव०:—माझी कल्पना तुह्मांस कांहींशी विक्षिप्तपणाची वाटेल. पण ती सांगितल्याशिवाय मला माझा हेतु नीटपणें स्पष्ट करितां येणार नाहीं. आपणांमधील जातिभेद राष्ट्रकल्याणाच्या पदोपदीं आड येत असून त्याचें निर्मूलन करणें प्रत्येक देशभक्ताचें कर्तव्य आहे असें माझें मत आहे.

माल०:—बरें मग?

उद्धव०:—जातीजातींमध्यें रोटीबेटीव्यवहार जारीनें सुरू झाल्याशिवाय तें निर्मूलन साध्य नाहीं हें निर्विवाद आहे.

माल०:—मग ह्मणणें तरी काय आपलें?

उद्धव०:---रघुनाथाचा एखाद्या शूद्रकन्येशीं विवाह लावून द्यावा.

माल०:---केवढा तरी हा भ्रष्टाकार!

उद्धव०:---तुह्मांला पुनर्विवाहच जर भ्रष्टाकार वाटतो तर मिश्र विवाह वाटल्यास नवल नाहीं.

माल०:---पण त्या बिचाऱ्याच्या इच्छा एका बाजूला गुंडाळून ठेवून त्याच्या गळ्यांत एखादी गांवढळ, हेंगाडी मुलगी बांधण्यांत त्याला काय सुख होणार? नानासाहेब, त्याचें जर नुस्तें कपाळ दुखूं लागलें तर आपल्या जिवाची कासाविशी होते; आणि त्याला सारा जन्म दुःखांत काढायला आपण लावणार!

उद्धव०:---शूद्रांमध्यें आतां चांगल्या सुशिक्षित मुली मिळूं लागल्या आहेत; तेव्हां त्यासंबंधानें रघुनाथाला कुरकुर करायला जागा रहाणार नाहीं.

माल०:---पण एकीवरचें प्रेम काढून दुसरीवर प्रेम करावयाला लावायचें हा जुलमाचाच प्रकार नाहीं का?

उद्धव०:---तुम्हांला वाटतें रघुनाथाचें कांतेवर वल्लभाच्या नात्याचें प्रेम जडलें आहे म्हणून; पण तो निव्वळ भ्रम आहे. त्यांचें परस्परांवर प्रेम आहे; नाहीं असें नाहीं. पण तें बहीणभावंडाचें आहे.

माल०:---तीं एकमेकांस दादाताई म्हणतात त्यावर आपण जात असाल. पण ज्याप्रमाणें वादळांत नाव सांपडली असतां ती कोणीकडे जाते याचा पत्ताच लागत नाहीं त्याप्रमाणें प्रेमाच्या काहुरांत अशा कृत्रिम नांवांची वाताहात होऊन जाते.

उद्धव०:---तुम्हांला वाटतें त्यापेक्षां शब्दांमध्यें पुष्कळ अधिक सामर्थ्य असतें. शब्दांनीं कल्पनांचें स्वरूप निश्चित होतें. कवीला एका शब्दाच्या जोडीला त्याच्याच अंत्याक्षराचा दुसरा शब्द बसवावा लागत असल्यामुळें त्या दुसऱ्या शब्दांत सांठलेली कल्पनाहि आपोआप सुचते. श्लेषयुक्त शब्दाच्या एका अर्थाबरोबर दुसराहि अर्थ गुंफून चमत्कृति उत्पन्न करितां येते. मनुष्याला आदर्शरूप व्यक्तीचें नांव ठेविलें म्हणजे त्या नांवाच्या लाजेनें त्याला तिचें अनुकरण करण्याची आपोआप बुद्धि होते. विचारापासून जसा आपला जन्म मिळतो तसा [illegible]पासून विचारालाहि मिळालेला दिसून येतो. मीं आपल्या मुलांना लहानपणापासून दादा ताई याच नांवांनीं

परस्परांस संबोधण्याचें शिकविलें असल्यामुळें त्यांचे विचार व भावना त्याच शब्दांनीं मर्यादित होणार व त्यांजवर त्याच शब्दांचा ठसा उमटणार हें ठरलेलें आहे.

**माल०:**—रघुनाथाच्या लहानपणापासूनच त्याला शूद्राची मुलगी करण्याचें आपण ठरविलें आहे तर ?

**उद्धव०:**—जवळ जवळ त्याच्या जन्मापासूनच मीं त्याजकरितां ही योजना ठरविली आहे. मीं त्याचें मौंजीबंधन केलें नाहीं तेंहि याच योजनेच्या सिद्ध्यर्थ.

**माल०:**—आणि आपल्या मतास पुढें बळी पडणाऱ्या बिचाऱ्या रघुनाथाचें आपण आजपर्यंत एखाद्या अजापुत्राप्रमाणें संवर्धनहि केलें आहे असेंच ना ?

**उद्धव०:**—त्यानें आपण होऊन समाजहितास बळी पडण्याला सरसावावें असें उदार शिक्षणहि मीं त्याला दिलें आहे.

**मालती:**—मनुष्याला एखाद्या गोष्टीचा अनुभव जरी आलेला असला तरी तो इतरांसंबंधानें विचार करितांना त्या अनुभवाविरुद्धच तर्क करीत बसतो. नानासाहेब, उदार शिक्षण, कृत्रिम नांवें हे हृदयाच्या वरचे पापुद्रे होत. आपणां स्वतःला प्रीतीचा अनुभव आलेला आहे. तिच्या प्रबळ वेगानें आपल्या हृदयांत खोल गेलेल्या पाळयामुळ्यांची उलथापालथ झालेली आपण अनुभविली आहे. असें असतां तिच्या ओघाला आपण केवळ नांवांचे बांध घालायला पहावें हें किती चमत्कारिक आहे ! ते खरोखरच नांवांचे बांध होत. कोमल भाव प्रकट होऊं लागले कीं, त्यांच्या संसर्गानें ते सुद्धां अनुरक्त होऊन जमीनदोस्त व्हावयाचे !

**उद्धव०:**—पण कोमल भावांस प्रकट होण्याला अवसर सांपडूं नये अशीहि एक योजना मीं केली आहे.

**मालती:**—ती कोणती ?

**उद्धव०:**—मुलांच्या जेव्हां जेव्हां भेटी होत जातील तेव्हां तेव्हां समक्ष हजर रहाण्याला मीं कल्याणाला बजाविलें आहे.

**माल०:**—कल्याणाला ना ? मग उत्तम सोय ! प्रीतीच्या शिकवणीनें येणाऱ्या कुशाग्र धूर्ततेपुढें बिचाऱ्याची ढोबळ बुद्धि कशी तग धरणार ? त्याला ती केव्हांच उलटापालटा करून टाकील.

उद्धव०:—कांहीं झालें तरी माझा रघुनाथाच्या आज्ञाधारकपणावर पूर्ण विश्वास आहे. तो माझ्या इच्छेच्या विरुद्ध कधींहि जाणार नाहीं. त्याच्यासंबंधानें माझी काय योजना आहे हें त्याला कळविण्याला मात्र आतां उशीर करितां कामा नये. तुमच्या व माझ्या लग्नाला प्रथम आपल्या श्रद्धाळू आईबापांची व नंतर तुमच्या श्रद्धाळू मनाची प्रतिकूलता आड आली. रघुनाथाचा कांतेशीं विवाह होण्याला त्याचा तिजविषयींचा बंधु-भाव किंवा त्याच्या अभावीं माझा विश्वबंधुभाव हा प्रत्यवाय आल्या-वांचून रहाणार नाहीं. (जातो.)

माल०:—(स्वतःशीं) आपल्या मनाची फसवणूक करून घेताहेत झालें! मुलांचें एकमेकांशीं लग्न लागल्यास आपला पुनर्विवाह होणें शक्य नाहीं ही गूढ भीतिच यांच्या संकल्पाचा उगम आहे खास! या विचारानें माझ्या मनाला कांहींसा आनंदच वाटत आहे. मालति, तूं वयानें इतकी प्रौढ होऊन सुद्धां तुझे विचार इतके अप्रौढ रहावे ना? यांच्या प्रेमाच्या दर्शनानें अजून तुझ्या मनाची तारांबळ होते?

[ चाल—झं झं झं झं पायल मोरी० ]

तरल हें मन्मानस डोले। निरखोनि प्रेम इतर जनिं
वातस्पर्शें दीपक जेवीं हाले ॥ ध्रु० ॥ बालपणींच्या
स्मृति अचला। चळवीति खुळें ॥ १ ॥

पण नाहीं, मनाला असें बेलगामी सोडून उपयोग नाहीं. मला दोन कर्तव्यें करायचीं आहेत. एक ब्राह्मण विधवेचें आणि दुसरें प्रेमळ मातेचें. पहिलें कर्तव्य पार पाडावयाचें झाल्यास मला गत पतीशिवाय इतराचा अभिलाषबुद्धीनें विचारहि करितां कामा नये. दुसऱ्या कर्तव्याला जागा-वयाचें झाल्यास मला कांतेच्या सुखाची तर्तूद करावयास पाहिजे. आम्हां उभयतांमधील बालपणींचें प्रेम आमच्या मुलांत उतरलेलें आहे. त्या प्रेमाला विवाहाची जोड करून दिल्यास त्यांना जन्माचीं सुखी केल्याचें श्रेय पदरीं येऊन त्यांच्या मध्यस्थीनें आमच्या प्रेमाचा आस्वाद घेण्याचें काल्पनिक सुखहि आम्हांला मिळणार आहे. मालति, पुन्हां तुझें मन बहकूं लागलें! त्या मनाकडून विपर्यांतर घडवायला स्थलांतर हा एकच उपाय आहे. ( जाते. )

## प्रवेश ३ रा.

[ कौसल्या जवळ एक सदरा व एक पेला घेऊन बसली आहे. ]

कौसल्याः—( स्वतःशीं ) माजा रगू माज्या पोटचा ल्योक; पन त्येच त्वांड डोळाभर पगायाबी चोरी! घागरीची तान, पन घोटानच भागवाया व्होवी. त्येबी पल्कारल. आजपोतुर ह्येबी सुक कुट कपाळी व्हत! गार वार आल म्हंजी वाट जनू माज्या रगूऱ्याच अंगावरच. आता त्येच कांबरुनबी प्वोटाशी धराया गवासत, आन् त्येन व्हटाला लावल्याली वाटी व्हटाशी धराया गवासती! त्येच कांबरून, आन् त्येचा वाडगा धुयाला योळ लागला म्हंजी बामन ह्ये डोळ फाडतुया! पन त्येच्या रागापायी मी ह्ये सुक दवडू व्हय? कंदी न्हाई व्हनार! ह्या पैरनीला रगूच अंग लागल हाय, आन् ह्या वाडग्याला त्येचा व्हट लागला व्हता, म्हून तर ह्य इक्त ग्वाड! न्हाईच मी ह्ये बिगीबिगी धुयाची! ती घान न्हव, तीरत हाय. माज्या रगूच पावलबी मी ऐकल. तवा काळीज कस धडाडा उडाया लागल. आता त्येच दरसन जवा व्हईल तवा त्या माज्या परानाला भ्येटाया ह्ये परान जातील अस म्या वाटतया. ग्येल त ग्येल! त्येच्यापायी तर ह्येची इक्तो पत्रास! या पैरनीवानीच पैरन घालून त्यो कोन चाललाया त्या बामनासंग? त्यो माजा रगूच हाय! मी त्येला अटरा वरसामाग पगितल व्हत. पन वळख अक्षी ताजीच हाय जनू! बिगीबिगी जाऊनशानो त्यो कुट चाललाया त्ये पगाव. माज पाय तर लटलटा कापाया लागल. पन कसबी फरपटत त्येच्या माग जाया होवच. ( जाते. )

---

## प्रवेश ४ था.

[ रघुनाथ, कांता व कल्याण ]

रघु०:—कांतातार्इ, तुझा तो पुणेचा वाहुटा झाडावर चढलेला मीं पाहिला, आणि तडक धांवतच निघालों इकडे यायला.

[चाल—अब घन बरसे०]

प्रिय मज किती तरि केतु हा। दावि शशांकातें पहा
॥ ध्रु० ॥ केतु नभींचा झांकुनि विधुतें। निर्मि भयातें
तो महा ॥ १ ॥

(कौसल्या येऊन आडून ऐकत उभी रहाते.)

कल्या०:—बाळासाहेबांबरोबर धांवतां धांवतां माझ्या पायाचे तुकडेच पडायला झाले आहेत.

कांताः—पण कल्याण, तुला कोणीं सांगितलें रघूदादाबरोबर धांवत जायला ! जेव्हां पहावें तेव्हां आपला येथें नेमका ठेवलेला !

कल्या०:—त्याला तसेंच कांहीं कारण आहे.

कांताः—कायरे कारण आहे, कल्याण ?

कल्या०:—तें एक मला माहित कीं नानासाहेबांना. तिसऱ्या कोणा चिटपांखरालाहि माहीत नाहीं.

कांताः—कांहीं तरी थाप देऊन वेळ मारून न्यायची हें तुझें नेहमींचेंच आहे.

कल्या०:—तुम्हांला इत्थंभूत वर्तमान कळलें म्हणजे आपोआपच कळून येईल कीं ही थाप नसून खरी गोष्ट आहे.

कांताः—मग तें वर्तमान कळूं तरी दे.

कल्या०:—वाः ! नानासाहेबांनीं माझ्यासारखा भरंवशालायक माणूस पाहून जी कामगिरी गुप्तपणें करायला सांगितली ती दुसऱ्यांपाशीं सांगायला वाटतें ? वास्तविक पाहिलें तर त्यांनीं ती कामगिरी माझ्याच सूचनेवरून मजकडे सोंपविली. तुम्हांला माहितच आहे कीं, नानासाहेब प्रत्येक गोष्टींत माझा सल्ला घेतात, आणि सल्ला घ्यायला जर का चुकले तर सपशेल फसतात. परवां नानासाहेबांच्या सासुरवाडीकडील तीं दोन कुणबटें आश्रयाला आलीं, तेव्हां त्यांना ते प्रथम दादच देत नव्हते. मीं जेव्हां म्हटलें कीं 'नानासाहेब, मनुष्यानें आपलें मन नेहमीं उदार ठेविलें पाहिजे.', तेव्हां कोठें त्यांनीं त्यांना ठेवून घेतलें.

कांताः—तीं कुणबटें गेलीं मसणांत ! आधीं तूं आपणाकडे आमच्यासंबंधानें कोणती कामगिरी घेतलीस तें कळूं दे.

कौस०:—(एकीकडे) अग सटव्ये! आमाला मसनात पोचवून्शोनी तू रगूला घ्येऊनशेनी बसनार व्हय?

कांता:—तुला जर तें गुपित सांगायचें अवघड वाटत असेल तर त्याला एक युक्ति आहे.

कल्या०:—कोणती ती?

कांता:—तूं नाटकांतलीं आत्मगत भाषणें ऐकिलीं आहेस ना? बोलणारा तीं स्वतःशींच बोलत असतो; पण तीं दोनदोन तीनतीन हजार प्रेक्षक खुशाल ऐकत असतात. तूंहि तसेंच कर. तूं हो स्वगत भाषण करणारें पात्र; आणि आम्ही होतों प्रेक्षक.

कल्या०:—काय करावें! मोठी पंचाईत येऊन पडली! तरी मीं नानासाहेबांना म्हटलें होतें कीं, 'नानासाहेब, मुलें जात्या भांडखोर आणि शिवराळ आहेत, नेहमीं रागावतात, रुसतात, वर्दळीवर सुद्धां येतात ही गोष्ट खरी आहे. पण त्यांच्यावर पाळत ठेवण्याचें काम माझ्याकडे नका सोंपवूं. मीं आपला एक पोक्त सल्ला दिला इतकेंच काय तें.' पण म्हणतात ना, 'लग्न करा म्हटलें, तर तुम्हीच व्हा बायको.' तशी गत झाली.

कांता:—कल्याण, तूं तरी बराच आहेस कीं! नानासाहेबांपाशीं आमची नालस्ती करितोस का? कधीं पाहिलेंस रे आम्हांला भांडतांना? सत्याळ कुठला!

कल्या०:—तुझ्या भांडखोरपणाचा आणि शिवराळपणाचा याहून निराळा पुरावा नको.

रघु०:—कांताताई, त्याच्या काय नादीं लागतेस? जाऊं दे त्याला.

कांता:—मी नाहीं गप्प बसणार. आपण कधीं एकमेकांना चिमटे घेतों, कीं ओचकारे घेतों, कीं शिव्या देतों? करतों तरी काय असें यानें आमची कागाळी करायला? कल्याण, आम्ही नेहमीं खेळत नसतां रे?

कल्या०:—खेळत असलां तरी सुधेपणानें खेळतां थोडीच! पत्ते वांटतांना लबाडीच केली, डावच पाहिला, डोळ्यांनीं खुणाच केल्या, अशा तक्रारी सारख्या चाललेल्या असतात. कांताताई, तोंडानें मात्र तूं डावांतल्या साऱ्या राजाराण्यांचीं लग्नें लावीत असतेस. पण वागणुकींत पाहिलें तर रुसव्याफुगव्याशिवाय बोलणें नाहीं. जणूं काय त्या लग्नांतली विहीण आणि

करदली तूंच असतेस. खरें सांगूं तुला ? हे तुमचे नवे खेळच मुळीं आम्हांला पसंत नाहींत. एकाचें नांव म्हणे गुलामचोर ! दुसऱ्याचें काय तर गधेकोट ! अशा खेळांत लाथांचा सुकाळ झाल्यास नवल नाहीं. तोच आमचा जुना दशावतारी गंजिफांचा खेळ पहा. तीं वाटोळीं गरगरीत पानें आणि त्यांवर ते रंगीबेरंगी ठिपके ! तें साहित्य पाहूनच खेळायचें स्फुरण चढे. तो खेळ मर्दानी होता. कांहीं पानांवर धनुष्यबाण, तरवारी, परशु इत्यादि शस्त्रें, तर कांहींवर युद्धांत वाजवायचा शंखच काढलेला असायचा.

कांताः--खरोखर तो खेळ तुला शोभण्यासारखाच होता.

कल्या०:--बरें, पानें तरी थोडींथोडकीं असायला पाहिजे होतीं ? छेः! रांगेनें मांडलीं तर पलटणच उभी राहिल्याचा भास व्हायचा ! किंवा एखाद्या पंगतीकरितां पात्रें मांडलीं आहेत असेंच वाटायचें ! त्यांची नुस्ती गल्लद करायला ते पूर्वींचेच वीर पाहिजेत. येरागबाळाचें काम नाहीं. बरें, तो खेळ संसारी माणसांकरितां होता तसाच परमार्थी माणसांकरितांहि होता. सहज खेळतां खेळतां दाही अवतारांचीं नांवें तोंडांत येऊन पुण्य घडायचें.

कांताः--बैठ्या खेळांबद्दल तुझें म्हणणें बरोबर असेल. पण तें जुन्या मैदानी खेळांना लागू पडतें का ?

कल्या०:--ते खेळ तर त्याहूनहि नामी ! आट्यापाट्या, खोखो, हुतुतू, चेंडूदांडू, लपंडाव, अंधळीकोशिंबीर--

कांताः--नांवें तर खूपच विचित्र दिसताहेत ! काय म्हटलें अंधळी-कोशिंबीर ? कोशिंबीर ती कशी अंधळी असणार ? तिच्यांत उसाचे डोळे घालीत नसतात ह्मणून वाटतें ?

कल्या०:--अग वेडे, ती पानावरची कोशिंबीर नसते हो. पण तुझी आहे मुलीची बुद्धि ! स्वैंपाकापलीकडे थोडीच जायची आहे !

कांताः--कल्याण, तुला बरीच माहिती आहे कीं ! सांग पाहूं ही अंधळीकोशिंबीर कशी खेळतात ती ?

कल्या०:--ज्यावर राज्य येतें त्याचे डोळे घट्ट बांधायचे, आणि

त्यानें इतरांना शिवायचा प्रयत्न करायचा. ज्याला तो शिवेल त्यावर राज्य जातें.

कांता:---प्रत्येकजण आपणावर राज्य घेण्यासाठीं अगदीं उतावळा होत असेल, नाहीं ? अर्थात्च अंधळ्याकोशिंबिरीतल्या राजाला एकाच वेळीं पुष्कळजण शिवत असतील.

कल्या०:---अग हें राज्य नुस्तें नांवाचें. ज्यावर राज्य येतें त्याला डोक्यावर मोठें ओझें येऊन पडल्यासारखें वाटतें.

कांता:---खऱ्या राजासारखेंच !

कल्या०:---आणि त्याच्यापासून बाकीचे सारे दूरदूर पळतात.

कांता:---हेंहि पण खऱ्या राजाप्रमाणेंच. कल्याण, तूं स्वतः आपणावर राज्य घेऊन अंधळीकोशिंबिरि खेळल्यावांचून तिचा अर्थ आमच्या लक्ष्यांत येणार नाहीं. घेतोस का राज्य ? वास्तविक म्हटलें तर तुझ्यासारख्या शहाण्या माणसानें खराखुराच राजा व्हायचें. पण दैवाची रेषा कुठें चुकली कुणास ठाऊक ! तुझ्या कपाळीं अंधेरनगरीचें राज्य यायचें, त्याबद्दल अंधळ्याकोशिंबिरीतलेंच येत आहे. पण हलकें काम कां होईना ! तें नीट बजावण्यावरच माणसाची योग्यता असते.

रघु०:—कांते, कां उगीच त्याची थट्टा करतेस ?

कल्या०:---बाळासाहेब, थट्टा कोणती हें मला कळतें हो ! हं, कांताताई, बांध बरें या उपरण्यानें माझे डोळे.

रघु०:—माझें बोलणें तुला रुचत नसेल तर तुझ्याच मर्जीप्रमाणें होऊं दे. अंधळीकोशिंबीर खेळण्याच्या पूर्वींच तुझी दृष्टि अंधळी झाली आहे, त्याला तूं तरी काय करणार ?

कांता:---( कल्याणाचे डोळे बांधीत ) कल्याण, पण या खेळांत थोडासा उणेपणा राहिला आहे गडे ! तो मी काढून टाकूं का ?

कल्या०:---आमच्या जुन्या खेळांत कसलाहि उणेपणा नाहीं सांपडणार.

कांता:---तूं झाला आहेस अंधळा. तुला तो कसा दिसणार ? हें पहा. ही कोशिंबीर नुस्ती अंधळीच आहे. ती अंधळीप्रमाणें बहिरीहि केली



कल्याण:—बांध बरं या उपरण्यानें माझे डोळे. [ अंक १ ला. प्रवेश ४ था. पान २८

तर कितीतरी मौज होईल, नाहीं बरें? कल्याण, तूं रसिक आहेस. तुला ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे.

कल्या०:—तें आलेंच ओघाला. पण त्याकरितां मला कानांत कापसाच्या गुड्या घालाव्या लागतील. हा जानवें करायचा कापूस माझ्या खिशांत आहे, त्याचाच त्या कामीं उपयोग केला म्हणजे झालें.

(कानांत बोळे घालितो.)

कांता:—याला म्हणावें धोरण! आतां दिसायलाहि नको, आणि ऐकायलाहि यायला नको.

(कल्याण चांचपडत फिरतो व कांहीं वेळानें पड्यांत जातो.)

रघु०:—बायका फार कारस्थानी अशी जी प्रसिद्धि आहे ती विनाकारण नाहीं.

कांता:—हा कांटा आपल्या वाटेंतून दूर करण्याकरितां मला किती तरी खटाटोप पडला. मला तूं मदत केली नाहींस ती नाहींस, उलट त्याला सावध करायलाच पहात होतास. आणि वर हिणवतो आहेस! रघुदादा, ही सारी हिकमत लढविण्याचें कारण इतकेंच कीं मला तुला एकट्यालाच कांहीं महत्त्वाचें सांगायचें आहे.

रघु०:—मलाहि तुला तसेंच कांहीं सांगायचें आहे. तुला जें सांगायचें आहे तें कशापंकीं आहे?

कांता:—आपल्या नात्याच्या पंकीं.

रघु०:— मलाहि त्य.संबंधानेंच सांगायचें आहे, कांताताई.

कांता:—आज आई आपणांसमक्ष माझ्या लग्नाविषयीं जें बोलली तें तूं ऐकलेंसच?

रघु०:—त्यावरून तर माझा तुझी एकांतीं गांठ घेण्याचा विचार झाला.

कांता:—माझें लग्न झालें म्हणजे मला सासरीं जावें लागेल; हल्लीं तुझी माझी रोजरोज भेट होते, पण लग्नानंतर एखादे वेळींच व्हायची. आई जेव्हां हे शब्द बोलली तेव्हां मला तिचा असा राग आला म्हणतोस!

[चाल—जाव मोरे बंया०]

कोप बहुत परिसुनि वच दाटे॥ भयहि हृदयिं विरह<br>भाव भावुनि वाटे। नयनिं विपुल जल थाटे॥ध्रु०॥

हृत मनुजचरितिं । परिमित सुख किति। सतत अदयमति। छळितचि विधि अति। स्मरुनि नियम मन फाटे॥ १ ॥

रघु०:—पण ती बोलली त्यांत वावगें तें काय होतें ?

कांताः—वावगें नव्हतें काय हें तूंच सांग.

रघु०:—तूं सासरीं गेल्यावर तुझी माझी गांठ पडणार नाहीं हें तर तुला कबूल आहे ?

कांताः—मुळींच कबूल नाहीं.

रघु०:—म्हणजे मला नेणार वाटतें पाठराखणीला बरोबर ?

कांताः—तुला कशाला न्यायला पाहिजे ? तुझें घरच माझें सासर झालें म्हणजे तर आपल्या गांठी पडायला कांहीं हरकत यायची नाहीं ना ?

रघु०:—हाच विचार माझ्याहि मनांत आला होता. पण या गोष्टीला बाबांचा रुकार पडेल कीं काय याची मला भारी शंका वाटते.

कांताः—शंका वाटण्याचें कारण ?

रघु०:—त्यांनीं आपणांला लहानपणापासून एकमेकांना दादा आणि ताई म्हणायला शिकविलें, यांत त्यांचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे.

कांताः—आपण लहान होतों तोंपर्यंत उभयतांनीं बहीणभावांसारखें वागायचें हाच हेतु असणार. दुसरा कोणता असायचा ?

रघु०:—आणि आतां आपण मोठीं झालों आहोंत, आणि आपल्या हृदयांत निराळेच भाव उद्भवले आहेत, तेव्हां ते शब्द वापरण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं, असें तुझें म्हणणें ?

कांताः—अर्थात्च. अंतःकरणांत कोमल भाव खेळूं लागले असतां दादा ताई या कठोर नांवांनीं एकमेकांना हांका मारणें आणि यजमान घरीं असतां ' तो बाहेर गेला आहे.' अशा अर्थाची पाटी लटकावणें सारखेंच. मला तर त्या शब्दांचा असा तिटकारा आला आहे म्हणतोस ? दादा म्हटलें म्हणजे एक स्थूल शरीराचा आणि मंद बुद्धीचा माणूस पुढें उभा रहातो; आणि ताई म्हणजे रोडकी आणि अव्वरट अशी मुलगी कल्पनेसमोर उभी रहाते. मी अशी नाहीं, आणि तूंहि तसा नाहींस. शिवाय या दोन्ही नांवांत नुस्तीं दंत्य व्यंजनेंच आहेत. वल्लभ-

रमणींच्या नांवांत कंठ्य, दंत्य, ओष्ठ्य यांपैकीं प्रत्येक वर्गाचीं, निदान दोन वर्गांचीं तरी व्यंजनें पाहिजेत.

रघु०—मग मला आता तूं कोणत्या नांवानें हांक मारणार ?

कांताः—लग्नापूर्वी नुस्ती 'रघुनाथ' म्हणूनच हांक मारीन. लग्नानंतर तर 'रघु' या शब्दाचा पडदा सुद्धां नकोसा वाटेल; आणि नुस्ती 'नाथ' अशीच तुला हांक मारीन.

रघु०ः—वास्तविक म्हटलें तर लग्नानंतर तुझ्या नांवांत बदल व्हायला पाहिजे. पण मी तुला लग्नापूर्वीं आणि नंतरहि 'कांते' या नांवानेंच संबोधीन. माझा एकनिष्ठपणा तुझ्यासंबंधानेंच केवळ नाहीं, तर तुझ्या नांवासंबंधानें सुद्धां तुझ्या प्रत्ययाला येईल.

कांताः—रघुनाथ, खरेंच का तूं आजन्म माझ्याशीं एकनिष्ठपणानें वागशील ?

रघु०ः—कांते, जोंपर्यंत शरीरांत प्राण आहे, डोक्यांत बुद्धि आहे, हृदयांत भावना आहेत, आणि त्यांवर माझें स्वामित्व चालत आहे, तोंपर्यंत माझा प्राण, बुद्धि आणि भावना तुझ्याच आहेत असें समज. यापुढें माझ्या स्मृतीला, इच्छेला, कल्पनेला तुझ्याशिवाय अन्य विषय रहाणार नाहीं.

[ चाल—ये तुने क्युं करके० ]

मूर्ति हृत्सिंहासनीं स्थापीन मधुरा ही तुझी। नच समर्था
त्या पदापासोन ढळवाया दुजी ॥ ध्रु० ॥ बद्ध केलें
गाढ तूतें हृदयीं या माझ्या भुजीं। मृत्युविण ना
शक्ति दुसरी सोडवाया शक्त जी ॥ १ ॥

जोंपर्यंत माझें शरीर व माझें मन स्वतंत्र आहेत तोंपर्यंत तीं तुझ्याच तंत्रानें चालणार. या शरीरावर हुकमत चालविणारी इतर सत्ता या जगांत असूं शकेल; पण मनावर ताबा फक्त तुझाच.

कांताः—रघुनाथ, तुझ्या शरीरावर दुसऱ्याची सत्ता चालूं शकेल हें ऐकून माझ्या हृदयाला कसा थरकांप सुटत आहे.

रघु०ः—इतकें भिण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या शरीरावर बाबांची सत्ता आहे ना ? मग ती गोष्ट नाकबूल करण्यांत मतलब कोणता ?

कांताः—आणि त्यांनीं तुझा शरीरसंबंध दुसरीशीं लावून दिला तर ?

रघु०:—मला नाहीं वाटत ते माझ्या इच्छेविरुद्ध माझ्या शरीराची आसक्तीस लावतील असें. अशी नसती भीति आपण उगीच करूं लागलों तर असेंहि नाहीं ह्मणतां येणार का कीं मालतीकाकू तुझें लग्न दुसऱ्याशींच लावतील ?

कांता:—आई माझ्या अगदीं अर्ध्या वचनांत असते.

रघु०:—आणि बाबा माझ्या अर्ध्या वचनांत नसतात वाटतें ?

कांता:—कोणीं सांगावें ? कदाचित् त्यांच्याकडून आपल्या लग्नाला विघ्न न झालें तर एखाद्या तरुणीकडून होईल. माझ्यापेक्षां कितीतरी सरस मुली तुला वरायला टपल्या असतील. मी मूळचीच पडलें अशी वेडीविद्री! त्यांतून मनुष्य एकदां प्रेमानें वेडें झालें कीं तें आपल्या वल्लभापासून कांहींएक चोरून ठेवीत नाहीं; दोष सुद्धां उघड करून दाखवितें. मग त्या दोषांमुळें त्याचा वल्लभानें जर अव्हेर केला तर त्यांत त्या वल्लभाचा कसचा दोष?

रघु०:—वल्लभेच्या प्रेमामुळें कदाचित् तिच्या गुप्त दोषांवर प्रकाश पडत असेल. पण त्यानें तिच्या गुणांसहि इतकी उज्ज्वलता येते कीं त्यांजपुढें ते दोष फिक्के वाटावयास लागतात. प्रेमाला प्रणयिजनाच्या दोषांसंबंधानें जें अंधत्व येत असतें त्याला कारण प्रणयिजनाचें प्रेमच होत असतें. कांते, तुझ्या मुखावर प्रेमामुळें इतकी कांति आली आहे कीं त्याजपुढें जगांतील अत्युत्कृष्ट सौंदर्यहि निस्तेज वाटेल. प्रेम अनेकदां अत्यंत कुरूप माणसावर बसलेलें दिसून येतें, त्याचें रहस्य हेंच असलें पाहिजे. त्या कुरूप माणसाच्या चर्येंत, वाणींत, विचारांत प्रेमानें जी कांति घडून येते तिजमुळें तें माणूस सुंदर पण निष्प्रेम माणसापेक्षां सुंदरच दिसूं लागतें यांत नवल नाहीं.

कांता:—प्रेम याप्रमाणें मनुष्याचें निवड करण्याचें स्वातंत्र्य हिरावून घेत असेल तर तो त्याचा मोठाच जुलूम ह्मणायचा !

रघु०:—कांते, असें ह्मणूं नकोस. प्रेम स्वातंत्र्य कधींहि हिरावून घेत नाहीं. तें प्राकृत दृष्टीबद्दल दिव्य दृष्टि देतें इतकेंच काय तें. जगांत सद्गुणांच्या मुळाशीं बहुधा भीति असलेली दिसून येते. स्वातंत्र्य व सद्गुण यांची एकवाक्यता करण्याची कला प्रेमासच काय ती अवगत असते. प्रणयिजनाशीं एकनिष्ठतेनें वागण्याचा उपदेश परिणामकारक रीतीनें कर-

णारा गुरु प्रेम हा एकच होय. तो नसता तर जगांत चोहोंकडे अनाचार माजला असता.

कांताः—तुझे यावा किंवा एखादी तरुणी आपल्या प्रेमांत विब्वा घालील ही माझी भीति विनाकारणहि असेल. पण मला आज असें वाटूं लागलें आहे कीं, आपण जगांत दोघेंच असतों आणि आपण ज्या रमणीय जागेत बसलों आहोंत तिच्यासारखेंच जग मर्यादित असतें तर किती तरी चांगलें झालें असतें. या जागेच्या चौफेर टेंकड्या असून मध्यभागीं वृक्षलतांनीं वेष्टिलेलें हें तळें आणि या तळ्याच्या पाळ्याशीं आपणच काय ती बसलों आहोंत. जग जर हुबेहुब असेंच असतें तर त्यानें नंदनवनाची बरोबरी केली असती. पिंवळ्या गवतानें आच्छादिलेल्या या टेंकड्यांच्या कोंदणाला हें जिवंत पाण्याचें कासाररूपि रत्न किती तरी शोभतें आहे! आणि त्या गाढ व निर्मल पाण्याला शोभण्यासारखें असेंच आपलें प्रेमहि आहे! पण या टेंकड्यांच्या पलीकडे त्या प्रेमाच्या आड यावयाला किती तरी विघ्न टपलीं असतील. रघुनाथ, मी विचार करूं लागलें म्हणजे माझ्या मनांत पुढील अनर्थाबद्दल नाहीं नाहीं ते विचार येतात.

[ चाल—मोरी नाहीं चले० ]

कुटिला विधिची गति वांकडी। वहु करित उभा ते तो
सांकडीं ॥ ध्रु० ॥ प्रणयाचा पथ सुगम असेना। त्या-
मधिं नाना। नडति नडी ॥ १ ॥

कौस०:—(एकीकडे) माज्या बाळाच परेम चोरूनशानी वर साळसूदपन बोलतिया कशी चुरुचुरु!

रघु०:—(कांतेच्या खांद्यावर हात ठेवून) गडे कांते, तुझ्या सहवासांत या टेंकड्यांनीं मर्यादित अशा लहानशा जगांतच जन्मभर तुझ्याकडे सारखी टक लावून आयुष्य कंठण्याला मी तयार आहें. तूं माझें जीवन असतां मला निराळ्या जीवनाची जरूर काय? फार काय, पण एखादा मांत्रिक सारें जग एका क्षणांत पाषाणमय करूं लागला तर मी तुझ्या सोबतीला पाषाण होऊन अशाच स्थितींत रहावयाला आनंदानें सिद्ध होईन. आपलें असें रूपांतर झाल्यावर पुढेंमागें जगांत पुन्हां मनुष्यांची

वस्ती होऊन आपल्या मूर्ती त्यांना दिसल्या तर त्या कोणाच्या असाव्याशा त्यांस वाटतील ?

**कांता**:—इतक्या प्रेमळ मूर्ति रतिमदनांवांचून दुसऱ्या कोणाच्या असणार ? रघुनाथ, या जगांत सौंदर्य आणि तारुण्य ही अत्युत्तम जोडी देवानें निर्माण केली खरी, पण त्यांच्या मागें काळ व मृत्यु यांचा ससेमिरा कशाला लावून दिला कोणास ठाऊक ! आपण सौंदर्याच्या आणि तारुण्याच्या ऐन शिखरावर बसलों असतांना त्याच स्थितींत कायम ठशाचीं झालों तर किती तरी चांगलें होईल !

**रघु०**:—आपणांला इतक्या मोकळ्या मनानें बोलायला आजच पहिल्यानें सांपडलें. त्यामुळें काय बोलूं आणि किती बोलूं असें आपणांला झालें आहे. जन्मल्यापासून जगण्यासारखे हेच क्षण काय ते गेले.

[ चाल—रंग रंगिली छबिली० ]

सुखशिखरिं बसत हंसत हे प्राण। सुखजलधिमधिं
बुडत तृपित जाण ॥ध्रु०॥ आत्मा आत्म्याशीं संभापण।
जीव जिवाशीं हृदयनिवेदन । निर्वृतिमग्न करीत गमे
कीं समसमान ॥ १ ॥

पण या सुखालाहि मर्यादा आहे. तो अंधळा आणि बहिरा राजा आपलें राज्य हांकतो आहे तोंपर्यंतच आपणांला आपलीं प्रेमानें ओथंबलेलीं मुखें दिसणार, आणि प्रीतीनें वाहून चाललेलीं भाषणें ऐकायला सांपडणार. दुसऱ्याच्या कमीपणावर आपलें सुख अवलंबून नसतें तर किती चांगलें झालें असतें. (कल्याण प्रवेश करितो.)

**कांता**:—ती पहा स्वारी आलीच जवळ नांव घेतल्याबरोबर. कशी झिंगल्याप्रमाणें झोंके घेत आहे ! आतां त्याच्या खेळांत मिसळलों नाहीं तर त्याला संशय मात्र यायचा. (कल्याणाच्या हातीं लागते.)

**कल्या०**:—(कांतेला धरून) अरे वा ! सांपडलीस शेवटीं ! मला वाटूं लागलें होतें कीं मी सारा दिवस असाच भटक्या मारीत रहाणार की काय ! बाकी तुम्ही अलीकडील मुलें खेळण्यांत अगदींच कुचकामाचीं ! मी जर तुमच्या जागीं असतों आणि या अंधळ्या आणि बहिऱ्या कोशि-

विरींचें राज्य तुमच्यापैकीं कोणावर असतें तर मी अशा झुकांड्या दिल्या असत्या कीं यंव रे यंव !

कांताः—कल्याण, हा खेळ आम्हांला फारच आवडला. तुझें राज्य चालू असतां आही प्रजाजन कसे निर्धास्त होतों.

कल्या०ः—इतका वेळ तरी तुह्मीं मला गुंगारा कसा दिलात याचेंच नवल वाटतें. एक एका दिशेला आणि दुसरा दुसऱ्या दिशेला, अशीच कांहीं तरी हिकमत लढविली असेल. खेळ चालू असतां एक शब्दहि बोललां नाहींत ही खबरदारी सुद्धां तुम्हीं घेतलीत हें ठीक झालें. आहांत, होतकरू आहांत !

कांताः—कल्याण, दरखेपेस असाच एखादा जुना खेळ शिकवीत जाशील ना ? मात्र राज्य नेहमीं तूं घेतलें पाहिजे. तुझें राज्य म्हणजे दुसरें रामराज्य ! खरोखर आमच्या पाळतीवर रहाण्याची कामगिरी तूं आपल्या अंगावर घेतलीस हें कितीतरी सोईचें झालें. तुझ्यावांचून आमची करमणूक अगदींच फिक्की पडली असती.

कल्या०ः—म्हणजे ? मीं तुमच्या पाळतीवर रहाण्याचें नानासाहेबांपाशीं कबूल केलें हें तुह्मांला कसं कळलें ?

कांताः—तें आपलें आम्हीं तर्कानें ताडलें इतकेंच काय तें.

कल्या०ः—मग कांहीं हरकत नाहीं. का म्हटलें मीच बेसावधपणानें बोलून गेलों !

कांताः—छे छे, तसं कसं होईल !

कल्या०ः—चला आतां घरीं. फार वेळ झाला. (चालूं लागतो.)

कांताः—(रघुनाथाचा हात धरून त्याच्या कानांत) रघुनाथ, यापुढें तुझा वियोग क्षणभर सुद्धां सहन होणार नाहीं. मग मी प्रहरांमागून प्रहर कसे कंठूं ? मी आसवांनीं उशी जरी चिंब करून टाकिली तरी तुझा हात या हातांत उद्यांपर्यंत धरावयास सांपडणार नाहीं. हा एका दिवसाचा विरह सोसण्याला मला बळ यावें ह्मणून माझें तुजपाशीं एक मागणें आहे.

[ चाल—कुसुंबी कुसुंबी० ]

रुचेना पचेना तुझ्या मतिसी हें । निरपेक्षपणेंही हास्या-

स्पद जरि आहे ॥ परंतु न किंतु जरा तूं धरावा। अनु-
सरें तया जरि धरिसी प्रेमल भावा ॥ सुभगीं लिहावीं
दिवसभर पत्रें। विरहतापिं मज जीं गमतिल शीतल
छत्रें ॥ मधोनी मधोनी निरोपहि धाडीं। प्रखर दाहिं
मम जो मधुर अमृतची सोडी ॥

मला सोबत म्हणून तुझी एखादी खूण देतां येणार नाहीं का? तुझ्याशीं सुद्धां मी जितक्या सलगीनें वागत नाहीं तितकी त्या खुणेशीं करीन.

रघु०:—(आपला हातरुमाल तिच्या हातीं देऊन) हा घे. आतां झालें समाधान? हा आज रात्रीं तुझ्या पवित्र अश्रूंनीं भिजवून उद्यां मला परत दे. पण तूं नाहीं का आपली एखादी खूण मला देणार?

कांता:—माझ्या वेणींतलें हें गुलाबाचें फूल मी तुला देतें. तूं माझ्या-प्रमाणें अश्रु गाळीत बसणार नाहींस ही माझी खात्री आहे. पण तूं तें फूल हृदयापाशीं धरून व त्यावर सुस्कारे सोडून म्लान करून सोडशील हीं सुद्धां माझी खात्री आहे. उद्यां हें फूल मला परत दिलें पाहिजे; ह्मणजे मांत्रिकानें फुंकरलेल्या वस्तूप्रमाणें मी तें ताइतांत घालून नेहमीं गळ्यांत वागवीन.

कल्या०:—अरेच्चा! किती तरी सावकाश चाललां आहांत? अली-कडच्या पोरांत ताकदच कमी. तुमच्यापेक्षां मी पोक्त माणूस बरा.

(एका बाजूनें कल्याण व त्या बरोबर रघुनाथ कांतेकडे निश्चळ दृष्टीनें पहात जातो. दुसऱ्या बाजूनें कांता रघुनाथाकडे तशीच पहात जाते.)

कौस०:—(स्वतःशीं) द्येवा, मला माज्या ल्येकराच त्वांडबी पगाया वंदी, आन् ही चेटकीन त्येच्यासंग पारनपार कानगोट करतिया! न्हाई! आता असच करायच! काईबी करीन, पन रगूची माया माज्याकड वडीनच वडीन! (जाते.)

अंक पहिला समाप्त.

# अंक दुसरा.

—:०:—

## प्रवेश १ ला.

[ उद्धवराव, दशरथ व कौसल्या. ]

उद्धव०:—कौसल्याबाई, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. मी सारा बंदोबस्त करितों.

कौस०:—नानासाब, माज काबारी रगूच बा. पन त्ये न्हायल बाजूलाॅ, आन् आपुनच त्येच या व्हकूनशेनी बसलासा. त्येच न्हाई मला इक बंगाळ वाटत. पन ह्ये कालची गुडग्यावानी प्वार माजी माया कशापायी हिसकावून घ्येनार !

उद्धव०:—मीं सांगितलें ना कीं तुम्ही बेफिकीर रहा म्हणून ! तुम्ही आतां येथेंच उभ्या राहिलांत तर उगीच कोणाला संशय यायचा.

कौस०:—मंग ! संशव आला तर त्येच काय इस्तं भ्या ! मी त्येची आई, नऊ म्हइन वझ वागवल, अंगावर पाजल, हाताखांद्यावर ख्येळवल्ल, इंटाळाचंडाळाच भ्या धरल, त्ये संमद ग्येल चुलीमंदी ! मला जालिंया चोरी, आन् जगाला जालिया उजागगी ! काय ह्यो उफराटा अन्याव बगा !

दश०:—ह्ये बग कारभारनी, तू आई जालियास म्हून त्येच्या सुकात माती कालवनार व्हय ! त्यो तुज्या प्वोटी आलाया, आन् माज्या प्वोटी न्हाई आला जनू ? मंग मी न्हाई त्येचा जवातवा दिमाक दावीत ? असा आरडावरडा करन्यान काय व्हईल ठाव हाय ? तू भीक मागत जाशील, आन् आपल्यासंग त्येला बी न्येशील.

कौस०:—त्यो माझा ल्योक हाय, तर माज्यासंग भीक बी का न्हाई मागनार ?

दश०:—त्येच्यासंग तुला शिरमंतीमंदी न्हाया नग,आन् त्यो तुज्यासंग भीक मागल व्हय ? येडी ईस जाल ! पुर म्हन तुजी पिरपीर ! आवानी

मर्दासंग घडीघडी बोलन ब्येस न्हाई दिसत. तू तकड जाऊनशेनी बस आपल्या खोलीमंदी.

कौस०:—आवानी मर्दासंग बोलू न्हाई ? आन् मंग ती आवा बरी बोलत बसतिया रगून्यासंग पारनपार ?

दश०:—त्येची बंदूबस्ती नानासाबांनी घ्येतली हाय न्हव आपल्याकड? मंग तुला का होवी त्येची पचाईत ?

कौस०:—तुमी धनी ! म्हंगाल तस ऐकाया व्होव. (जाते.)

उद्धव०:—दशरथबोवा, कौसल्याबाई जर एखादे वेळीं बिथरल्या तर सारें रहस्य ओकून टाकायच्या अशी धास्ती वाटते.

दश०:—हायच ती येडी तशी ! जल्माच्या गाटी ! निबावून घेया व्होव इक्तच !

उद्धव०:—मग त्यांना खरोखरच वेड लागलें आहे असा जर आपण लोकांचा ग्रह करून टाकला तर बरें होईल, नाहीं ?

दश०:—येड कशाच ?

उद्धव०:—मुलाबद्दलचें. त्यांचा मुलगा लहानपणीं हरवल्यामुळें त्या वयाचा कोणीहि मनुष्य दिसला कीं तो त्यांना आपला गमावलेला मुलगाच वाटतो.

दश०:—व्हय नानासाब, लई नामी युगत!

उद्धव०:—ठीक आहे तर. तुम्ही जाऊन रघुनाथाला जरा मजकडे पाठवून द्या. (दशरथ जातो.) रघुनाथ हा शूद्राचा मुलगा. त्याचा कांतेशीं विवाह होऊं दिला तर भयंकर विश्वासघात केल्याचें पाप माथीं येईल. छे, तसें होऊं देतां उपयोगीच नाहीं. त्यांचें प्रेम मुग्ध आहे तोंपर्यंतच खुडलें पाहिजे. त्यांना एकांत मिळूं नये म्हणून कल्याणाची योजना केली होती. पण तो पडला सगळ्या मुलखाचा बावळा ! त्यानें सगळी मसलत फसूं दिली. अशा प्रकारें रघुनाथावर अविश्वास दाखविण्यापेक्षां त्याच्या इमानावर विश्वास ठेवणेंच शतपट बरें. (रघुनाथ येतो.) रघुनाथ, तुला कां बोलावलें कळलें का ? तुझ्या लक्ष्यांत नाहींच येणार. तुझ्या वयाला आतां वीस वर्षे झालीं. तुझी विद्याहि पूर्ण झाली आहे. तेव्हां आतां

सृष्टीच्या रहाटीप्रमाणें हळू हळू तुझ्या लग्नाच्या विचाराला लागलें पाहिजे. तूंहि या बाबतींत कांहीं तरी विचार केला असशीलच ?

रघु०:—मी काय सांगणार आपल्यापुढें ? आपण जो विचार कराल तो माझ्या हिताचाच कराल.

उद्धव०:—तुझा हा विनय पाहून मला फार संतोष होतो. पण तूं जों जों आपल्या हिताचा भार मजवर टाकीत आहेस तों तों त्या हितास जपण्याची जबाबदारीहि मजवर अधिकाधिक पडत आहे. तिच्यांतून मोकळें होण्याला तूंच मला मदत केली पाहिजेस. ती मदत करायची म्हणजे मी विचारतों त्या प्रश्नांचीं उत्तरें मोकळ्या मनानें दिलीं पाहिजेत.

रघु०:—त्याला मी सिद्धच आहें.

उद्धव०:—मग सांग तर. प्रत्येकानें आपल्या हितापेक्षां समाजाच्या हिताला अधिक जपलें पाहिजे कीं नाहीं ?

रघु०:—तशी आपली मला लहानपणापासून शिकवणी असून लोकहितपरतेचे व स्वार्थत्यागाचे अत्यंत उज्ज्वल धडेहि आपण मला घालून दिले आहेत.

उद्धव०:—विवाहाच्या बाबतींत सुद्धां स्वतःच्या आवडीपेक्षां पुढील पिढीच्या कल्याणाकडेच लक्ष्य देणें योग्य आहे कीं नाहीं ?

रघु०:—अर्थात्च. पण निसर्गाची योजना अशी चातुर्याची आहे कीं, पुरुषानें स्वतःच्या आवडीची पत्नी निवडली म्हणजेच भावी मनुष्यजातीच्या दृष्टीनें सुद्धां योग्य अशी संतति त्या जोडप्यापासून उत्पन्न होते.

उद्धव०:—वराची आवड व समाजाचें कल्याण यांचा असा सुंदर मिलाफ कधीं कधीं दिसून येतो खरा; पण त्या आवडीची त्या कल्याणाशीं नेहमींच सांगड दिसून येईल असें नाहीं. उदाहरणार्थ, उच्चजातीयांचे नीचजातीयांशीं शरीरसंबंध होणें इष्ट आहे कीं नाहीं ?

रघु०:—त्याशिवाय नीचजातीयांची खरी उन्नति घडून येणार नाहीं व हल्लीं जातीजातीमध्यें माजलेलीं वैमनस्येंहि नाहींशीं होणार नाहींत, असा माझा दृढ विश्वास आहे.

उद्धव०:—शाबास ! पण नीचजातीय वधू उच्चजातीय वराला नेहमीं पसंतच पडेल असें नाहीं. सुदैवानें हल्लीं नीचजातीयांमध्यें शिक्षणाचा

प्रसार झाला असून अगदीं ब्राह्मण वधूंप्रमाणें नसल्या तरी जवळजवळ त्यांच्यासारख्या वधू त्यांजमध्यें मिळण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

रघु०:–आपलें म्हणणें खरें आहे.

उद्धव०:––तूं स्वतःच जर एखाद्या शूद्र मुलीचा उद्धार करण्याचें मनांत आणिलेंस तर त्यांत अशक्य असें कांहीं नाहीं.

रघु०:—अशक्य काल नव्हतें; पण आज तें अशक्य होऊन बसलें आहे.

उद्धव०:––म्हणजे ? एका दिवसांत इतका फरक पडण्याचें कारण ?

रघु०:—हा फरक पडण्याला एक दिवस सुद्धां लागला नाहीं. पाव घटकेंतच माझें वैवाहिक चारित्र ठरून गेलें.

उद्धव०:—रघुनाथ, मला विचारल्यावांचून तूं कोणतीहि महत्त्वाची गोष्ट करणार नाहींस अशी मला आशा होती. पण ती खोटी ठरली.

रघु०:––मीं या बाबतींत आपला सल्ला घेतला नाहीं याबद्दल आपणांला वाटतें त्यापेक्षांहि मला वाईट वाटतें; व मी आपली क्षमा व आशीर्वाद मागण्याकरितां संधिच पहात होतों. बाबा, माझ्या आयुष्यांत केवढी क्रांति होत आहे हें मला वेळींच कळलें असतें तर मीं आपला विचार अवश्य घेतला असता पण माझ्या भावनांनीं विचारशक्तीला न जुमानतां माझें अंतःकरण दुसऱ्याच्या स्वाधीन केल्यावरच माझी हानि व माझा लाभ हीं मला कळून आलीं. बाबा, जरी मी आपला सल्ला घेतला नाहीं तरी माझी निवड आपणांला नापसंत पडणार नाहीं अशी खात्री वाटते.

उद्धव०:––तिचें नांव काय ?

रघु०:—कांता.

उद्धव०:—रघुनाथ, काय केलेंस हें ? लहानपणापासून तिला बहीण मानून अखेर तिला विवाहपाशांत गुंतवलेंस ना ?

रघु०:––बाबा, मला बहिणीबद्दलचें प्रेम कसें असतें याचा मुळींच अनुभव नाहीं. पण माझा कांताविषयीं हल्लीं जो भाव आहे त्याहून निराळा भाव माझ्या अंतःकरणांत कधींहि असल्याची मला जाणीव नाहीं; व एका भावाबद्दल दुसरा अगदीं भिन्न भाव आल्यामुळें अंतःकरणाला जो धक्का बसतो त्याचाहि मला अनुभव आला नाहीं. आतां आम्ही ज्या नांवांनीं

एकमेकांस ओळखीत होतों त्या नांवांबद्दल विचाराल तर तीं नांवें वडील माणसांनीं आमच्या भावनांची ओळख नसतांना आमच्या तोंडीं ठेवून दिलीं, त्यांत आमचा काय दोष ? आपल्याकडे बालविवाह होतात तेव्हां वधूवरांच्या परस्परांविषयींच्या भावांची ओळख न करून घेतांच त्यांना पति व पत्नी हीं नांवें देण्यांत येतात. आमच्या प्रेमाचें खरें स्वरूप ओळखण्यापूर्वींच दादा आणि ताई या नांवांनीं परस्परांस संबोधण्याची आम्हांला आज्ञा करण्यांत त्याच प्रकाराची पुनरावृत्ति झाली असें नाहीं का आपणांला वाटत, बाबा ?

उद्धव०:—कांता तुला अनुरूप वधू आहे याबद्दल तर तुझी खात्री आहे?

रघु०:—अगदीं पूर्ण.

उद्धव०:—मग तू समाजहिताकरितां स्वार्थत्याग करण्याला तयार झाल्यास ती त्याला आनंदानें मान्यता देईल अशीहि तुझी खात्री पाहिजे.

रघु०:—अशी माझी खात्री आहे.

उद्धव०:—आणि ती खोटी ठरली तर ?

रघु०:—तर ती मला अनुरूप नाहीं असें म्हणतां येईल.

उद्धव०:—आणि ती तुला अनुरूप नाहीं असें एकदां ठरलें म्हणजे तिच्या अनुरूपतेच्या भरंवशावर तूं तिला दिलेलें वचनहि परत घ्यायला हरकत नाहीं, असंच ना ?

रघु०:—नाहीं नाहीं, वचनभंगाचा दोष मी प्राण गेला तरी मजकडून होऊं देणार नाहीं. बाबा, हा माझा निश्चय आपणांलाहि आवडलाच पाहिजे. कारण माझ्या प्रत्येक विचाराचा, प्रत्येक शब्दाचा उगम आपल्याच शिकवणींत, आपल्याच प्रेरणेंत आहे. आपणच कबूल कराल कीं, नीचजातीयांचा उद्धार करण्यास चुकणें हें अनीतीचें असेल, पण वचनभंग त्याच्या शतपट अनीतीचा आहे. सामाजिक बंधनांवर तो मूर्तिमंत कुठारच आहे.

[ चाल—कहत मन रंग लाल० ]

गणित धन वचना। सत्य होय सकल तारे जन बहु
मानी सतत ॥ध्रु०॥ उचित न सुजनांसी। परतुनि
घ्यायासी। कुपात्रीं दीधलें जरी। वमन सेव्य ना कुणा ॥१॥

उद्धव०:—( रघुनाथास पोटाशीं धरून ) रघुनाथ, तुझ्या ठायीं खरें शिक्षण बिंबलें आहे. तुझ्या प्रामाणिकपणावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

[ चाल—तदानि तदानि० ]

अससि बहु सरल ॥ तव हृदय विमल ॥ध्रु०॥ कुटिल-
गतिविमुख । सुपथिं गणिसि सुख । न संशया स्थल ॥
तव हृदय० ॥ १ ॥

बाळा, तूं आज कांतेचें मन माझ्या बेताला अनुकूल करण्याचा प्रयत्न कर. हा माझा बेत आजकालचा नाहीं; फार वर्षांचा आहे. तो विफल झाला तर माझी एक अत्यंत उत्कट इच्छा मनांतल्या मनांतच राहून गेल्यासारखें होईल. मी आज तुझ्याबरोबर कल्याणाला दिलें नसतें. पण दिलें नाहीं तर त्याला विनाकारण संशय यावयाचा. तुला या कामीं पूर्ण यश यावें अशी माझी इच्छा आहे. ( जातो. )

रघु०:—( स्वतःशीं ) हर हर! केवढा हा दारुण प्रसंग! कांतेला या मुखानें वचन देऊन एक दिवसहि झाला नाहीं. तिनें दिलेलें गुलाबाचें फूल अजून सुकलें नाहीं. आणि मी आतां तिजकडून त्याच मुखानें त्या वचनांतून मुक्तता करून मागणार! काय हें जीवित! त्याला फुलाइतकीहि शाश्वती नसावी ना! हें फूल अजून म्लान झालें नाहीं. पण कांतेचें हृदयपुष्प माझ्या वज्रतुल्य शब्दांनीं विदीर्ण होऊन जाईल तिची वृत्ति सदा आनंदी असायची. काल तर तिच्या आनंदाचा कळस झाला पण आज मीं तिच्याजवळ वचनमुक्ततेची गोष्ट काढिली म्हणजे तिचा आनंद कायमचा मावळून जाईल. तिची माझ्या एकनिष्ठपणाबद्दल खात्री करितांना मीं तिला केवढालीं तरी अभिवचनें व आश्वासनें दिलीं तीं आतां कोणत्या तोंडानें परत घेऊं? यापुढें तिचा एका तरी पुरुषावर विश्वास बसणें शक्य आहे का? तिला पुरुषांपैकीं जो अत्यंत विश्वासुकपणाचा, एकवचनीपणाचा मासला म्हणून पहावयास सांपडला तो अत्यंत हीन, निकृष्ट, नकली ठरला! आतां तिला आजन्म कौमार्यावांचून दुसरी गतिच रहाणार नाहीं. मी मात्र इकडे समाजसुधारणेच्या नांवाखालीं दुसऱ्या तरुणीबरोबर आनंदानें संसार करीत रहाणार! मानवी जीविता तुझ्या अगाचे विरोध तुझ्याशिवाय कोणालाहि उमगणें शक्य नाहीं!

[ चाल—दैंया का गईलो० ]

त्वझीला अगम्या । मनुजमात्रा या ॥ ध्रु० ॥ एक पळीं
सुख । दावुनि विन्मुख । दूज्याची करीसी त्या ॥ १ ॥

(जातो.)

---

# प्रवेश २ रा.

कांता:—(स्वतःशीं) हा बाहुटा उभारला; आतां लवकरच माझा नाथ येथें येऊन पोहोंचेल. बाहुटा पाहिल्याबरोबर तो धांवतच येत असतो. पण तेवढा वेळ तरी मी कसा कंठूं ? माझें हृदय त्याला सामोरें जाण्याकरितांच कीं काय धडधड उडत आहे; आणि त्याच्या वाटेकडे लागलेले हे डोळे त्याच्याकडे धांव घेण्याकरितां आपल्या खिडक्यांवाटे उड्या टाकायला सरसावत आहेत. पण आज त्याला पाहिल्याबरोबर मी त्याच्याशीं नेहमींप्रमाणें मोकळेपणानें बोलेन असें मला वाटत नाहीं. आजच या लाजेनें हृदयांत कुठून ठाणें दिलें कुणास ठाऊक! या रुमालाला लाजण्याचें मला कांहीं कारण नाहीं; तेव्हां याच्याशींच हितगुज करावें. रुमाला, तूं नेहमीं आपल्या धन्याच्या हृदयाजवळच्या खिशांत रहात आला आहेस. त्या हृदयाचें रहस्य तूं हस्तगत करून घेतलें आहेस का ? तुझ्या-जवळ वास करणाऱ्या घड्याळानें हृदयाचे ठोके अवगत करून घेतले आहेत, तशी तूं कोणती विद्या संपादन केली आहेस ? तुझा निर्मळपणा तूं त्या हृदयापासूनच उचलला आहेस का ? घड्याळानें वेळ कळतो, पण तूं जवळ असलास म्हणजे वेळेचें भान रहात नाहीं, हाहि तुझ्या अंगीं एक मोठा गुण आहे. हा गुण तुझ्या अंगीं नसता तर नाथाची वाट पहातां पहातां मी कंटाळून गेलें असतें. पण रुमाला, तूं मला तुझ्या धन्याच्या ठिकाणीं असल्यामुळें माझा वेळ सपाट्यानें चालला आहे. रुमाला, नाथ तुझा उपयोग तोंड पुसण्याकरितांच करितो ना ? मी सुद्धां आपल्या ओठांचा तुला स्पर्श करितें, म्हणजे तुला नाथाचा विरह विशेष भासणार नाहीं.

नाथाच्या ओठांचा तुला कोणत्या ठिकाणीं स्पर्श होत असे बरें ? तूं पडलास मुका; तेव्हां तूं कुठून सांगणार ? मी तुझ्या प्रत्येक धाग्याचें चुंबन घेतें म्हणजे झालें. ( रुमालाचें वारंवार चुंबन घेते. ) आज हा रुमाल तोंडावरून दूरच करावासा वाटत नाहीं.

[ चाल—कैसि शरमकी है बात० ]

फिरवुं किती वदनीं। यातें॥ भिन्न मिषा करुनी। अनेकां ॥ ध्रु०॥ त्या ओष्ठांचा स्पर्श घडे या। म्हणुनी लाज मनीं। उपजे॥ मुख झांकावें पुरतें यानें। बळेंच फिरफिरुनी। वाटे॥ १॥ भालकपोलीं घर्म निर्मी प्रखर वियोगाग्नि। विपुला॥ बिंदु टिपावे त्याचे यानें जे गळती वरुनी। वाटे॥ २॥

( रघुनाथ व कल्याण प्रवेश करितात. )

कल्या०:—कांताताई, आम्हांला आज यायला जरा उशीर झाला, नाहीं ? पण त्याचा माझ्याकडे दोष नाहीं हो. बाळासाहेबच मुंगीच्या पावलानें चालले होते. त्याला मी काय करूं ?

कांता:—कल्याण, असें होणार नाहीं.

कल्या०:—कांताताई, होणार नाहीं कां ? आम्ही काल येथून परत गेलों तेव्हांच नाहीं तूं पाहिलेंस बाळासाहेबांचें पाऊल कसें जड पडत होतें तें ? मग तें आतां येतांना जड पडलें यांत तुला अचंबा कां वाटावा ? काल अंधळ्या कोशिंबिरीच्या खेळांत पाऊल कोठें तरी वांकडें पडून मुरगळल्यासारखें दिसतें. त्या दशरथबोवांकडून चांगलें चेपून घेतलें पाहिजे.

कांता:—दशरथ म्हणजे तो नवीन राहिलेला कुणबी वाटतें ?

कल्या०:—होय, तोच. काय सांगूं कांताताई तुला ! त्याचें प्रेम इतक्यांतच बाळासाहेबांवर इतकें जडलें आहे कीं कोणाला वाटावें यांना तो जन्मापासूनच ओळखतो आहे. यांचें किंचित् डोकें दुखायला लागलें कीं कसा घाबरा होऊन जातो.

कांता:—कल्याण, त्याचें इतकें प्रेम आहे यांत त्याचा तो कोणता चांगुलपणा वाटला तुला ?

कल्याण:—कांताताई, आमचे बाळासाहेब आहेत खरे तसेच मोहक. पण त्यांची मोहनी सर्वांवर सारखी पडते असें समजूं नकोस. त्यांच्या गोड स्वभावावर खूष असलेले मीं पुष्कळजण पाहिले. पण या कुणबटांची तऱ्हा कांहीं निराळीच. काल बाळासाहेबांचें किंचित् अंग उणकत होतें तर तो बिचारा दशरथ त्यांची मालिश करीत अर्धी रात्र जागत होता.

कांता:—इश्श ! त्याच्यासारख्या ओंगळ माणसाकडून अंग चेपून घेववतें तरी कसें म्हणतें मी. अंगाला लसणीची आणि हातांना तंबाखूची घाण मारीत असेल; आणि तोंडांतून चिलमीच्या धुराचा भपकारा येत असेल.

कल्या०:—त्याची बायको कौसल्या तर काल रात्रीं बाळासाहेब निजले असतां खिडकींतून त्यांच्याकडे टक लावून पहात होती. एखादे वेळीं यांना तिची दृष्टीहि लागायची.

कांता:—काय बाई निलाजरेपणा तरी !

कल्याण:—पण मला रुबांत मौज वाटली ती निराळ्याच गोष्टीची. एखादें मनुष्य आपल्या प्रेमांतलें असलें म्हणजे त्याच्या अंगच्या लकबी आणि खोडी उचलण्याकडे साहजिकच आपला कल होतो; आणि त्या कांहीं काळानें आपल्या अंगीं जडतातहि. माझा नानासाहेबांसंबंधानें इतका पूज्यभाव आहे कीं मीं त्यांची चालण्याची ऐट उचलली आहे; आणि बाळासाहेबांवर माझें इतकें प्रेम आहे कीं त्यांची बोलण्याची ढब मला लागली आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या कुणबटांना येथें येऊन दोन तीन दिवसच झाले असतां दशरथबोवांनीं बाळ साहेबांची हंसण्याची लकब आणि कौसल्याबाईनीं त्यांची रागाची चर्या हुबेहुब उचलली आहे.

कांता.—मला नाहीं आवडत असा लोंचटपणा आणि तोंडपुजेपणा ! कल्याण, ती बया नाहींना तुझ्या धाकट्या यजमानांचे पाय चेपीत ?

कल्याण:—अजून नाहीं चेपीत. पुढचें कोणीं सांगावें !

कांता:—ती माझे पाय चेपायला जर आली तर मी तिला लाथेनें दूर लोटून देईन. अशी घाणेरडी बाई माझ्या खोलींत सुद्धां मला खपायची नाहीं. ओंगळपणानें सारी हवा बिघडवून टाकील.

कल्याणः---कांताताई, हें मात्र अगदीं खरें! यांच्या चालीरीतीच अमंगळ. काल ती बाई बाळासाहेबांचा मळलेला सदराच पोटाशीं धरून बसली, आणि बाळासाहेबांच्या उष्ट्या फुलपात्रांतून घटाघटा पाणी प्याली.

कांताः---तिला जर अशीच शफारूं दिली तर ती भलत्याच थराला जाईल. कोणी नेम सांगावा? कल्याण, मला नाहींत या घाणेरड्या गोष्टी आवडत. आपण आतां खेळच खेळूं या. आज आह्मांला लपंडाव शिकीव. आज सुद्धां राज्य तुझ्यावरच.

कल्याणः---बरें आहे. तुमच्यापैकीं एकानें माझे डोळे झांकायचे, आणि दुसऱ्यानें लपायचें. डोळे झांकणाराला खुंट म्हणतात. त्यानें सुट्यो म्हटलें कीं मी लपलेल्याला शोधायला जाईन. माझ्यामागें तो जर खुंटाला येऊन शिवला तर पुन्हां राज्य माझ्यावरच यायचें.

कांताः---पण या परातीसारख्या जागेंत लपायला जागा तरी आहे का?

कल्याणः---मग आमच्या किंवा तुमच्या घरांत जाऊन लपावें. ना कोणाची आहे?

कांताः---खेळणारा पटाईत असला म्हणजे प्रतिपक्ष्याच्या वाटेल त्या शर्ती कबूल करितो.

कल्याणः---मग आतां उशीर कशाला? कांताताई, कोण झांकतं माझे डोळे?

कांताः---मीच झांकतें. (कल्याणाचे डोळे झांकते, व रघुनाथास खुणेनें आपल्यामागें लपावयास सुचविते. रघुनाथ तिच्यामागें लपतो.)

कल्याणः---हं, उघडतेस ना डोळे?

कांताः---लपणाराला घरीं जाऊन लपायला वेळ तर पाहिजेना? तुला उतावळें व्हायला काय होतें? पण त्याला लपण्याजोगी जागा शोधून काढावी लागते ना? (जरा थांबून) हं, सुट्यो!

कल्याणः---हा पहा मी बाळासाहेबांना हुडकून काढितों. (पळत जातो.)

रघुनाथः--कांते---

कांताः---काय म्हटलें नाथ--नव्हे रघुनाथ!

रघुनाथः---तूं आज माझ्यावर रागावल्यासारखी दिसतेस. त्याशिवाय तूं हा अबोला धरिला नसतास.

**कांता**:—अबोला धरायला एकच कारण असतें वाटतें !

**रघुनाथ**:—लाज सुद्धां कधीं कधीं मौनाचें कारण असूं शकते. पण तुला लाजायचेंहि मुळींच कारण नाहीं.

**कांता**:—तुला तरी तें कां असावें ? यायला जरा उशीर झाला म्हणून कीं काय ? अं:, त्यांत काय आहे ? मधून मधून असा उशीर होत गेला म्हणजे उत्कंठा वाढून त्या मानानें भेटीचें सुखहि दुणावतें. आज तुला यायला जो उशीर लागला त्यांत मला या रुमालाची चांगली सोबत झाली. ( रुमाल रघुनाथाच्या खिशांत ठेवते. ) हा मी एका अटीवरच परत करितें आहें, कीं मला त्याच्या मालकाची प्राप्ति लवकरच झाली पाहिजे. रघुनाथ, मला या रुमालाप्रमाणें या हृदयावर विश्रांति घेण्याचा हक्क केव्हां मिळणार !

[ चाल—काना नींद नहीरे० ]

कांता श्रांत शिरातें। ठेविन या हृदयीं मी कधिं
निश्चिंत। ॥ध्रु०॥ दुःखाश्रु कधीं आनंदाश्रुहि। भिज-
विति स्कंधा ओघळतां ॥ १ ॥

तूं लग्नाच्या तिथीचा शोध केलास का ? किती जवळ आला आहे मुहूर्त ! सकाळचा आहे कीं गोरज आहे ?

**रघुनाथ**:—( कांतेच्या वेणींत गुलाबाचें फूल खोवूं लागतो. तें खालीं पडतें. ) कांते, नुसतें तुझ्या वेणींत फूल खोंवायचें तर त्याला किती तरी विघ्नें असतात. मग तूं व मी सुखाच्या शिखरावर बसण्याच्या मार्गांत किती असतील याचा तूं विचार केला आहेस का ?

**कांता**:—तूं असें मोघम बोलूं लागलास कीं मला भय वाटतें. तसें पाहिलें तर आपल्या वाटेंत अडचणी तरी कोणत्या येणार ? जात, गोत्र, प्रवर, नाडी, पत्रिका, सगळें कांहीं जुळतें. त्याशिवाय कांहीं आईनें लग्नाला रुकार दिला नाहीं.

**रघुनाथ**:—कांते, जर यापैकीं एकहि गोष्ट जुळली नसती तरच चांगलें झालें असतें.

**कांता**:—म्हणजे ? म्हणतोस तरी काय तूं ?

**रघुनाथ**:—तूं शूद्र असायला पाहिजे होतीस.

कांता:—रघुनाथ, किती अमंगळ शब्द उच्चारतो आहेस हे ? मी त्या कौसल्याबाईसंबंधानें मघाशीं जें कल्याणापाशीं बोललें त्याचा तुला राग आलेला दिसतो. पण तूं तिचा कैवार घेऊन माझ्यावर रागावशील अशी मला कल्पनाहि नव्हती.

रघुनाथ:—कांते, तुझ्याविषयीं माझ्या मनांत राग कधीं तरी येईल का?

कांता:—मग थट्टेनें तरी बोलला असशील. खरेंच सांग, बोललास ना थट्टेनें ? बोललास ना ? आणि खरेंच, थट्टेशिवाय असें वाक्य तोंडांतून कोण काढील ? ब्राह्मणासारख्या उच्च व पवित्र जातींत आणि घरंदाज, कुलीन घराण्यांत माझा जन्म झालेला; सुशील मातेचा मला लहानपणापासून शिकवण मिळालेली; सामान्य मुलीपेक्षां किती तरी अधिक शिक्षण मिळालेलें; आणि या सर्वांपेक्षां महत्त्वाची गोष्ट ही कीं, तुझ्यासारख्या सुंदर, सद्गुणी, प्रेमळ तरुणाचें माझ्यावर प्रेम जडलेलें. या साऱ्या गोष्टी मला अनुकूल असतां मला सोडून हलक्या जातींतील व कुळांतील, अशिक्षित, गांवढळ अशा शूद्रकन्येशीं लग्न लावण्याचा कोणता शहाणा जागेपणीं हट्ट धरून बसेल ? रघुनाथ, मीं त्या शूद्रकन्येची निंदा केली म्हणून रागावूं नकोस. पाहिजे तर मी पदर पसरतें. पण ती जर माझ्या सुखाच्या आड येऊं लागली तर मी तरी तिची निंदा करूं नको तर काय करूं ?

रघुनाथ:—कांते, हा हट्ट माझा नाहीं.

कांता:—तुझा नसेल तर मी त्याला मुळींच जुमानीत नाहीं. रघुनाथ, माझा देव तूं आहेस. इतर लोक तुझ्या प्रभावळींतले म्हणूनच त्यांची किंमत मी समजतें.

[ चाल—छाय गयोरे तेरा० ]

तूं गमसी मज मेरुमणि ॥ ध्रु० ॥ इतरांच्या मुल्यां ठरवाया निरुप खरा एकचि असती ॥ १ ॥ इतर असति जन नभिंचे तारे । सूर्य परी तूं जणुं दिससी ॥ २ ॥

रघु०—असें म्हणूं नकोस. माझे बाबा मला किती पूज्य वाटतात हें तुला ठाऊक आहेच.

कांता:—त्यांचा येथें काय संबंध ?

रघु०:—हा त्यांचाच हट्ट आहे.

**कांता**:—एकेक ऐकावें तें विलक्षणच! काय म्हटलेंस? तुझे प्रेमळ बाबा तुझें लग्न एखाद्या कुणबिणीशीं लावून तुझा जन्माचा घात करणार? करीत असले तर ते वेडाच्या लहरींत असले पाहिजेत. अशा वेड्या कृत्यापासून त्यांना परतविणें तुझें काम आहे. नाहीं तर मागाहून त्यांना जन्मभर पश्चात्तापांत होरपळत पडावें लागेल.

**रघु०**:—त्यांच्यासारख्या सुज्ञ पुरुषास वेड लागलें असें म्हणणें शोभेल तरी का?

**कांता**:—वेड पुष्कळ प्रकारचें असतें. त्यांना लागलें आहे समाज-सुधारणेचें वेड. विधवा व विधुर पाहिलीं कीं लाव लग्न, ब्राह्मण व शूद्र पाहिले कीं कर चतुर्भुज. त्यांना जर सुधारणेची इतकी कळकळ होती तर त्यांनीं स्वतःचें लग्न ब्राह्मण मुलीशीं कां लाविलें? तें जर शूद्रकन्येशीं लाविलें असतें तर तुझी जात निराळी होऊन तुमचा आमचा घरोबा राहिला नसता, आणि या थेराला गोष्टी आल्याहि नसत्या.

**रघु०**:—कांते, मी जर शूद्र असतों तर तूं माझा तिटकारा केला असतास का?

**कांता**:—तिटकाराहि केला नसता आणि तुजवर प्रेमहि केलें नसतें. फक्त तिऱ्हाइताच्या नात्यानें राहिलें असतें. माझ्या आईचीं मतें मजमध्यें उतरलीं आहेत यांत नवल तें काय वाटलें तुला? पण त्या गोष्टीशीं आपणांला काय करायचें आहे? नानासाहेबांनीं सुधारणा करण्याची स्वतःला आलेली सोन्यासारखी संधि दवडून ती आपल्या मुलाकडून करवावी यावर माझा विशेष कटाक्ष आहे. अशानें कदाचित् एका शूद्र घराण्याचा उद्धार केल्याचें श्रेय येईल. पण खुद्द आपल्या पोटच्या गोळ्याचा सत्यानास होऊन एका ब्राह्मण घराण्याचा तळतळाट सोसावा लागेल.

**रघु०**:—तळतळाट देणें हें ब्राह्मणाचें ब्रीद नाहीं, व आपल्या वल्लभाच्या इच्छेबाहेर वागणें हें रमणीचेंहि ब्रीद नाहीं. जिच्यांत वल्लभाला संतोष ती गोष्ट संतोषानें घडवून आणणें हेंच ब्राह्मण रमणीचें कर्तव्य आहे.

[चाल---वैरन ठाडी०]

शांतिच साजे । द्विजमहिलेतें । मलिन न होणें ।
कोपरजें ॥ ध्रु० ॥ स्त्री शोभे जरि । साह्य नरा करि ।
आर्या पतिरंजनें ॥१॥ तूं स्त्री आर्या । द्विजाहि साह्या ।
दे मज तुष्ट मनें ॥२॥

कांते, तूं मला अनुरूप वधू आहेस कीं नाहींस याची बाबांनीं ही कसोटीच ठरविली आहे म्हणेनास!

**कांता**:---खासें! स्वतः अनुरूप पिते नसले तरी चालेल. मुलांनीं अनुरूप पुत्र आणि मुलींनीं अनुरूप वधू मात्र असायला पाहिजे. मीं तुला अनुरूप ठरून तुझ्या मिश्र विवाहाला संमति दिली म्हणजे आयतेंच काम झालें. बरें, मी संमति न दिल्यामुळें अपात्र ठरलें तरी त्या सबबी-वर माझा धिक्कार करायला हरकत नाहींच. खासा पेंच घातला आहे. रघुनाथ, तुझ्या वडिलांच्या वर्तनाला तुझी मान्यता आहे का?

**रघु०**:---तूं जर आनंदानें संमति दिलीस तर माझें सारें जीवित विषमय करूं पाहणारा हा स्वार्थत्याग करायला माझी तयारी आहे. तूं जर संमति दिली नाहींस तर तुझा अव्हेर मात्र मजकडून होणार नाहीं.

**कांता**:---रघुनाथ, मी तुझीच रमणी आहें. तेव्हां स्वार्थत्यागांत सुद्धां मी तुला हटेन असें समजूं नकोस.

[ चाल---कन्हय्या मुसे खेलो होरी० ]

आहे ही तुझी जाणें नवरी । तुला शोभणारी ॥ध्रु०॥
आदर्श न जरि झालें तुजला तरि तुज मानिन भावें ।
ठेवुनि पुढती तुजसम व्हावें । हीच आस मनिं भारी ॥१॥

मीहि तुजवरील हक्क सोडून द्यायला तयार आहें. पण शूद्रकन्येशीं विवाह करणें हीं फारच मिळमिळीत सुधारणा झाली. ती माझ्या डोळ्यांत मुळींच भरण्यासारखी नाहीं. तुझ्यासारख्या मोहऱ्याला जर स्वार्थत्याग करायचा असेल तर अतिशूद्राच्या घराण्याचा उद्धार करण्याकरितांच केला पाहिजे. शूद्रकन्येची सूचना त्या कुणबटांकडून स्वार्थदृष्टीनें झालेली उघड उघड दिसत आहे. त्यांना आपली एखादी जवळची नातेवाईक उजवायची

असेल. नानासाहेब आहेत सरळ मनाचे. नाकासमोर जाण्याचें त्यांना माहित. त्यांना सुधारणेची भुरळ दाखवून स्वार्थ साधूं पाहणाऱ्या त्या कुणबटांचा कावा हाणून पाडला पाहिजे. रघुनाथ, उद्यां तूं याच वेळेला नानासाहेबांना भेटून अतिशूद्राच्या कन्येशीं लग्न लावण्याची तयारी दाखीव. मला त्यांत संतोषच आहे.

रघु०:—तूं तेथें समक्ष हजर राहून जर आपली पसंती दाखविशील तर बाबांना विशेष संतोष होईल.

कांता:—कबूल. (पडदा पडतो.)

## प्रवेश ३ रा.

कौसल्या:—( स्वतःशीं ) डोळ तानतानून रगूकड टक लावूनशेनी पगितल, पन समादानी व्हईना. त्येला कुरवाळाव, ध्वोटाशी धराव अस वाटाया लागलया. आता त्यो दोपारची झ्वाप घ्येत पडला असल. त्येच्या-जवळ चिटपाकरूबी नसल. बिगीबिगी जाव, आन् वाईच त्येच डोकस दाबाया लागावन् काय! जागा जाला मंजी त्येच्यासंग बोलाया बी गवसल. आन् बोलन्यामंदी भुलल्ये तर? त्येकरू हरपल्यापायी मी येडी जालिया अस लोक बोलल्यातच. मंग येडी म्हूनच येळ मारून न्येवी जाल. ( पडदा उघडतो. रघुनाथ अंथरुणावर पडून झोंप घेत आहे असा देखावा दिसतो. ) न्हानपनी पाळण्यामंदी निजत व्हता तसाच दिसतुया! काय त्येकराच फुटक नशीब? तान्हपनापासन आईची माया अक्षी ठावी न्हाई! आन् मलाबी कुट हाय त्येकराच सुक? न्हानपनच अंगड, टोपर आन् खुळखुळा अक्षी जतन करून ठिवला व्हता, त्येच्यावर कशीबी गुजरान करावी. ह्येच अंगावर माजा बाळ अंगड घ्येनत व्हता. ह्येच डोक्शीवर टोपर घालीत व्हता. आन् ह्येच हातान खुळखुळा वाजवत व्हता. ह्ये माज बाळ आजपोतुर धा हजार कोसावर व्हत, त्ये आता माज्या नशिबान मला गवासल. आन् मंग मी आता कशापायी म्या धरू? ( रघुनाथाच्या अंगावरून हात फिरवून कपाळावर बोटें मोडते. )

ईसं वरस माज बाळ म्या कुरवाळल न्हवत. (सुस्कारा सोडून) देवा, इक्त्या दिस दुखाची आग पाखडलीस, पन मंग त्येच्यावर सुकाचा पावूस पाडलायास. तुज नवास फ्येडल्याबिगर कंदी न्हायची न्हाई. (रघुनाथाचें डोकें चेपिते.)

रघु०:—(उठून बसतो.) कोण? कौसल्याबाई?

कौस०:—धनीसाबाच आंग दुकतया म्हून त्ये बामनबुवान सांगितल; तवा म्हंतल जावं आन् बाईच आंग रगडाव.

रघु०:—भलतेंच एखादें! तुमच्यासारख्या वडील माणसाकडून अंग चेपून घेऊं लागलों म्हणजे वेड्यांत आणि माझ्यांत काय अंतर राहिलें? (आपले पाय कौसल्येच्या हातून सोडवून स्वतःशीं) मला या जोडप्याबद्दल इतका कळवळा कां बरें वाटावा? कांतेनें यांच्यावर नसते आरोप घेतले, म्हणून न्यायबुद्धि जागृत होऊन तिची अंतःकरणावरहि प्रतिक्रिया झाली कीं काय? किंवा यांचीं नांवें दशरथकौसल्या आणि माझें रघुनाथ, म्हणून केवळ शब्दसामर्थ्यानें यांच्यासंबंधानें माझ्या मनांत कळकळ उत्पन्न झाली! प्रभु रामचंद्राचें पुण्यमय चरित्र संपल्याला हजारों वर्षें झालीं. वाल्मीकीकडून तें चरित्र ग्रथित व्हायलाहि हजारों वर्षें झालीं. पण त्या चरित्राचा असा अद्भुत महिमा आहे कीं, त्यांतील प्रमुख व्यक्तींचीं नांवें पृथक्पणें किंवा समुच्चयानें कानांवर आलीं म्हणजे त्यांचा मनावर विशेष प्रकारचा ग्रह होतो. हिंदु समाजांत कितीहि भिन्न प्रकृतींचे लोक असोत; रामायण ग्रंथ ऐकतांना त्यांचीं विविध चित्तें त्याच्या छंदानें एका तालावर नाचावयास लागतात, आणि तेवढ्यापुरतीं तरी समरस होतात. वास्तविक पाहिलें तर यांचा आणि माझा काय संबंध! यांचें गांव आमच्या गांवापासून शेंकडों कोसांच्या अंतरावर. यांच्या आणि माझ्या जातींत जें अंतर आहे तें तर या अंतराच्या अनंतपटीनें अधिक आहे. मानववंशांचा एक वृक्ष असेलच तर ब्राह्मण व शूद्र यांच्या शाखांचें बुंध्यांत एकीकरण फारच पुरातन कालीं होत असावें. यांच्या माझ्या भाषेंत, चालीरीतींत, जवळ जवळ प्रत्येक गोष्टींत अंतर. आमचे राष्ट्रीय ग्रंथ एक आहेत हा एकच काय तो आमच्यामधील दुवा आहे. पण त्याचा प्रभाव केवढा आहे पहा! त्यांच्या वडिलांनीं

त्यांचीं तीं नांवें ठेविलीं; माझ्या वडिलांना त्या नांवांचें स्वप्नहि पडलें नसतां त्यांनीं माझें हें नांव ठेविलें. जगांत प्रत्यहीं चाललेल्या घडामोडींच्या झोतांनीं आह्मी एकत्र येतांच त्या नांवांच्या आधारानें आह्मी एकाच कुटुंबांतील आहोंत अशी भावना बाळगूं लागतों. डोंगरचे आंवळे आणि समुद्राचें मीठ यांच्या संगमाप्रमाणें हाहि संगम आहे. (उघड) कौसल्याबाई, तुह्मांला माझ्याबद्दल इतका आपलेपणा कां वाटतो बरें?

कौस०:—ह्ये काय इचारन? आमी धनीसावांच्या आजुळच न्हव का?

रघु०:—आजोळकडचीं माणसें प्रत्येकालाच असतात. पण म्हणून त्यांना त्याजबद्दल इतका आपलेपणा वाटतोच असें नाहीं. तुमचा मुलगा लहानपणीं हरवल्याचें माझ्या कानीं आलें, तें खरें का?

कौस०:—रातदीस त्यो संबूर दिसतुया, मंग हरावला म्हून कस म्हनावं?

रघु०:—तो मनाचा भ्रम असेल झालें.

कौस०:—या घडीलाबी त्यो म्होर दिसतुया. मंग भरम कसा म्हनावा, धनीसाब?

रघु०:—आज तो तुमच्या जवळ असता तर किती वयाचा असता?

कौस०:—आपल्याच उंबरीचा पगा.

रघु०:—अस्सें! म्हणून तुह्मांला माझ्याबद्दल इतका आपलेपणा! बरें, त्याला ओळखण्याच्या कांहीं खुणा तरी लक्षांत आहेत का?

कौस०:—त्येचं अंगडं आन् त्येचं कुंचडं जतन करूनशेनी ठिवल्याल हाय. त्येच्या आंगाला आन् डोक्शीला कस नामी बसत व्हत. पन त्यो जाला असल आता थोरा. त्येच्या डोक्शीला त्ये कस येवं? ह्ये पगा माज्या झोळण्यामंदी त्ये हायवी. (अंगडें टोपडें काढून दाखविते.) ह्यो खुळखुळावी त्येचा ख्योळच हाय. पन त्यो आता कुट वळखाया बसलाय! (रघुनाथास खुळखुळा दाखविते.)

रघु०:—या जिनसा तुम्ही केवढ्याला विकत द्याल?

कौस०:—कुनी समदी दुनियाबी दिली तरी न्हाई द्येनार. पन धनीसावांनी मागितल तर फुकाट बी द्येईन.

रघु०:—असा पंक्तिप्रपंच कां?

कौस०:—आपुन आमच मालक न्हव का? मंग त्येच्यावर बी आपलीच मालकी हाय.

रघु०:—कौसल्याबाई, माझी आई माझ्या तान्हेपणींच गेली ना?

कौस०:—आपुन तवा असाल माज्या ल्येकराच्या शिनाच.

रघु०:—ती आजला असती तर किती मोठी असती?

कौस०:—माज्याच उंबरीची.

रघु०:—आणि दिसण्यांत?

कौस०:—दिसन्यातबी माज्यावानीच.

रघु०:—(एकीकडे) कोठेंहि पहा; बायकांचा रूपाबद्दल सारखाच अभिमान दिसून येतो.

कौस०:—बाळासाब, आपुन रागेजनार न्हाई तर माज्या मनची येक गोट आपनास्नी सांगन.

रघु०:—सांगा, सांगा. संकोच धरण्याचें कांहीं कारण नाहीं.

कौस०:—आपुन हैसा माज्या प्वोरावानी, आन् मी हाय आपल्या आईवानी. आपुन मला आई म्हंतल आन् मी आपल्या पाटीवरन हात फिरावलों म्हंजी माज्या जिवाला लई ग्वाड वाटल.

रघु०—तुम्हांला समाधान वाटत असेल तर काय हरकत आहे! आई!

कौस०:—माज बाळ रगू! (रघुनाथाच्या पाठीवरून हात फिरविते.)

रघु०:—(एकीकडे) इच्या मुलाचें नांव सुद्धां रघुनाथच होतें वाटतें! दशरथ आणि कौसल्या यांच्या मुलाचें नांव दुसरें कोणतें असणार!

दशरथ(प्रवेश करून):—(स्वतःशीं) हे समद त्या बामनबुवान ऐकल्यावानी दिसतया, मला बगताखिनी कसा चमकुनशेनी निसाटला! (उघड) कारबारनी, काय ह्यो ख्योळ मांडलाया? येंच्या पाटीवरन हात फिरवतियास त्ये काय तुजी आन् येंची बराबरी व्हय?

रघु०:—दशरथबोवा, असे रागावूं नका. त्या माझ्यापाशीं दौलत थोड्याच मागत होत्या. नुस्तें पाठीवरून हात फिरवून जर त्यांना समाधान होत असेल तर विनाकारण त्याच्या आड या कां? नाहीं तरी माझी पाठ आज जरा ठणकतेच आहे. ती कौसल्याबाईकडून एकदां चेपून घेतली पाहिजे.



**रघु०:**—आई.

**कौस०:**—माज बाळ रगु.

[ अंक २ रा. प्रवेश ३ रा. पान ५४

( कौसल्या झोळण्यांत अंगडें, टोपडें, खुळखुळा घालून रघुनाथाकडे कृतज्ञतेनें पहात जाते. )

दश०:—बाळासाब, पाट दुकत असल तर मीबी दिईन बाईच रगडूनशेनी.

रघु०:—छे छे, दशरथबोवा, तुह्मी मला वडिलांसारखे.

दश०:—बाळासाब, मी आपल्या पायाचा चाकूर. मला इक्का मोटपना कशापायी होवा ?

रघु०:—निदान कौसल्याबाई तर माझ्या आईसारख्याच आहेत ना ?

दश०:—अस बकली व्हय ती ? कुनीकड विंद्राच ऐरावत आन् कुनीकड श्येमभटाची तटानी ? ती हाय येडी. तिच नका आपुन ध्येनामंदी घ्येऊ.

रघु०:—बरें, मी तरी तुमच्या मुलायेवढाच आहें ना ?

दश०:—त्येवढ असल म्हून काय जाल ? घोड आन गाडाव येका उच्चीच असल म्हून त्यंची बराबरी व्हती व्हय ? आपुन हैसा गोर, त्यो व्हता अक्षी काळाकूट ! आपुन हैसा नाजूक, त्यो व्हता हानमदांडगा ! ( एकीकडे ) द्येवा, खोट बोलतु, प्वोटामंदी घाल.

रघु०:—कसेंहि असलें तरी कौसल्याबाईंनीं माझ्या पाठीवर हात फिरवितांच त्यांना जसें समाधान झालें तसें मलाहि झालें खरें. अस्सल मातृप्रेमाचा मला मुळींच अनुभव नाहीं. यामुळें नकलेनेंच माझ्या मनाचें समाधान व्हावें यांत नवल नाहीं.

[ चाल—देखो जियावे चैन० ]

धन्य खरे नर ते । वाटति ।।ध्रु०।। मातृसुखाची ज्यां
चाखाया रुचि मधुरा मिळते ।।१।।

दश०:—आपुन आन् नानासाब आमावर इक्की माया करता ह्ये आपल आमच्यावर लई उपकार हैती, बाळासाब.

रघु०:—तुह्मांला काय वाटतं असेल तें असो पण आम्ही उच्च जातीचे लोक तुमच्या संबंधानें आपलें कर्तव्य मुळींच करीत नाहीं असें मला वाटतें. तुम्ही आम्ही एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहोंत. तुमच्य

नशिबीं कुणब्यांच्या पोटीं येण्याचें आलें म्हणून आम्हीं तुम्हांला कमी लेखा-यचें हा कुठचा न्याय ? वास्तविक तुह्मांला आमची योग्यता यावी ह्मणून आम्हीं रात्रंदिवस परिश्रम केले पाहिजेत. मी नानासाहेबांच्या पोटीं आलों, तोच एखाद्या शूद्राच्या पोटीं आलों असतों तर मलाहि तुमच्याप्रमाणें सेवाचाकरींतच दिवस काढावे लागले असते कीं नाहीं ? पण दुसऱ्यांच्या स्थितीची आत्मौपम्यानें कल्पना करण्याइतकी परार्थबुद्धि आणि कल्पकताच जर अंगीं नाहीं तर येवढा विचार तरी सुचणार कसा ? दशरथ-बुवा, मी जर तुमच्या पोटीं आलों असतों तर तुह्मीं माझा प्रेमानें सांभाळ केला असता, नाहीं ?

दश०:—ह्ये काय इचाराव, बाळासाब ? आपल्यावरन आमी परानबी बवाळून टाकल असत.

रघु०:—मला तुह्मीं प्राणापलीकडे जपलें असतेंत यांत संशय नाहीं. पण माझें शाश्वत कल्याण करण्याकारितां तुह्मीं स्वार्थत्याग केला असता कीं काय याची फार शंका वाटते. प्रेम हें फार वेडें असतें.

दश०:—काय ह्मनता उकलनावी !

रघु०:—समजा बाबांसारख्या परोपकारी गृहस्थानें माझें कोटकल्याण करण्याकारितां मला तुमच्यापासून मागितलें असतें तर तुह्मीं माझ्यावरचा आपला हक्क सोडून दिला असता का ? मला नाहीं वाटत दिला असता.

दश०:—तर काय आपनाला आमासंग गरिबीमंदी आन् अडानीपनात लोळवल असत म्हनता ? न्हाई न्हाई ! आमी अडानी तर खरच, पन इक्त अडानी न्हाइ. द्येव राग्याजला म्हून आमी इक्त अडानी आन् भिकारीबी. आमच ल्येकरूबी तसच होव अस आमी कस म्हनू, बाळासाब ?

रघु०:—पण आपलें मूल दुसऱ्याच्या हवालीं केल्यापासून तुह्माला पुढें पश्चात्ताप नसता का झाला ?

दश०:—आन् कशापायी ? त्यो सुकामंदी नांदता ना ? बस तर ! त्येच्यात संमद आल.

रघु०:—समजा तुह्मी त्याच्याकडे कधींकाळीं भेटायला गेलां असतां

आणि त्यानें तुमच्याकडे दुर्लक्ष्य केलें असतें किंवा तो तुह्मांला अजीबात विसरूनच गेला असता तर?

दश०:—तर मग मी त्येच सुक दुरनच पगितल असत. आन् त्येला माजी वळाखबी दिली नसती.

रघु०:—शाबास! प्रेमाचें खरें मर्म तुह्मीं ओळखलें आहे. कौसल्याबाईच्या प्रेमाचा प्रकार जरी निराळा असला तरी त्या प्रेमळ आहेत खास.

कल्याण (प्रवेश करून):—बाळासाहेब, मालतीबाई आणि कांताताई आल्या आहेत. त्यांना तुमच्याबरोबर नानासाहेबांना भेटायचें आहे. कांहीं महत्त्वाचें काम दिसतें.

रघु०: - मी आलोंच तिकडे. (दशरथास) दशरथबुवा, तुह्मी जा आतां. (दशरथ जातो.)

कल्या०:—माझा कांहीं उपयोग होण्यासारखा असेल तर सांगायला संकोच करूं नका.

रघु०:—तूं जर तिथें हजर न रहातां दरवाजाबाहेर उभा राहून कोणाला आंत येऊं देणार नाहींस तर तुझा उपयोग होईल.

कल्या०:—तसें कां होईना. (रघुनाथ जातो. स्वतःशीं) किती तरी लाघवी बाई आहे ही! बाळासाहेबांकडून 'आई' काय ह्मणवून घेते आणि त्यांच्या पाठीवरून हात काय फिरविते! नोकर म्हटले म्हणजे इथून तिथून लोंचट!

[चाल—सखियान आने सह कोमलांगे]

जगिं भृत्य सारे। शठ वाटमारे ।।ध्रु०।। कपटें अपारें।
क्षणिं वंचणारे। धनि ते खरे। फसती विचारे ।।१।।

मी तेथें असतों तर तिच्या हाताला डागच दिला असता. पण हें असें चोरून पाहिलें आणि ऐकलें म्हणजे मनासारखें करायची चोरीच असते. (जातो.)

---

# प्रवेश ४ था.

कौसल्याः—( स्वतःशीं ) मगा रगून मला आई म्हंत्तल तवा त्या यिळपुरत मला लई ग्वाड वाटल. पन तवा त्येला कुट ठाव व्हत मीच त्येची आई म्हून ? त्येन त्ये मला बर वाटाया म्हंतल. त्ये पोरीसंग कसा अक्षी काळजातल काडून गोट करतु, आन् मगा वळली अक्षी येट. ह्यो जीव हाय अक्षी भुक्याजल्याला. काईबी करा. त्येच प्वाट भरायच न्हाई. अर, पन रगूसंग ह्ये कोन चाललया ? ती ताटका आन त्येची आई हाय. लगान जमवायचा इचार चाललाया जनू. ही कौसल्या जिती असल्यावर तुज रगूसंग लगान व्हईल व्हय ? कशी करशिल त्ये मी बी पगन. ( जाते. )

---

# प्रवेश ५ वा.

उद्धवरावः—( स्वतःशीं ) छेः, रघुनाथाचें कांतेशीं लग्न होऊं देतां उपयोगींच नाहीं. त्याची जात जर मागें पुढें उघडकीला आली तर मालतीबाई आणि कांता या फसवणुकीबद्दल मला कधींहि क्षमा करणार नाहींत. जात उघडकीला आली नाहीं तरी माझें मन मला या प्रतारणेबद्दल अखेरपर्यंत खात राहीलच. तिजबद्दल मला जाहीर शिक्षा व्हावयाची राहिली तरी मनोदेवतेकडून होणारी मानसिक शिक्षा मला चुकवितां येणार नाहीं. बाह्य शिक्षेच्या अभावामुळें ती शिक्षा अधिक तीव्र मात्र भासेल. लोकांना सुधारण्यास सरसावण्यापूर्वी मला माझें मन शुद्ध आहे याबद्दल अगोदर खबरदारी घेतली पाहिजे. कोण आहे तें ? मालतीबाई ? बाहेर कां उभ्या ? या, अशा आंत या. बरोबर रघुनाथ आणि कांताहि आहेत वाटतें ? ( मालती, रघुनाथ व कांता प्रवेश करितात. ) या अपूर्व योगावरूनच तुमचें काम लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

मालतीः—नानासाहेब, मी कांतेला आपली सून म्हणून आपल्या

पायांवर घालायला आणिली आहे. कांते, लाजूं नकोस. नानासाहेबांचे पाय घट्ट धर. तुझ्या सौभाग्यगंगेचा हाच उगम आहे.

[ चाल--कत्‌ल मुझे कर डाला० ]

तव सौभाग्यनदी स्रवते तेंचि असे हें पदयुग गिरिचें
॥ध्रु०॥ मंगलसूत्रमणि तनय या चरणनखांचे ॥ १ ॥
कुंकुमतिलक असे अपत्याचि पदरागाचें ॥ २ ॥

( कांता उद्धवरावांच्या पाया पडते.)

उद्धव०:—रघुनाथ, मीं तुजकडे सोंपविलेलें कर्तव्य तूं अशा रीतीनेंच बजाविलेंस वाटतें ?

कांता:—नानासाहेब, यांत त्याच्याकडे मुळीं सुद्धां दोष नाहीं. त्यानें आपलें कठोर कर्तव्य कठोर अंतःकरणानेंच बजाविलें आहे. परवांच मला जन्माची सोबतीण करण्याचें वचन देऊन काल त्यांतून आपली मुक्तता करून घेण्याचें नीतिधैर्य त्यानें दाखविलें आहे. आदल्या दिवशीं मला अर्धांगी करण्याचें कबूल करून दुसऱ्याच दिवशीं माझ्यापासून फटकून वागण्याची परवानगी त्यानें मिळविली आहे. त्यानें सबंध एक दिवस आपला निग्रह पाळला. यापलीकडची पुरुषापासून अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे !

उद्धव०:–कांते, तुला तुझ्या आईप्रमाणें जगाचा अधिक अनुभव असता तर पुरुषांसंबंधानें असे अनुदार उद्गार तूं खाचित काढिले नसतेस.

कांता:—आह्मां बायकांना शितावरून भाताची परीक्षा करण्याची संवयच आहे. ज्याला मी अत्यंत सद्‌गुणी समजत आलें, ज्याच्या प्रामाणिकपणाबद्दल मला स्वप्नांतहि कधीं शंका आली नाहीं, ज्याच्या एकवचनीपणाबद्दल मीं स्वतः हमी घेतली असती त्यानेंच माझ्या भ्रमाचा भोपळा अशा प्रकारें फोडल्यावर इतर पुरुषांच्या ठिकाणीं सत्यनिष्ठेची अपेक्षा करण्याचा मला काय हक्क उरला ?

उद्धव०:—कांते, रघुनाथ या कृत्याला प्रवृत्त झाला तो स्वतःच्या बुद्धीनें झाला नाहीं.

कांता:—पण ज्यांच्यापासून त्याला प्रेरणा मिळाली तेहि पुरुषच ना ?

नानासाहेब, बायकांमध्यें आपणांला असा चंचलपणा आढळणार नाहीं. स्त्रीचा पति एकदां गत झाला म्हणजे ती दुसऱ्या पुरुषाचा विचारहि आपल्या शुद्ध मनाला शिवूं न देतां आजन्म वैराग्याचें आचरण करिते. गत पत्नीचें स्मरण ताजें ठेवून अशा प्रकारें शुद्ध आचरण ठेवणारे किती विधुर सांपडतील ?

माल०:—कांते, आज तूं जिभेला भारीच मोकळी सोडली आहेस !

कांता:—आई, आपणां बायकांचा स्वैरपणा जिभेंत दिसून येईल तितकाच काय तो.

उद्धव०:—कांते, जगाच्या पाठीवर शुद्धाचरणी विधवांप्रमाणें शुद्धाचरणी विधुरहि सांपडतील; नाहीं असें नाहीं. फार काय सांगूं ? पण जिला देहानें वरिलें नसून केवळ मनानेंच वरिलें आहे अशा स्त्रीचें स्मरण करीत अविवाहित स्थितींत काळ कंठणाराहि एखादा पुरुष या वसुंधरेच्या पोटीं दडून राहिलेला दिसून येईल.

माल०:—पण प्रियजनाबद्दल निराशा झाली असतां लग्न करणारेच फार !

उद्धव०:—कोणीं सांगावें ? आपणाला विवाहित ह्मणून वाटणारा पुरुष अविवाहित नसेल कशावरून ?

माल०:—(हंसून) लग्नाचा भक्कम पुरावा संततिरूपानें मिळण्यासारखा असतो ह्मणून बरें आहे ! नाहीं तर जगांतले सारेच पुरुष ब्रह्मचारी ह्मणून गणिले गेले असते !

उद्धव०—या विषयाची चर्चा करण्यापासून कांहीं निष्पत्ति होणार नाहीं. कांते, पुरुष स्त्रियांप्रमाणें एकनिष्ठ असोत किंवा नसोत, तूं रघुनाथावरील आपला हक्क सोडण्यांत जें औदार्य दाखविलेंस तें तुला अत्यंत भूषणास्पद आहे याबद्दल वाद नाहीं. तूं त्यास पूर्णपणें अनुरूप आहेस यांत शंका नाहीं.

माल०:—अनुरूप आहे ह्मणून का त्यांची ताटातूट करायची ? नानासाहेब, आपलें आणि माझें यासंबंधानें नुक्तेंच बोलणें झालें त्या वेळीं या मुलांचें एकमेकांवरील प्रेम बहिणभावंडांच्या नात्याचें आहे असा आपला समज होता, आणि ह्मणून रघुनाथाचें लग्न शूद्रकन्येशीं करण्याचा

आपला विचार ठीक होता. पण आतां तीं प्रेमळ वल्लभरमणी आहेत हें कळून आल्यावर सुद्धां आपण तोच आग्रह धरणार का ? माझ्या इच्छेला आपण यत्किंचितही किंमत देत असाल तर यांच्या विवाहाला आपण मोडता घालूं नये.

उद्धव०:—मालतीबाई, तुमच्या इच्छेला मी किती मान देतों हें माझ्या आजपर्यंतच्या कृतीवरून तुम्हांला दिसून आलेंच आहे. यापेक्षां जास्त काय सांगूं ?

माल०:—मजबद्दल अत्यंत कळकळ वाटत असल्यामुळेंच जर आपण मुलांच्या लग्नाला नकार देत असाल तर माझा विचारच आपण डोक्यांतून काढून टाकावा अशी माझी विनंति आहे.

उद्धव०:—मालतीबाई, मीं काय केलें म्हणजे माझा निरपेक्षपणा तुह्मांस पटेल तें मला सांगा. (रघुनाथास पोटाशीं धरून) माझ्या रघुनाथावरील माझें प्रेम समूळ नष्ट होऊन त्याची जागा स्वार्थानें घेतली आहे असें तुह्मी समजतां काय ? कांता जरी माझी मुलगी नसली तरी तिजवरील माझें प्रेम अनेक कारणांमुळें अपत्यवत् आहे हेंहि तुह्मी जाणतां. यांच्या घातापासून मला सुखाची प्राप्ति होत असेल तर तें सुख मी आनंदानें पत्करीन अशी कल्पना करण्याइतकें मजविषयीं तुमचें नीच मत झालें आहे काय ? झालें असल्यास तें घालविण्याकरितां मी प्राणांची देखील पर्वा करणार नाहीं अशी खात्री असूं द्या.

माल०:—मग आपल्या या कृत्याची उपपत्ति कशी लावावयाची ?

उद्धव०:—मला ती उपपत्ति इतक्यांतच पुरतेपणीं सांगतां येत नाहीं याला निरुपाय आहे. ती कळल्यावर माझ्या या विचाराबद्दल तुह्मी माझा राग न करितां मला धन्यवादच द्याल अशी माझी खात्री आहे. तूर्त मी इतकेंच सांगतों कीं, रघुनाथाचें शूद्रकन्येशीं लग्न होणेंच सर्व दृष्टींनीं अत्यंत इष्ट आहे. हा विचार माझ्या पितृनिष्ठ व स्वार्थत्यागी रघुनाथानें आणि त्याजवर निस्सीम प्रेम करणाऱ्या शूर कांतेनें मान्य केला आहे. मग त्याची आतां वाटाघाट कशाला पाहिजे ?

कांता:—नानासाहेब, आपण समजतां त्याच्याहि पलीकडे आमची उभयतांची मजल गेली आहे. स्वार्थत्यागच करायचा तर तो शूद्रकन्ये-

साठीं न करितां अतिशूद्रकन्येसाठीं करावयाचा रघुनाथानें संकल्प केला आहे; आणि त्याला माझें पूर्ण पाठबळ आहे.

उद्धव०:—(दचकून) अतिशूद्रकन्येसाठीं ? पण शूद्रांत जशा अनुरूप मुली सांपडतील तशा अतिशूद्रांत कुठून सांपडायला ?

कांताः—स्वार्थत्यागाचाच जेथें प्रश्न आहे तेथें अनुरूपतेचा विचार कशाला करायला पाहिजे ? ज्या कृतींत अधिक स्वार्थत्याग तिचाच अंगीकार आपण केला पाहिजे. शूद्रकन्येशीं लग्न लावण्यांत धड ना स्वार्थ ना परमार्थ असा प्रकार होणार आहे. पण चांडालकन्या ह्मटली म्हणजे ती हिंदु समाजांतील अगदीं खालची पायरी. तिचाच उद्धार सर्वांत वरच्या पायरीवरील उदार पुरुषानें करावा हें योग्य आहे.

उद्धव०:—रघुनाथ, हिच्या ह्मणण्याला तुझी कबुली आहे का ?

रघु०:—आमच्या ठरलेल्या बेतास अनुसरूनच हिची सूचना आहे.

उद्धव०:—काय करावें ? मोठी पंचाईत येऊन पडली आहे !

कांताः—कां ? त्या कुणबटांचा नाहींना यांत सल्ला घ्यायचा ?

उद्धव०:—(चपापून) हें तूं कशावरून म्हणतेस ?

कांताः—त्यांत काय आहे कठिण ? तें जोडपें आलें आणि लागलीच आपल्या मनांत विषम विवाहाचे विचार डोकावूं लागले, यावरून कोणीहि तो तर्क करील.

उद्धव०:—इतकेंच ना ? का म्हटलें यापलीकडचाहि एखादा तर्क बांधला आहेस !

कांताः—त्या कुणब्यांनीं एखादी अनुरूप वधू उभी केली असेल आणि तिच्याकरितां आपणांला येवढा विचार पडला असेल तर त्यांची येवढी पर्वा ठेवण्याचें कारण नाहीं. मीहि एक अनुरूप चांडालकन्या तयार करणार आहें. रघुनाथाला अनुरूप मुलींचा काय तोटा ?

उद्धव०:—हें काय आणखी नवीनच ? कांते, तूं एक अनुरूपशी चांडालकन्या तयार करणार आहेस याचा अर्थ तरी काय ?

कांताः—मी रघुनाथाला योग्य आहें असें आपलें मत आहे ना ?

उद्धव०:—अगदीं पूर्णपणें योग्य आहेस. पण तुझा काय येथें संबंध ?

कांताः—मीच तर चांडालकन्या होऊन रघुनाथाकरितां वधू ह्मणून

उभी रहाणार. ब्राह्मणवधू या नात्याचा माझा त्याजवरील हक्क मीं सोडला आहे. पण चांडालवधू म्हणून पुढें येण्याला मला हरकत नाहींना?

मालः—कांते, कांते, काय बोलतेस हें?

उद्धव०:—आणि तूं चांडालकन्या कशी होणार?

कांताः—तें काय मोठेसें अवघड आहे? आपणहि त्याचा एखादा उपाय सुचवूं शकाल. नानासाहेब, आपण नीच जातीचा उद्धार करितां; मग उच्च जातीला नीच करणें आपणांला कठिण कां वाटावें? मला चांडाळाच्या हातचें अन्न खायला सांगा, मला चांडाळ बायकांचीं फाटकीं लकतरें नेसायला द्या, मला चांडाळाच्या अमंगळ झोंपडींत रहायला सांगा, वाटेल तर मला चांडाळाला दत्तक द्या, पण नानासाहेब, माझी रघुनाथापासून ताटातूट करूं नका. मीं काल उसनें धैर्य आणून आपल्या विचाराला बाह्यात्कारीं संमति दिली खरी. पण घरीं गेल्यावर मला सगळें जग शून्य वाटूं लागलें. रघुनाथाचा सहवास नसेल तर जगण्यांत काय अर्थ? त्याची मधुर मूर्ति दिसणार नाहीं, तर या डोळ्यांच्या खांचा झालेल्या काय वाईट? त्याचे गोड शब्द कानीं पडणार नाहींत तर या कानांचा काय उपयोग? त्याचा शीतल स्पर्श अनुभवण्यास मिळणार नाहीं तर त्वचेची काय सफलता उरली? बिचाऱ्या रघुनाथाचीहि माझ्यावांचून अशीच स्थिति होईल. तो नीच जातीच्या मुलीशीं विवाह करून आपल्या उच्च स्थानावरून भ्रष्ट झाला म्हणजे त्याचें मन रिझवायला त्याला कोणती कांता मिळणार आहे? तो थकून भागून घरीं आला असतां त्यानें आपले श्रम कोणाशीं विनोद करून घालवावे? आणि कामाकाजानें त्रासलेल्या डोक्याला कांतेच्या वक्षःस्थलावांचून दुसरें कोणतें विश्रांतिस्थान सांपडणार? आजारांत दुसऱ्या कोणत्या स्त्रीच्या हातचा सुग्रास त्याला गोड वाटणार आहे?

[ चाल—मैतो उनको बचन देदे० ]

मीच आधार हो होय यातें। हाहि मातें ॥ध्रु०॥ याजवांचोनि वांचावया। शक्त मी नच जिवा कंठण्या।
हाहि माझ्या नसे मागुतें ॥१॥

नानासाहेब, आपणांला आमच्याप्रमाणें प्रेमाचा अनुभव आला असता तर आपण असे निष्ठुर झालां नसतां.

**उद्धव०**:—कांते, पुन्हां तूं चुकतेस. मला प्रेमाचा पूर्ण अनुभव आलेला आहे.

**कांता**:—मग हल्लीं त्याचें आपणांला विस्मरण तरी पडलेलें असावें.

**उद्धव०**:—स्नेहाचा सारखा पुरवठा होत असतां प्रेमाची ज्योति मंद कशी होणार? कांते, मी दिवसेंदिवस वयस्क होत चाललों आहें खरा; परंतु माझें प्रेम दिवसेंदिवस तरुणच होत चाललें आहे; आणि त्यामुळेंच मला तुझ्या स्थितीबद्दल इतकी हळहळ वाटत आहे ती.

**कांता**:—नुसती हळहळ वाटून काय उपयोग? ही अडचण आपण उपस्थित केली आहे, तशी ती दूरहि आपणच केली पाहिजे. मला आपण बाटवून शूद्र करा कीं चांडाळ करा, जोंपर्यंत माझें नीच पद मला रघुनाथा-बरोबर भोगायला मिळतें आहे तोंपर्यंत माझ्यासारखी सुखी कोणी नाहीं असेंच मी समजेन. मला एकटीला ब्राह्मणजातींत, किंबहुना स्वर्गसुखांत रहावयाला मिळालें तरी तें मला नरकवासासारखें वाटेल. उलट पक्षीं आम्ही दोघेंजण शूद्र किंवा चांडाळ जातींत किंबहुना रौरव नरकांत एकत्र असलों तरी तें आम्हांला स्वर्गसुखापेक्षां अधिक वाटेल.

**उद्धव०**:—शाबास! याला ह्मणावें खरें प्रेम!

**माल०**:—कांते, तूं प्रेमामुळें वेड्यासारखी झाली आहेस. काय बर-ळते आहेस हें तुझें तुलाच कळत नाहीं. तुला ब्राह्मणासारख्या उच्च जातींत जन्म मिळाला हें तुझें नशीब समज. अशा उच्च जातीवर तूं केवळ प्रेमामुळें पाणी सोडायला तयार होत आहेस हें वेडाचें नाहीं तर कशाचें लक्षण?

**कांता**:—( मालतीच्या गळ्यांत हात घालून ) आई, आजपर्यंत माझे क्षुल्लक गोष्टींतहि लाड पुरविलेस; आणि माझ्या आयुष्यांतील सर्वांतील आणीबाणीच्या प्रसंगीं माझा हिरमोड करितेस! शोभतें ना हें तुला?

**माल०**—कांते, माझ्या हृदयावर तूं आजपर्यंत जुलमानें अंमल चालवीत आली आहेस. तूं अंमळ टिपें गाळलींस कीं माझ्या हृदयाचें पाणीपाणी होतें, माझ्या खांद्यावर डोकें ठेविलेंस कीं तें हृदय चूर होतें.



कांता०:—नानासाहेब, वाटेल तरं मला चांडाळ बायकांची फाटकीं लकतरें नेसायला द्या. पण रघुनाथापासून माझी ताटातूट करूं नका.

[ अंक २ रा. प्रवेश ५ वा. पान ६२

गळ्याला विळखा घातलास कीं तें हृदय बंदिवान् होतें, हें तुला माहित आहे. पण प्रेमाच्या अधिकाराला सुद्धां मर्यादा असते. त्या अधिकाराच्या जोरावर धर्माचे पाश तटातट तोडणें हा त्याचा दुरुपयोग आहे.

कांताः—( मालतीच्या वक्षःस्थलावर डोकें ठेवून ) आई, तूं जर मला साह्य करणार नाहींस तर मी कोणाच्या तोंडाकडे पाहूं बरें ? तुझ्यावांचून आतां माझ्या सुखाची काळजी करणारें कोण आहे ?

माल०:—हें पहा ! मी आतां तुझ्या लाववीपणाबद्दल जें बोललें तें सप्रयोग सिद्धच करून दाखविते आहेस ! कांते, तुला आतां बरें वाईट कळणार तरी केव्हां ?

कांताः—आई, मी प्रेमालाच गुरुस्थानीं मानिलें आहे. तें मला योग्य तोच मार्ग दाखवील. (कौसल्या व तिच्या मागोमाग कल्याण प्रवेश करितो.)

कौस०:—मोटा ह्मन पिरमाचा दिमाक दावातिया ! बाळासाबावर चेटूक घालाया जिवाला काईबी न्हाई वाटत ?

कल्या०:—हं कौसल्याबाई, मी नको नको ह्मणत असतां येथें आलांत, आणि आतां हा गोंधळ घालतां इथें ?

कांताः—आतां तर मुख्य विहीणच आली ! का ही नवरी मुलगी आहे ? कुणब्यांचा काय नेम सांगावा ? दशरथञोवांपासून काडी मोडून घेऊन बोहोल्यावर चढायलाहि तयार व्हायची !

कौस०:—( संतापानें ) मायल्येकरांच लगान आमच्यात न्हाई लागत, बामन लावत असत्याल.

कांताः—काय? रघुनाथाची आई ?

रघु०:—बिचारी भ्रमांत काय वाटेल तें बोलते आहे.

कांताः—धडधडीत खोटें ! टवळे, लवकर कबूल करतेस कीं नाहीं बोललीस हें अगदीं खोटें ह्मणून ?

कौस०:—मला धमकावनार तू कोन, सटव्ये ? म्या म्हंतलं त्ये अक्षी खर हाय.

उद्धव०:—( एकीकडे ) हरहर ! पुरा घात झाला !

कांताः—याला पुरावा काय सटवे ?

कौस०:—तुज डोळं फुटल्याती व्हय ? आमच दोगांच चेहर न्याळून

शेनी पग, आन् रगूचावी पग. दिसत्यात का न्हाई येकावानी येक ? रगूच हसन हाय कारबाऱ्यावानी, आन् त्यो राग्याजला म्हंजी दिसतुया माज्यावानी.. तुमाला वाटल असल की आमी ह्ये समद त्येच्यापासन घ्येतल. आमी येक दो दिसामंदी त्येच्यापासन उचलू का त्यो नऊ म्हईन्यामंदी आमापासन शिकल ? ह्येवानच आमचा शिका त्येच्या त्वोंडावर मारून ठिवलाया, न्हाई तर तुमी गाईवासराची अक्षी ताटातूट क्येली असती. का? आता कशापायी दातखीळ बसली ? आता का बोलनास ?

कांताः—'रघुनाथ' हें नांव तुम्हींच ठेवलें तर ?

कौस०:—आमी न्हाई तर कोन ठ्येवनार ? ( दशरथ प्रवेश करितो.)

कांताः—नानासाहेब, हा आपला मुलगा नव्हे का ?

उद्धव०:—हा माझा नसून दशरथबोवांचा आहे. म्हणूनच मी तुमच्या लग्नाला आड येत होतों.

दश०:—नानासाव, मला वाटलच व्हत ही अवदसा कंदी तरी असा ख्योळखंडुबा करनार. मला झुकांडी द्येऊनशेनी हकड आली, म्हून घाबऱ्या घाबऱ्या हत आलु तर ह्यो परकार !

माल०:—नानासाहेब, तर मग आपण अजून अविवाहितच आहांत ?

उद्धव०:—मालतीबाई, मीं लग्न करणें शक्य नव्हतें.

माल०:—तर मग मीं आपणांला विनाकारण दूषण लाविलें.

कांताः—( स्वतःशीं ) काल रघुनाथानें मला विचारिलें कीं, तो जर शूद्र असता तर मी त्याचा तिटकारा केला असता कां ? उघड उघड त्याला ही गोष्ट माहित असून त्यानें ती माझ्यापासून लपवून ठेविली होती. कपटी, दांभिक, फसव्या, चोर ! ( उघड ) नानासाहेब, हा जर आपला मुलगा नव्हता तर ती गोष्ट माझ्यापासून लपवून हो कां ठेविलीत ? हा कवडीमोलाचा दगड हिरा म्हणून मला डोक्यावर कां हो घ्यायला लावलात? ह्या धोंड्याला 'ब्राह्मण' नांवाचा शेंदूर फांसून त्याच्या पायीं मला नाक घांसायला कां हो लाविलेंत ? वाघाचें कातडें पांघरलेल्या या कोंकराशीं मी बरोबरीच्या नात्यानें खेळलें, वागडलें, त्याअर्थीं मी आधींच पतित झालें आहें. मला मुद्दाम पतित कशाला करायला पाहिजे ?

माल०:—कांते, नानासाहेबांनीं तुमचें प्रेम जडूं नये म्हणून ज्या



**कौस०:**—आमच दोगांच चेहर न्हाळून शेनी बग, अन रगुचाबी बग. दिसत्यात का न्हाई येकावानी येक ?

[ अंक २ रा. प्रवेश ५ वा. पान ६५ ते ६६

ज्या योजना करावयाच्या त्या साऱ्या केल्या. तेव्हां त्यांना दोष देणें योग्य नव्हे. त्या योजना तुम्हीं विफल केल्या, यांत त्यांच्याकडे बोल जातो कीं तुमच्याकडे ?

**कांता**:—त्यांच्याकडे नसेल, याच्याकडे जात आहे. यानें आपल्या पायरीनें रहायचें, तें सोडून भलतीच आशा धरली आणि मला मात्र पुरें फसाविलें.

**उद्धव०**:—बाळा, ही रागाच्या भरांत आपलें भान विसरून गेली आहे. तिच्याकडे लक्ष्य देऊं नकोस.

**रघु०**:—कांते ! कांते ! मी तुझ्या रागाला पात्र तरी आहें का ? माझा जन्म शूद्रांच्या पोटीं झाला हें कळल्याबरोबर मी तुला इतका टाकाऊ वाटूं लागावें ना ? पण मला तरी आपल्या जन्माबद्दल स्वप्न पडलें होतें का ? मी कोणीहि असलों तरी तुझ्यावर निस्सीम प्रेम कारितों या विचारानेंहि तुला दया येत नाहीं ना ?

[ चाल—कोन खेले तुसे होरीरे० ]

**सौख्य तुझें मम गणिलें । शिरिं पच या धरिलें ॥ध्रु०॥**
**एकचि आत्मा भिन्न देह जरि । बोलति हें जन सगळे ॥१॥**

**कांता**:—तुला माझ्यावर प्रेम करण्याचा हक्कच काय आहे मुळीं ? रघुनाथ, तूं उच्च जातिचा आहेस असें जोंपर्यंत मला वाटत होतें तोंपर्यंत तुझ्याबरोबर वाटेल तितक्या नीचतेच्या दरींत उडी घ्यायला मी आनंदानें तयार झालें होतें, व तो माझा एक प्रकारचा बहुमानच आहे असें मी समजत होतें. पण तूं स्वतःच नीच जातीचा पडलास. तुझ्यासाठीं मीं थोडा तरी स्वार्थत्याग करावा अशी तुझी योग्यता आहे का ? व्यर्थ, व्यर्थ मीं तुझ्यासाठीं आपल्या अमोल आयुष्याचा इतका काळ दवडला ! मीं आजपर्यंत तुझ्याशीं जीं भाषणें केलीं तीं मी आपल्या वाणीचा दुरुपयोग म्हणून समजतें. तुझ्या स्पर्शानें माझ्या अंगाला जो कलंक लागला तो हजारों तीर्थांनीं नाहींसा होण्यासारखा नाहीं. तुझी नीच जात तुझ्या मंदपणावरून मीं पूर्वींच ओळखावयास पाहिजे होती. पण मला कशी भुरळ पडली कुणास ठाऊक ! मठ्ठ, मंद कुणीकडचा !

माल०:—बाळ, रघुनाथ कांहीं झालें तरी आपलाच आहे. त्याला इतकें टाकून बोलणें योग्य नाहीं.

कांता:—आई, तुझा धर्मनिष्ठपणा गेला तरी कुठें ? कांहीं वेळापूर्वी तूं मिश्र विवाहाला नांवें ठेवीत होतीस; आणि आतां एका कुणब्टाला आपल्या मुलीशीं सलगी करूं देतेस ?

दश०:—बाळासाब, आपुन आमच्या प्वोटी आला ह्येची आपनाला लई सरम वाटत असल. पन त्येला माजा नाविलाज हाय.

रघु०:—बाबा, तुमच्या पोटीं आल्याची शरम ? शिवशिव ! काय बोलतां हें ?

[ चाल—तोरि नगरिया० ]

**मंदमति खरा मी हा जरी । कृतघ्न नाहीं तरि निर्धारीं ॥ध्रु०॥ निर्धन झालों मित्रहीनही । सुखा पारखा केवळ देही । कृतज्ञता तरि त्यजिन न कधिं तरि ॥१॥**

तुह्मीं उभयतांनीं मला जन्म दि... म्हणून तर मी हे दिवस पहात आहें. बाबा, आई, मी तुमच्या पायां पडतों. मला तुमचा आशीर्वाद असूं द्यावा.

कौस०:—आता ह्येन मला वळखूनशेनी खर खर आई म्हंतल. माजी संमदी आस पुरली पगा. आता माज डोळ सुकान मिटत्याल. रगू, आता आमासंग गावाकड येतुस न्हव ?

रघु०:—तें माझें कर्तव्यच आहे. तुह्मी माझ्यासाठीं इतके थकलांत भागलांत. आतां यापुढें तुमची सेवाचाकरी करून तुमच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याचा प्रयत्न मला केला पाहिजे.

दश०:—हायर द्येवा ! येका खिनात रावाच रंक क्येलस ! बाळासाब, आजप्योतुर आमी आपली चाकरी केलिया. आता आपुन आमची चाकरी करायची गोट बोलता, त्येच लई वंगाळ वाटत बगा.

रघु०:—बाबा, आतां मी बाळासाहेब नाहीं. या उसन्या ऐश्वर्याबरोबरच त्या नांवावरचा माझा हक्क उडाला. मी आतां हें बाघाचें कातडें इथेंच ठेवून आणि ब्राह्मण्याचा शेंदूर पुसून टाकून तुमच्याबरोबर येणार.

ब्राह्मण जातीचा अनुभव आला तितका पुष्कळ झाला. बाबा, आई, आपण शूद्र असलों तरी आपणांत प्रामाणिकपणा आहे, दया व औदार्य वसत आहेत. आपण बाहेरून काळीं असलों तरी निर्मळ अंतःकरणाचीं आहोंत. यांहून अधिक गुण अंगीं नसले तरी आपल्याला लाज वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

कांताः—आई, येथें आणखी किती वेळ उभें रहायचें अपमान सोशीत ?

माल०:—कांते, अजून तुझें अंतःकरण द्रवत नाहीं का ?

कौस०:—रगू, आपुन बी आता लागू वाटला.

रघु०:—चला. (जाऊं लागतो.)

उद्धव०:—बाळा रघुनाथा, मला अगदींच विसरलास का ?

[ चाल—तेजा नभीं ज्या० ]

खोटा पिता हा प्रार्थि तूतें । रोषा न धरिं या करिं
करुणेतें ॥ध्रु०॥ मिथ्या वदोनी तुला वंचियेलें । परि
हेतु सुविमल सकल ते ॥ १ ॥ अरीच्या कुशब्दाहुनी
तीव्र होई । तव मौन विषसम जाळितें ॥२॥

रघु०:—बाबा, आपणांला मी ज्या दिवशीं विसरेन तो दिवस माझ्या आयुष्यांतील अखेरचाच होवो ! बाबा, माझ्या आईबापांनीं मला जन्मच दिला, पण आपण माझें उत्तम संगोपन करून वर मला विद्यादानहि केलेंत. माझ्यासाठीं आपणांला किती तरी दूषणें घ्यावीं लागलीं !

[ चाल—बिलारा रसिया राणा० ]

कसे मी फेडूं ते उपकार ॥ होई शिरिं या थोरचि भार
॥ ध्रु० ॥ मदर्थ देहा कष्ट दिले मनिं व्यथाहि सोशिलि
फार ॥१॥ आनृण्याहुनि परि रुचतो मज वास ऋणांत
अपार ॥ २ ॥

बाबा, मी मनःक्षोभाच्या भरांत आपणांला, माझ्या रक्षणकर्त्याला, माझ्या गुरूला न विचारतांच चाललों होतों याची मला क्षमा करा. बाबा, आम्ही शूद्र जात्या कृतघ्न नाहीं.

कांताः—आई, आतां मी नाहीं रहायची येथें क्षणभरहि. मला अगदीं वीट येऊन गेला आहे. ( रघुनाथाकडे पहात उभी रहाते. )

उद्धव०:—बाळा, आजपर्यंत क्षुल्लक गोष्टींतहि माझ्या आज्ञेशिवाय पाऊल टाकलें नाहींस. माझा शब्द वेदवाक्याप्रमाणें मानीत आलास. माझें मन एका शब्दानेंहि कधीं दुखविलें नाहींस. आणि आतां तुझ्या आयुष्यांतील या अत्यंत बिकट प्रसंगीं माझा सल्ला न घेतां आणि माझ्या इच्छेचा विचारहि न कारितां तूं येथून जाऊं लागलास, हें तुला शोभतें का ? माझी सावलीहि तुला नकोशी झाली ना ?

रघु०:—शिवशिव ! बाबा, ज्या सावलीच्या आश्रयानें मी इतकीं वर्षें आनंदानें काढिलीं ती सावली आतां मला नकोशी होणें शक्य आहे का ? आपल्या सावलीला उभा रहाण्याची माझी इच्छा मावळली असलीच तर त्याचें कारण माझी सावली आपणांवर पडूं नये ही इच्छा, दुसरें कोणतेंहि नाहीं. मी आजपर्यंत आपला शब्द वेदवाक्याप्रमाणें मानीत आलों खरा. पण बाबा, यापुढें वेदच मला पारखे झाले आहेत; तर आपल्या उपदेशावर तरी माझा काय हक्क राहिला ? फार काय, आपणांला बाबा म्हणण्याचाहि मला अधिकार नाहीं. पण तो अधिकार सोडणें मला प्राणसंकट वाटत आहे. बाबा, तो अधिकार तरी मजकडे राहूं द्या येवढीच विनंति आहे. माझी जिनगी, माझी वतनवाडी तेवढीच कायें ती उरली आहे. ती मजपासून हिरावून घेऊं नका.

उद्धव०:—बाळा, तुजकडून बाबा म्हणवून घेण्याचें जें भाग्य मला लाभलें आहे तें मी तरी आनंदानें दवडीन असें तुला वाटलें कसें ? मला निपुत्रिकाला तूंच पुत्रवंत केलेंस. या अपत्यशून्य व सुखहीन वाड्याला तूंच आपल्या हंसण्याखेळण्यानें गजबजवून आनंदमय करून सोडलेंस. त्याच वाड्यांत मला एकट्याला भुताप्रमाणें संचार करण्याला तूं लावणार का? 'बाबा' या गोड हांकेचा माझा खुराक बंद करून तूं मला आसन्नमरण करणार का ? बाळा, तुझ्या अंगीं कृतघ्नतेचा गंधहि वसत नाहीं. या तुझ्या निराश्रित मातापितरांचाहि तूं तावडतोब स्वीकार केलास. बाळा, तूं जर माझा त्याग करून निघून गेलास तर मी निराश्रितांपेक्षांहि निराश्रित होईन. तुला माझी कांहींच का दया येत नाहीं ?

[चाल---अहंकार माझा० ]

अलंकार जाई गृहाचा निघोनी तरि तें भासे विपिनसें
॥ ध्रु० ॥ कुणापाशिं बोलूं । कुठें हृदय उकलूं ।
जिविंचा जिव्हाळा कुणा मानुं ऐसें ॥१॥

दशरथबोवा, तुम्ही तरी माझ्याकरितां एखादा शब्द खर्च करा.

दश०:—नानासाब, अस वापुडवान बोलू नगा. आमी बाळासाबास्नी आपल्या वटीत टाकल तवाच त्ये आपल जाल. आपल्या हुकमाबिगर त्ये आपल पाय कंदीबी न्हाई सोडनार.

उद्धव०:—पण तो इथें राहिला म्हणजे तुम्हांलाहि राहिलेंच पाहिजे. आजपर्यंत तुम्हांला नोकराच्या नात्यानें वागावें लागलें. आतां यापुढें तुह्मीं धाकट्या यजमानाचे वडील म्हणून मालकाप्रमाणेंच वागावें अशी माझी इच्छा आहे.

दश०:—त्ये मातुर न्हाई व्हनार, नानासाब. आमी आजपोतुर नोकर म्हून न्हायलु, तसच म्होरबी न्हाऊ. ह्येच्या म्होरबी बाळासाब आपल ल्येक, आमच न्हाईत.

कौस०:—( एकीकडे ) अर देवा !

कांता:—आई, चल कीं !

माल०:—नानासाहेब, या गोष्टीचा बोभाटा होऊं देऊं नये असें मीहि आपणांला सुचवितें. खरा प्रकार कसाहि असला तरी आपणांला लौकिकाला भ्यायलें पाहिजे.

उद्धव०:—बरें आहे. मी तुम्हां सर्वांच्या इच्छेबाहेर नाहीं.

माल०:—हं, कांते, चल आतां.

कांता:—मी इतका वेळ चल चल म्हटलें तेव्हां आली नाहींस. आतां मीच येत नाहीं, जा.

माल०:—कांते, हा हट्टी स्वभाव सासरीं चालणार नाहीं बरें !

कांता:—नको चालूं देऊं. पण येथें मी तो चालविणारच.

माल०:—बरें, तुझेंच म्हणणें खरें होऊं दे. येथेंच राहूं आणखी कांहीं वेळ.

कांताः—हो तर! मी बरी राहूं देईन!

(जाते. मागाहून मालती जाते.)

उद्धव०:—पोर भारीच छांदिष्ट! आईच्या लाडांनीं अगदींच हेकेखोर बनून गेली आहे. रघुनाथ, जी नादान मुलगी आपल्या आईला जुमानीत नाहीं तिचें बोलणें काय मनावर घ्यायचें आहे!

रघु०:—बाबा, मला आतां साऱ्या जगांत आपणां तिघांवांचून कोणीहि आप्त राहिलें नाहीं. तेव्हां इतरांचा विचार करण्याचें कारण तरी काय?

[चाल—दीं तनदेरेना०]

प्रेममयाचि ही त्रिमूर्ति। निकटिं रहाती ॥ध्रु०॥ एक
भाग्यें मिळतसे निर्व्याज करण्या प्रीतितें। भाग्य माझें
त्रिगुण विधिची हो कृपा ती ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

——:o:——

## प्रवेश १ ला.

[ रघुनाथ व कौसल्या ]

**कौस०:**—त्या पोरीला वाटत तिक्ती आमी हलकी मानस न्हाई. आमी गरीब असलु तरी आमच बापदाद लई सूर व्हत. कारवाऱ्यांच्या आज्याचा पंजा—न्हव खापरपंजा शिवाजी म्हाराजांचा मोटा मनसबदार व्हता. त्येन तलवार गाजवूनशेनी लई कीरत पैदा क्येली व्हती. त्येच्या मागन त्येच्यापुनबी दांडग शिपाईगडी आमच्या घरान्यात जलामल. पन त्ये आज ग्येल, पनज ग्येल, खापरपंजबी ग्येल, आन् आमच्या हातामंदी आलया खापर! आपल्या घराभवती वाडवडलांच्या समाद्याबी मायंदाळ्या हैती.

**रघुनाथः**—आई, त्या शूर पुरुषांच्या समाधींचें दर्शन घेण्याला मी कसा उतावीळ झालों आहें! त्यांनीं आपल्या अस्थींकरितां स्थान तरी किती शांत व सुंदर शोधून काढिलें! तूं मघाशीं आपल्या शेतवाडीचें आणि झोंपडीचें जें वर्णन केलेंस त्यावरून कुशल चितान्याला सुंदरसें चित्र तयार करितां येईल! एका बाजूला हिरवळीनें आच्छादिलेल्या टेकड्या, त्यांमधून झुळझुळ वहात आलेली आणि उलट बाजूच्या खुल्या मैदानावरून दृष्टीच्या टप्प्यापलीकडे निमूळती होत गेलेली नदी, तिच्या कांठचें तें चकाकणारें वाळवंट, वाळवंटांत लागणारे मधुर पाण्याचे झरे, भोंवतालच्या कुरणांत चरणारे गाईवासरांचे कळप, त्यांजवर राखण करितांना पांवा वाजविणारीं गुराख्यांचीं पोरें, जवळच्या बनांत फल-पुष्पांनीं लादलेले वृक्ष आणि त्यांमधील महादेवाचें पडकें देऊळ! अहाहा! सारेंच कांहीं अकृत्रिम! अशा ठिकाणीं पाणी, वायु, गुरें, माणसें सारेंच कांहीं स्वच्छंदानें नाचतांना बागडतांना आढळायचें! तेथें मनुष्यामनु-

ष्यांत तर राहोच, पण इतर सृष्टींतहि जातिभेद आढळायचा नाहीं. चोहोंकडे प्रेमाचें साम्राज्य दिसायचें! टेंकड्यांनीं नदीच्या कंठाभोंवतीं आपल्या भुजांचें कडें करायचें, नदीच्या लाटांनीं कांठावरील वृक्षांच्या मांडीवर लोळायचें, वायूनें लाटांशीं आणि वृक्षांच्या पानांशीं क्रीडा करायची, गुराख्यांनीं गाईच्या गळ्यांस मिठ्या मारायच्या! अशा ठिकाणीं दिवसा वृक्षांच्या शीतळ छायेखालीं पडून किंवा नदीच्या पाण्यांत डुंबत, व रात्रीं उघड्या वाळवंटावर पडून वरील गगनरूपि सैकतांतील तारकारूपी गारगोट्यांकडे पहात काळ घालविणें किती सुखाचें वाटेल बरें!

कौस०:—व्हय व्हय! तुला तत लई ग्वाड वाटल! आन् रातदीस तत चिलीम वडत पडून न्हाव असच वाटल. पन रातचा परकार न्यारा आन् दिसाचा न्यारा. जवा सुर्व्येनारायन लाल कांद्यावानी उगवतुया आन् आबाळामंदी वरवर येऊनशेनी ढवळ्या कांद्यावानी पांडरा फटक पडतुया तवाची सोबा काई न्यारी न्हाती. आन् जवा का लसनाच्या कांडीवानी चांदोबाची कार चमकातिया आन् संमद तार लुकलुकलुक करत्याती तवाची सोबाबी अक्षी न्यारी! जनु काय चाळणीमन्न पांडर पीटच पडतया!

रघु०:—(स्वतःशीं) पण प्रेमाचें माणूस जवळ नसल्यावर अशा स्थानीं प्रेमाचें साम्राज्य कुठून दिसणार? कारण मनांत प्रेम जागृत झाल्याशिवाय त्याचें इतरत्र वास्तव्य आढळत नाहीं, व जवळ प्रेमाचें माणूस असल्याशिवाय मनांत प्रेमाची जागृति होत नाहीं. माझ्यासारखा प्रेमाला अंचवलेला मनुष्य तर प्रत्येक वस्तूंत प्रेमाऐवजीं द्वेषच शोधूं लागेल. मीं प्रेमाच्या प्रभावाचे ह्मणून जे दाखले दिले ते त्यास द्वेषाच्या प्रभावाचे वाटून नदीरूपी तरवार टेंकड्यांचें पोट फाडून बाहेर पडत आहे, नदीचें पाणी कांठावरील वृक्षांचीं पाळेंमुळें खणून टाकीत आहे, वायु लाटांना ईर्षेला पेटवीत आहे व पानांस पदच्युत करूं पहात आहे, गुराखी गाईचे गळे दाबीत आहेत असाच त्यास भास होईल. प्रेमाला संवकलेल्या माझ्यासारख्या माणसाची काय तरी ही दुर्दशा! मनुष्यवसतीं निर्मळ प्रेम लाधत नाहीं, आणि निर्जन अरण्यांत निर्मळ प्रेम असूनहि दिसत नाहीं! मला यापुढें माणूसघाण्या झाल्यावांचून गत्यंतरच उरलें नाहीं.

कौस०:—आमच्या गावी न्हायाला पैकावी लई लागत न्हाई. सरपनकाडी फुकाट, श्येनी लावाया श्यानबी मायंदाळ.

रघुनाथ:—मी जवळ असल्यावर तुह्मांला खर्चाची कशाला पाहिजे आहे काळजी?

कौस०:—पन तुला तत आमासंग याया होव ना? तू त्या पोरीच्या जाळ्यामंदी पुना गवासशील अस भ्या वाटतया.

रघु०:—त्याचीहि नको काळजी. ती अगदीं बेपर्वा मुलगी आहे. आणि मलाहि पण कांहीं अभिमान आहेच कीं नाहीं?

कौस०:—का नसल? तुज्या आंगात जवानमरद बापदाद्यांच रगात ख्येळतया न्हव? पन आवाशी परसंग पडला म्हंजी गरम रगतबी थंड पडतया, आँन पट्ट्याच हातबी म्यानामंदीच न्हात्याती.

रघु०:—तें खरें. पण मी कांहीं असा कच्च्या दिलाचा नाहीं. पुन्हां तसा प्रसंग आला तर तिला जन्मभर यादच राहील असें करीन.

कौस०:—काय करशील?

रघु०:—प्रसंग तर येऊं दे म्हणजे दाखवीन.

कौस०:—दावन्यापरीस परसंगाचीच वाट बगतुयास! काय करशील त्ये सांग अदुगर.

रघु०:—अबलेवर शस्त्र तर चालवायचें नाहीं? तिच्या तोंडाला तोंड देणें हा सुद्धां कमीपणाच आहे. मी तिच्याशीं न बोलतां निघून येईन झालें.

कौस०:—म्हंजी पट्ट्याच हात म्यानामंदी न्हायल, असच न्हव? मला त्या परसंगाच इक्त भ्या वाटतया की हतन कंदी पाय काडाया गवसतुया ह्येची वाट पगून हाय मी.

रघु०:—मी गेलों तर बाबांना फार दुःख होईल. त्यांच्या सुखाची निश्चिती झाली म्हणजे मी येथून निघालोंच समज.

कौस०:—त्येंच्या सुकाची फिकर नग. ती मालतीबया हाय न्हव? तिन त्येंना अश्शी घ्येरून टाकलया. ती त्येंना तवाच सुकात डुबाया लावील; अश्शी गटांगळ्या दिईल.

रघु०:—छे, आई, हा कांहीं तरी तर्क आहे तुझा.

कौस०:—मंग तूच बोल, नानासावानी तुमासनी लगान लावाया परमानकी का न्हाई दिली?

रघु०:—आमच्या जाती निराळ्या आहेत हें न कळवितां परवानगी देणें विश्वासघाताचें झालें असतें; आणि तें तर त्यांना कळवितां येईना.

कौस०:—रगू, तूं कारबाऱ्यावानीच भोळा सांब हैस.

रघु०:—तुझा तर्क काय आहे?

कौस०:—तुमच लगान लागल असत तर त्येंच कस लागत?

रघुनाथः—त्यांचा उदार स्वभाव तुला माहित नाहीं. त्यांना आमच्या सुखापुढें स्वतःच्या सुखाची कांहीं मातब्बरी वाटणार नाहीं.

कौस०:—त्येचा अनवाव यईल तवा तुज डोळ उगडत्याल. त्येंचा म्होतुर जमला तर तू आमासंग चलाया कबूल हैस?

रघुनाथः—अगदीं एका पायावर.

कौस०—आन् तीं आवा तुला इस्त्रा आन् अरज्या करल तवा?

रघुनाथः—त्याची मला आशाच—नव्हे भीतिच—नाहीं.

कौस०:—ब्येस हाय, ह्ये संमद ध्येनात न्हाऊ द्ये. (जाते.)

रघुनाथः—(स्वतःशीं)माझ्या आईबापांच्या घराचें कितीहि सुंदर चित्र मीं आपणापुढें उभें केलें तरी येथून पाय काढणें मरणप्राय वाटतें. मरणाचा अर्थ तरी अत्यंत परिचयाच्या जगांतून अगदीं नवख्या जगांत वस्ती करायला जाणें असाच आहे. मरणानें स्मृतिनाश होत असल्यामुळें दोन्ही जगांची तुलना व्हावयास जागा नसते. माझी आठवण मात्र कायम राहणार असल्यामुळें मला तेथें पदोंपदीं अडखळल्यासारखें होईल. एकदां येथून गेलों कीं या प्रदेशांत पुनर्जन्म होण्याचीहि आशा बाळगायला नको. (जातो.)

# प्रवेश २ रा.

[ मालती व कांता. ]

**माल०**:—आतां तरी राग पुरा ओसरला का?

**कांता**:—ओसरून काय करायचें?

**माल०**—ओसरला असला तर तुझ्या कालच्या विक्षिप्तपणाच्या वागणुकीबद्दल बोलतां तरी येईल. कोणाशीं कसें वागावें हें तुला अजून कळत नाहीं. नानासाहेबांची केवढी तरी योग्यता! त्यांनीं केवळ प्रेमाकरितां आजपर्यंत ब्रह्मचर्य पाळिलें; आणि त्यांना तूं किती तरी टाकून बोललीस ती!

**कांता**:—त्यांनीं प्रेमाकरितांच ब्रह्मचर्य पाळिलें हें तुला कसें कळलें?

**माल०**:—डोळे उघडे ठेवले म्हणजे सगळें कांहीं कळतें. अगबाई! कांते, तुझे डोळे असे लाल कशानें झाले? आणि सुजलेलेहि दिसतात. काल रात्रीं सारखी रडत होतीस वाटतें?

**कांता**:—मीं असा कोणता गुन्हा केला आहे रडत बसायला?

**माल०**:—करूनसवरून कबूलहि करायचा नाहीं हें तुलाच शोभतें. काल त्या बिचाऱ्या रघुनाथाला फडाफडा टाकून काय बोललीस! त्याच्यावर डोळे काय फाडलेस! आणि चहूंकडे थैमान काय घातलेंस!

**कांता**:—मग त्यानें माझा येवढा मोठा अपराध कां करावा?

**माल०**:—इतकें होऊन त्याचाच का अपराध? सांग पाहूं कोणता तो?

**कांता**:—मी कोणाचीहि पाठीमागें निंदा करणार नाहीं; समक्षच पदरांत घालीन.

**माल०**:—मोठी उदारच कीं नाहीं तूं! मग त्याची क्षमा मागून समजावणी करायला तूं तयार नाहींस तर?

**कांता**:—मी त्याची क्षमा मागूं? आणि ती कां? छेः! तें नाहीं होणार. यानेंच मागितली पाहिजे; आणि ती सुद्धां माझ्यासमोर गुडघे टेंकून!

**माल०**:—त्यानें मागितली तर तूं त्याला क्षमा करशील तरी का?

कांताः—तो आपली पायरी ओळखून वागायला कबूल झाला तर मी त्याला आनंदानें क्षमा करीन. क्षमा न करायला मी राक्षसीण का आहें, आई?

माल०:—मग केव्हां जाणार त्याच्या घरीं?

कांताः—मी त्याच्या घरीं जाणार नाहीं. गेलें तर मीच क्षमा मागायला आलें आहें असा त्याचा समज होईल.

माल०:—मला नाहीं वाटत त्याच्यासारखा मानी मुलगा कालच्या प्रकारानंतर येथें येईल म्हणून. तुमच्या नेहमींच्या बसायच्या जागीं मात्र आला तर येईल.

कांताः—मीं खूण केली म्हणजे त्यानें हातचें काम सोडून यायचें असें आमच्यामध्यें ठरलेंच आहे मुळीं.

माल०:—पण काल तूं त्याच्याशीं लढाई जाहीर केलीस. आतां ते पूर्वींचे करारमदार काय कामाचे?

कांताः—मला आपलें वाटतें कीं माझा बाहुटा पाहिल्यावर रघुनाथ आल्यावांचून राहणार नाहीं.

माल०:—तसा तो समजूतदार आहे. तूं त्याला क्षमा करायला का होईना, त्याच्या भेटीला आपण होऊन गेलीस म्हणजे त्याची किंमत क्षमा मागण्याइतकीच आहे हें समजण्याइतकें शहाणपण त्याच्या अंगीं आहे.

कांताः—तो आपल्या मनांत कांहीं समजो. माझें कर्तव्य मला केलें पाहिजे खरें.

माल०:—कर्तव्य करतांकरतां भांडायला लागशील एखादी! त्याच्याशीं शांतपणानेंच बोल. तो शूद्र आहे याबद्दल त्याची निर्भत्सना करूं नकोस. त्यांत त्याचा कांहीं गुन्हा नाहीं. तुझा व त्याचा यापुढें फारसा संबंध येणार नाहीं. तेव्हां त्याचें मन आपणाबद्दल विनाकारण बिघडवून घेण्यांत काय फायदा?

कांताः—इतकें शिकवायला मी आतां कांहीं लहान नाहीं.

माल०:—कान मात्र वाढले आहेत खरे.

कांताः—बरें, तूंच पहाशील मी ही भेट कशी बिनबोभाट पार पाडतें ती!

माल०:– घोडामैदान जवळच आहे. पाहूं किती शहाणपणानें वागतेस ती! (पडदा पडतो.)

---

## प्रवेश ३ रा.

रघुनाथः—(स्वतःशीं) माझे डोळे असे वरचेवर आमच्या संकेत-स्थानाकडे कां जातात? तें स्थान मजप्रमाणें तिलाहि दृष्टिसमोर नकोसें झालें असेल. आमचीं प्रेमवचनें ऐकण्यास सरावलेल्या वृक्षलता आमची वाट उत्कंठेनें पहात असतील; पण त्यांना पुन्हां आमचें दर्शन होणार नाहीं.

[चाल—जानकीनाथ क गाऊं०]

**अंकुर प्रेमतरूचा। बघती ॥ध्रु०॥ मृदुलहृदय तीं**
**त्यांसि तयाचा क्षय सहवे हा कैंचा॥ १ ॥**

त्या वृक्षांच्या सालींवर आणि पानांवर जर आमचीं प्रेमवचनें उमटलेलीं असतीं तर तें स्थान यापुढें दीर्घ कालपर्यंत प्रेमाचें पवित्र क्षेत्र म्हणून गणलें गेलें असतें. परंतु त्या स्थानाचें दर्शन घेणाऱ्या असंख्य यात्रेकऱ्यांपैकीं एकालाहि कल्पना आली नसती कीं, या प्रेमाची आयुर्मर्यादा सारी दोन दिवसांची होती. एका सूर्यास्ताबरोबर त्याचा उदय, दुसऱ्या सूर्यास्ताबरो-बर त्याचा विकास आणि तिसऱ्या सूर्यास्ताबरोबर त्याचा अस्त झाला. त्या दिवशीं कल्याण अंधळीकोशिंबीर खेळत असतां आम्ही त्यास हंसत होतों. पण खरी अंधळीकोशिंबीर आमचीच चालली असून दैव आम्हांला हंसत होतें. देवा, मानवी प्रेमाची हीच का शाश्वती? अरे, पण माझे डोळे एकाएकीं असे बिघडले कशानें? हें भलतेंच काय दिसतें आहे मला! त्या झाडावर खुणेचा बाहुटा चढत आहे. कांता माझ्या भेटीची इच्छा करील हें संभवतच नाहीं; तेव्हां माझे डोळे बिघडले हेंच खरें. कदाचित् कोणी दुसराच मनुष्य आपल्या हातानें तो बाहुटा भ्रष्ट करीत असेल. कांहीं का असेना! तेथें गेलें पाहिजेच. आजपर्यंत तिकडे जातांना मला उत्सवास जाण्याइतकी उत्कंठा वाटत असे; पण आज स्मशानभूमीकडे जात आहोत अशी विपरीत कल्पनाच मनासमोर उभी रहात आहे.

(जाऊं लागतो. कल्याण प्रवेश करितो.)

कल्या०:--हं, हं, बाळासाहेब, कोठें चाललांत? तिकडे जात असाल तर मी येतों बरोबर.

रघु०:—कल्याण, दूर हो. माझा विटाळ होईल तुला.

कल्या०:—बाळासाहेब, तुमचा आणि मला विटाळ?

रघु०:—मी शूद्र आहें ना?

कल्या०:—त्या अमंगळ शब्दाचा उच्चार सुद्धां नका करूं. तें अगदीं खोटें आहे; आणि तुम्ही जर शूद्र असाल तर तुमच्या पायांचा नोकर मीहि शूद्रच आहें. मला पायांपासून लोटूं नका.

[चाल—हे रघुराया०]

दास असें मी। स्वामी। लोटित कां मज दूर तुम्ही ॥ध्रु०॥ विराटचरणांतुनि जरि झालां। तद्वदनें हा देह निर्मिला। पदिं नमवीं शिर प्रेमीं ॥ १ ॥

रघु०:--कल्याण, तुझें प्रेम पाहून गहिंवर येतो. असेंच प्रेम नेहमीं ठेव म्हणजे झालें.

कल्या०:--मग मी येऊं ना बरोबर?

रघु०:—कांहीं नको. तेथें कांता नाहीं कांहीं नाहीं.

कल्या०:--मग माझी कांहीं जरूर नाहीं. पण जर का ती तेथें आली तर मात्र मला इशारा करा. म्हणजे मी धांवतच येतों.

(रघुनाथ एका बाजूनें व कल्याण दुसऱ्या बाजूनें जातो.)

---

# प्रवेश ४ था.

कांता:--( स्वतःशीं ) त्याला क्षमा करण्याची मला कोण पण उताबळी झाली आहे! माझा स्वभाव इतका उदार आहे याची मला या घटकेपर्यंत कल्पना नव्हती. अपराध्याला क्षमा करणें हें केवढें तरी आनंददायक कर्तव्य आहे! त्यानें माझ्या पायाला स्पर्श करायचा, मीं त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला अभय द्यायचें, सारेंच कांहीं स्फूर्तिदायक

आहे! पण त्यानें माझ्या पायाला हात लावण्याऐवजीं हातालाच लावला तर? लावीना का! मला उट्टें फेडतां येत नाहीं वाटतें? मीं माझ्या मस्तकानें त्याच्या हृदयाला असा धक्का देईन कीं, त्यानें जन्मांतहि कधीं पाहिला नसेल. हा पहा आलाच! याला पाहिल्याबरोबर माझे शौर्याचे विचार जागच्या जागीं राहून याच्याकडे पहाण्याचीच भीति वाटूं लागली आहे. ( रघुनाथ प्रवेश करितो. त्याजकडे न पहातां ) मी आज एका माणसाला क्षमा करण्याला आलें आहें.

रघु०:—माझी माणसांत गणना होत आहे हें तरी सुदैवच समजलें पाहिजे. ( कौसल्या प्रवेश करून आडून ऐकत उभी रहाते. )

कांताः—पण ती क्षमा गुडघे टेंकून अदबीनें मागितली पाहिजे

रघु०:—तूं जो माझा गुन्हा केलास त्याबद्दल मींच तुझी क्षमा मागायची? हा उलटा न्याय तुझा तुलाच शोभतो.

कांताः—मीं तुझा गुन्हा केला? तो कसा?

रघु०:—पहिल्यानें माझा गुन्हा शाबीत कर, आणि मग तुझ्या गुन्ह्याचें पहातां येईल. मी कांहीं येथें तोऱ्यानें तुला क्षमा करायला आलों नाहीं.

कौस०:—( एकीकडे ) हां! हंग ठीक हाय!

कांताः—मी तोऱ्यानें आलें का? बरें आहे, आलें तशी जातें बापडी! ( जाऊं लागते. )

रघु०:—जातेस कोठें? मला चिडवून माझ्या प्रश्नाला उत्तर न देतां चाललीस कशी? सांग माझा गुन्हा कोणता तो.

कांताः—असें कायरे झोड माणसासारखें करतोस? तूं शूद्र आहेस हें वेळींच मला कळविलें नाहींस, हा गुन्हा नाहीं वाटतें?

रघु०:—मी शूद्र आहें याचें मला स्वप्न पडलें होतें वाटतें?

कांताः—त्याशिवाय का तूं मला परवां विचारिलें होतेंस कीं तूं शूद्र असतास तर मी तुझ्याशीं कशी वागलें असतें ह्मणून?

रघु०:—अस्सें! मला ही गोष्ट माहित होती असें त्यावरून तूं अनुमान काढिलेंस? शाबास आहे तुझ्या धूर्ततेची!

कांताः—माझी भिस्त नुस्त्या अनुमानावरच नाहीं. तुमचा कल्याण

काल रात्रीं आमच्याकडे आला होता, तो तर मला सांगत होता कीं, त्या कौसल्येला तूं एकांतांत आई म्हटलेलें खुद्द त्यानें आपल्या कानांनीं ऐकलें.

रघु०:—प्रेमासाठीं भुकेलेल्या एका जीवाचें समाधान मीं 'आई' या एका शब्दानें केल्याबरोबर इतकीं वर्षें तुझ्याशीं एकनिष्ठतेनें वागून मिळविलेला विश्वास मीं पार दवडून बसावें ना? कांते, मीं त्या वेळीं तो शब्द केवळ भूतदयेनें उच्चारिला. पण माझ्या सांप्रतच्या ज्ञानाच्या दृष्टीनें तें मीं एक पवित्र कर्तव्यच केलें असें मला वाटत आहे. त्या एका शब्दासाठीं मीं आपल्या जिवलग मैत्रिणीच्या विश्वासालाहि तिलांजलि द्यावी, अशीच निःसंशय त्याची योग्यता होती.

कांता:—ज्याअर्थीं माझा तुझ्यावरील विश्वास खरोखरच उडाला आहे, त्याअर्थीं मी तुला असें विचारतें कीं, तो शब्द उच्चारतेवेळीं तुला आपल्या जन्माचा सुगावा नव्हता असें मीं कां समजावें?

रघु०:—बरें विचारलेंस! मला जर माझें जन्मरहस्य माहित असतें, तर माझ्या आईला पुत्रशोकानें वेड लागलेली असा अपवाद ओढून कां घ्यावा लागला असता? माझ्या आईबापांनीं तें रहस्य मजपासून लपवून ठेवण्यांत जो स्वार्थत्याग दाखविला, तो त्यानें मला लाज वाटूं नये म्हणूनच ना?

कांता:—छे छे! त्यांचा उद्देश मला फसविण्याचाच होता.

रघु०:—तुला फसवून त्यांना काय मिळणार होतें? माझ्या आईची सून होण्याचा तुला जितका तिटकारा आहे त्यापेक्षांहि तुझी सासू होण्याचा तिला आहे.

कांता:—तुला तें रहस्य माहित नसलें तरी तूं त्याकडे निदान डोळेझांक तरी केलीस खास. तूं चौकशी केली असतीस तर तुला तें कळलें असतें.

रघु०:—पण मला संशय येईल तेव्हां ना मीं चौकशी करायची? तूं केली आहेस कधीं आपल्या जन्माबद्दल चौकशी? माझ्या आईबापांनीं जसें मला बाबांच्या स्वाधीन केलें तसें तुझ्या आईबापांनीं तुला मालतीकाकूंच्या ओटींत घातलें नाहीं अशी तुझी तरी खात्री आहे?

कौस०:—( एकीकडे ) भल भाद्दर!

कांताः—पण तुला संशय येण्याला कारणें झालीं होतीं. तें कुणबी जोडपें येथें येऊन हक्कानें राहिलें, आणि तुझ्यावर अतोनात प्रेम करूं लागलें.

रघु०:—तें इतरांनाहि दिसत होतें. त्यांना नाहीं संशय आला तो ?

कांताः—त्यांच्या आणि तुझ्या चेहऱ्यांत आणि लकबींत सारखेपणाहि होता.

रघु०:—पण तें मजपेक्षां इतरांच्याच लक्ष्यांत यायचें. त्यांनीं नाहीं कुठें त्यावरून माझ्या जन्माबद्दल अटकळ बांधली ? संशय यायचें तर दूरच राहो, पण माझी आई जेव्हां मजवर हक्क दाखवूं लागली तेव्हां तूंच तिला खोटें म्हटलेंस. तुझ्यासारख्या हुशार ब्राह्मण मुलीलाहि संशय आला नाहीं; मग माझ्यासारख्या मठ्ठ शूद्राला कसा यावा ?

कांताः—मीं तुला मठ्ठ म्हटलें म्हणून राग आला वाटतें ?

रघु०:—मठ्ठच काय, पण तूं आणखी सुद्धां जीं दूषणें मला दिलींस तीं या हृदयांत शल्यें होऊन बसलीं आहेत. कांते, तूंच सांग, एखादा माणूस मठ्ठ किंवा मंद असला तर त्यांत त्याच्याकडे कांहीं दोष आहे का ? माझ्या वडिलांचे दोष मजमध्यें उतरले यांत माझा काय कसूर ? बरें, केवळ दोषच उतरले आहेत असें नाहीं; त्यांच्याबरोबर सद्गुणहि उतरले आहेत. माझे वाडवडील फार पराक्रमी होते असें ऐकतों. या काळांत अंगच्या पराक्रमाला फारसा अवसर नसला तरी नैतिक धैर्याला वाटेल तितका आहे. आमचें कुळ प्रामाणिक, एकनिष्ठ आणि पापभीरु आहे. शिवाय आम्हांला हृदय आहे, अंतःकरण आहे.

कौस०:—( एकीकडे ) व्हय, आमी हाऊच तस !

कांताः—आणि मला नाहीं वाटतें हृदय ?

रघु०:—रुधिराभिसरणाचें नियमन करणारा हृदय नांवाचा जो अवयव प्रत्येक प्राण्याच्या शरीरांत असतो तो तुझ्याहि शरीरांत आहे. पण त्यानें दया, सहानुभूति या भावनांचा बोध मात्र होणार नाहीं.

कांताः—रघुनाथ, मी इतकी का निर्दय आहें ?

रघु०:—मूर्ख तरी असली पाहिजेस किंवा निर्दय तरी असली पाहिजेस. तूं ब्राह्मण आहेस तेव्हां तुला मूर्ख म्हणतां येत नाहीं. तूं निव्वळ निर्दय आहेस.

कांताः---असें निर्दयपणाचें कृत्य तरी मीं काय केलें ?

रघु०:---करून सवरून वर आणखी विचारतेस ! तुझ्या धारिष्टाची शर्थ झाली ! काल मी शूद्र आहें हें कळल्याबरोबर मला जगाची उलटा-पालट झाल्यासारखी झाली ! माझ्या जीविताला भयंकर धरणीकंपाचा धक्का बसला ! मी चातुर्वर्ण्याच्या शिडीच्या वरच्या पायरीवर सुरक्षितपणें बसलों होतों, तो गडगडत खालच्या पायरीवर येऊन आदळलों. माझे पालनकर्ते बाबा मला वर खेंचूं लागले, आणि माझे जन्मदाते मला खालीं ओढूं लागले. दोघांच्या खेंचाखेचींत मी चेंगरून निश्चेष्ट होण्याच्या बेताला आलों. मी भांबावून गेलों, बावरून गेलों ! कशाला ठाम धरून बसावें हेंच मला कळेना. अशा प्रसंगीं, कांते, तुझें प्रेम टिकून राहिलें असतें तर तें मला मेरूप्रमाणें अचल आश्रयस्थान वाटलें असतें. तुझें हृदय जर खंबीर राहिलें असतें तर तें माझ्या भांबावलेल्या मस्तकाला विश्रांतिस्थान वाटलें असतें. पण तुझें हृदयच अचल राहिलें नाहीं, तुझें प्रेमच डळमळलें, तर त्यांनीं मला बुडत्याला सांवरून तरी कसें धरावें? त्या दोघांचाही माझ्याप्रमाणेंच अधःपात झाला होता, तेव्हां त्यांनीं मला आश्रय दिला नाहीं याचें मला नवल वाटलें नाहीं. पण जिनें माझी बाजू उचलून धरायची तीच मला गर्तेत लोटण्याला मदत करिते आहे, जिनें माझ्यावर कृपेची सावली करायची तीच मजवर आग पाखडते आहे असें जेव्हां मला दिसलें तेव्हां मला मेल्यापेक्षांहि मेल्यासारखें झालें असल्यास नवल नाहीं. कांते, मीं तुजपाशीं करुणेची याचना केली, पण तिनें तुझा क्रोधाग्नि भडकला मात्र ! मीं आपल्या प्रेमाची तुला आठवण देऊन पाहिली, पण तिनें त्या क्रोधाग्नींत तेल मात्र ओतलें ! त्या अग्नीच्या असंख्य ठिणग्या जेव्हां तूं मजवर उडवूं लागलीस तेव्हां मला वाटलें कीं, रागानें तुझी विचारशक्ति नष्ट झाल्यामुळें तूं आपल्या कृत्याबद्दल जबाबदार नाहींस. पण विचाराला सवड सांपडल्यावरहि तुझा अभिमान ज्याअर्थीं कायम आहे त्याअर्थीं तूं खरोखरच निर्दय आहेस अशी माझी खात्री झाली आहे.

[ चाल---अरियो अंधियारी नजर० ]

हृदय नव असे । कठिण पवि तसें ॥ध्रु०॥ द्रव न लव

तया । न परिचित दया । सद्सन्मतिही मुळिं अंतरिं
न वसतसे ॥१॥

**कौस०:**—( एकीकडे ) भल रे माझ्या शिपाया !

**कांता:**—रघुनाथ, पुरे कर. मला आपल्या कृत्याचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. मी त्याबद्दल तुझी मनापासून क्षमा मागतें. पाहिजे तर पायांहि पडतें.

[ चाल—नाहिं नाहिं सखि बोलोना० ]

चरण धरित शिर नमवित करिं लव करुणा ॥ अग-
तिक तव नवरि दुबाळे विनवित शरणा ॥ध्रु०॥ नच
मतिबल हृदय अबल अनुभवहि उणा ॥ १ ॥ दोष न
मम विसरशि तरि वरिनाचि मरणा ॥२॥

**रघु०:**—पण तूं मला क्षमा करायला येथें आली होतीस ना ? आणि हें काय भलतेंच ?

**कांता:**—रघुनाथ, मी येथें आलें तेव्हां अभिमानानें कशी फुगून गेलें होतें. पण तुझ्याशीं बोलूं लागतांच माझा सारा अभिमान गळाला, आणि मन निवळून शुद्ध झालें आहे. रघुनाथ, मला आयुष्यांत तुझ्या-सारखा खरा हितचिंतक आणि साहाय्यकर्ता कोणी तरी मिळेल का रे !

**रघु०:**—तुला साहाय्य करण्याचा माझा हक्क केव्हांच नष्ट झाला आहे. तुझ्या पायाला कांटा बोंचला तर तो काढण्याचा मान आजपर्यंत मज-कडे असे. तुझें कपाळ दुखूं लागलें कीं त्याजवर सुंठ घालण्याचें काम माझें असे. तूं रडूं लागलीस म्हणजे पदरानें तुझे डोळे पुसण्याचा अधिकार मला असे. पण मी शूद्र आहें हें कळल्यापासून तुला शिवण्याचाहि अधिकार मजकडे उरला नाहीं.

**कांता:**—पण तूं शूद्र आहेस हेंच मुळीं मला खरें वाटत नाहीं. नानासाहेब आणि ते कुणबी म्हणतात म्हणूनच तें खरें मानायचें ना ! पण त्या तिघांनीं आजपर्यंत त्या गोष्टींत जें मौन धरिलें त्यावरूनच त्यांज-वर विश्वास ठेवितां येत नाहीं हें उघड नाहीं का झालें ?

**रघु०:**—कांते, तूं ज्या तीन व्यक्तींबद्दल अनादरानें बोलत आहेस

त्या मला अत्यंत पूज्य आहेत हें ध्यानांत वागवून मग काय बोलायचें असेल तें बोल. तसेंच मी शूद्र आहें याबद्दलहि संशय काढण्याचें आतां कारण नाहीं. तसा संशय प्रकट करणें म्हणजे माझ्या जातीबद्दल तिरस्कार दाखविण्यासारखें आहे.

कांताः—बरें, मी कदाचित् ब्राह्मण नसून तुझ्यासारखी शूद्रच असेन असा संभव असल्याचें तूं मघाशीं बोलून दाखविलें होतेंस, तो संभव खरा नसेल कशावरून ?

रघु०ः—तें बोलणें नुस्तें युक्तिवादापुरतें होतें.

कांताः—असेल. पण त्या बोलण्याच्या धोरणानें मी शोधच करूं लागलें तर तो संभव एखादे वेळीं खराहि ठरायचा. नाहीं असें कोणीं सांगावें ? बाकी मी शोध करायचीच नाहीं म्हणा; कारण शोध केला आणि तो संभव खोटा ठरला तर ?

रघु०ः—मग काय तुला शूद्र म्हणवून घेण्यांत आनंदच वाटतो असें मीं समजायचें ?

कांताः—तुझी जात तीच माझी जात आहे असें मानण्यांत मला खरोखरच आनंद वाटतो. आतां तूं ब्राह्मण होणें जर अशक्यच होऊन बसलें तर मीं शूद्र होण्याला तयार असलें पाहिजे हें ओघानेंच आलें.

कौस०ः—( एकीकडे ) अर, ह्ये काय ? संमद गाड उलाटल की !

रघु०ः—मग तुला कांदा, लसूण, चिलीम यांबद्दल जो तिटकारा होता, तोहि गेला असें समजायचें कीं काय ?

कांताः—तिटकारा गेला इतकेंच केवळ नाहीं, तर तूं शूद्र आहेस हें कळल्यापासून मला त्यांबद्दल आवडहि उत्पन्न झाली आहे. तुला खरें सांगूं ? तुम्ही सुधारक लोक नेहमीं कांदा लसूण खातां; पण आमच्या घरीं त्यांचा वासहि खपत नाहीं हें तुला माहित आहेच. इतकें असून काल मला तीं खाण्याची इतकी लहर उत्पन्न झाली कीं, मीं तीं गुप्तपणानें कल्याच्या हातीं तुझ्या घरून आणविलीं आणि मिटक्या मारीत खाल्लीं. ही गोष्ट आईपासून लपविण्याला मला नंतर बरेच वेलदोडे खावे लागले. पण ती घाण—नव्हे, तो वास—माझ्या तोंडाला अजूनहि येत असेल. खोटें वाटत असेल तर बघून घे.

कौस०:—( एकीकडे ) अरर! ह्यंच पुना म्येतकूट जमल की! आता अदुगर मालतीबाईकड जाऊनशेनी ह्ये त्यंच्या कानावर घालाया व्होव. ( जाते. )

रघु०:—( कांतेच्या तोंडाजवळ तोंड नेऊन ) खरेंच कीं! कांते, हें सारें तूं माझ्याकरितां केलेंस ना? आणि हे डोळे सुजून लाल कशानें झाले आहेत? रडत होतीस वाटतें?

कांता:—मग काय तुझी माझी जन्माची ताटातूट झाल्याबद्दल हंसूं? काल त्या भयंकर प्रसंगीं तुझीं दीनवाणीं भाषणें ऐकूनच माझें हृदय फुटायच्या बेताला आलें होतें. घरीं जातांच मीं अंथरुणावर पडून त्या हृदयाला वाट मोकळी करून दिली.

रघु०:—मघाशीं मीं तुला निर्दय, कठोर हृदयाची म्हटलें तें विनाकारणच तर? कांते, तुझ्या कोमल अंतःकरणाचा हा भक्कम पुरावा तुजजवळ असतां तो त्या वेळीं माझ्यापुढें मांडून मला निरुत्तर कां केलें नाहींस?

कांता:—रघुनाथ, मीं तो पुरावा जर मुद्दाम तुला निरुत्तर करण्यासाठीं उत्पन्नच केला नव्हता तर त्याचा उपयोग करण्याची कल्पना तरी मला कुठून सुचावी? शिवाय तुझें भाषण एकदां सुरू झालें, कीं तें स्तुतिपर असो कीं निंदापर असो, ऐकतच बसावेंसें वाटतें. दुसऱ्या कशाचेंहि भान रहात नाहीं. मग तुला निरुत्तर करावेंसें तरी मला कां वाटावें?

[ चाल—मारा गेंडेका० ]

तुज देखतां गुंगें। तव वचःश्रवणीं रंगें ॥ ध्रु० ॥ तूज-
भोंवतीं मति पिंगे। घालिते सदा जणु झिंगे ॥ १ ॥
होइं निकटिं पुलकित अंगें। विरहिं मनीं समता भंगे ॥२॥

रघु०:—कांते, तूं अजाण अर्भक आहेस. प्रेमळ मनुष्याला दुखवूं नये हें जसें तुला कळत नाहीं तसें स्वतःचा बचाव कसा करावयाचा हें सुद्धां तुला कळत नाहीं.

[ चाल—मुनसफी दुनियासे० ]

बालसम निष्कपट होसी तूं गडे ॥ होइ गति संसारिं
कैशी तव पुढें ॥ ध्रु० ॥ गाढ भवसागर महान् हा

धडधडे । सत्य गणिसी तूं तयाचे बुडबुडे ॥१॥ कपट-
वार्नि या दंभ प्रतिपर्णी दडे । मार्ग कैसा तुजासि येथें
सांपडे ॥ २ ॥

कांताः—तुझ्यावांचून मी अनाथ, निराश्रित, निराधार होणार. रघुनाथ, तूं आणि मी जन्मभर एके ठिकाणीं रहायला तुझी काय हरकत आहे? पाहिजे तर बहीणभाऊ म्हणून राहूं.

रघु०:—तुझें लग्न झाल्यावर मला तुझ्याजवळ कसें राहतां येईल?

कांताः—मी लग्नच करणार नाहीं मुळीं. तुला वाटेल तर तूं लग्न कर.

रघु०:—मीहि लग्न करणार नाहीं.

कांताः—मग एकत्र रहायला अडचण कुठें राहिली?

रघु०:—जग वाटेल तशीं नांवें ठेवील.

कांताः—तुला मी आणि मला तूं जगाच्या ठिकाणीं असल्यावर निराळ्या जगाची पर्वा कशाला बाळगायला पाहिजे? तशांतून जगाचें तोंड बंद करण्यालाहि एक उपाय आहेच.

रघु०:—तो कोणता?

कांताः—आपण एकमेकांशीं लग्नच करून टाकूं म्हणजे झालें.

रघु०:—(आनंदानें) काय? आपल्या लग्नाला तुझी अजून अनुकूलता आहे?

कांताः—लग्नालाचशी काय, पण रघुनाथ, तूं म्हणशील तर तुझी बटीकहि होऊन रहायला मी तयार आहें.

रघु०:—कांते, तुझा ज्या त्या कामांत असाच उहालपणा! पण तूं जरी माझ्यासाठीं वाटेल तो हीनपणा घ्यायला कबूल झालीस तरी मीं तुला तो घेऊं दिला पाहिजे ना? आपणांला आतां लग्न करणें हाच मार्ग काय तो मोकळा आहे. पण तो शक्य आहे का हा विचार प्रथम आपणांला केला पाहिजे.

कांताः—काय झालें शक्य नसायला? नानासाहेब तर त्याला प्रतिकूल राहणारच नाहींत.

रघु०:—माझ्या आईनें बाबांची अनुकूलता दिसतांच आमच्या गांवाला जाऊन राहण्याचें मजपासून वचन घेतलें आहे.

कांताः—मग त्यांत काय झालें? मीहि तुझ्याबरोबर येईन तिकडे,

रघु०:—माझ्या आईबापांची तुला खंत नाहीं का वाटणार?

कांताः—भलतेंच कांहीं तरी! मी त्यांची सेवा किती मन लावून करीन हें तुला दिसेलच. तुझ्या वडिलांची चिलीम तर माझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि मी भरूं देणार नाहीं.

रघु०:—कांते, म्हणतेस तरी काय?

कांताः—रघुनाथ, गंगाप्रवाह ज्या हिमालयांतून निघाला तो कितीहि ओबडधोबड असला तरी त्या प्रवाहाकरितां तो आपणांस पवित्रच वाटतो कीं नाहीं?

रघु०:—अहाहा! कांते, आतां तुझी कोणतीहि कसोटी पहायची राहिली नाहीं. कांते, आमचें घर ज्या स्थानीं उभें आहे तें स्थान किती रमणीय आहे म्हणून सांगूं! त्या स्थानीं तुझीच काय ती उणीव होती; तीहि आतां नाहींशी झाली आहे. तें सुंदर देवालय देवीच्या मूर्तीचीच काय ती वाट पाहत आहे. ( विचार करून ) पण कांते, आपल्या लग्नाला आणखीहि एक मोठी अडचण आहे.

कांताः—ती कोणती?

रघु०:—तुझ्या आईची संमति मिळेल असें मला वाटत नाहीं. तिचा जन्म गेला आहे जुन्या समजुतींत. तिला हें लग्न म्हणजे भयंकर भ्रष्टाकार वाटेल.

कांताः—आईच्या हृदयाचीं सारीं सूत्रें माझ्या हातांत आहेत हें तुला इतक्या दिवसांच्या अनुभवानें सुद्धां कळून येऊं नये ना? शिवाय तिचें मन अगदीं लोण्यासारखें मऊ आहे. वाटेल तसें वळवावें.

रघु०:—तुझी आई इतर बाबतींत कोमल मनाची असेल; पण धर्माच्या बाबतींत ती विलक्षण निग्रही आहे. तिचें आणि बाबांचें लहानपणापासून आपल्यासारखेंच प्रेम आहे: तरी सुद्धां त्यांचा पुनर्विवाह झाला नाहीं. आणि याला कारण केवळ तुझ्या आईचा धर्मभोळेपणा.

कांताः—कालच्या संभाषणावरून तूं म्हणतोस तें खरें असावेंसें वाटतें.

रघु०:—जो निग्रह त्यांच्या लग्नाला आड आला तोच आपल्या लग्नालाहि येईल.

कांता:—आई जर आपल्या लग्नाला विरुद्ध असली तर मी तिच्या संमतीशिवायच लग्न करीन. पण रघुनाथ, शूद्रब्राह्मणांच्या लग्नाला विधि तरी कोणता करायचा?

रघु०:—यासंबंधानें सरकारनें एक कायदा केला आहे. त्याअन्वयें वधूवरांनीं नांवें नोंदलीं म्हणजे त्यांचा विवाह कायदेशीर होतो. पण नांवें नोंदतांना आपण हिंदु किंवा इतर कोणत्याहि धर्माचे नाहीं अशी प्रतिज्ञा करावी लागते.

कांता:—येवढेंच ना? मग त्यांत काय येवढेंसें अवघड आहे?

रघु०:—कांते, तुला यांत कांहींच अवघड वाटत नाहीं का? ज्या हिंदु धर्माच्या छायेखालीं आपण वाढलों त्याचा केवळ आपल्या सुखासाठीं त्याग करायला सिद्ध होणें हा क्षुद्रपणा नाहीं का?

कांता:—ज्या धर्मानें आपल्या सुखाला येवढें थोरलें विघ्न उपस्थित केलें आहे त्याला दूर करण्यांत क्षुद्रपणा कसला आला आहे?

रघु०:—आपण उभयतां ब्राह्मण असून हिंदु धर्माचा अव्हेर केला असता तर तें आपल्या खऱ्या मताचें आविष्करण म्हणून शोभून गेलें असतें. पण हिंदु धर्मांतील शेलक्या हक्कांचा पूर्ण उपभोग घेतल्यानंतर दुर्दैवानें त्यांतील अपमानकारक भागांचें जोखड मानेवर बसलें असतां तें झुगारण्यापुरती हिंदु धर्माला सोडचिठ्ठी देणें निःसंशय लघुत्वाचें लक्षण आहे. तें कांहीं नाहीं. आपण ब्राह्मविवाहविधीनेंच आपलें लग्न लाविलें पाहिजे.

कांता:—माझा धर्म आणि ईश्वर तूंच आहेस. तूं ठरवशील तें मला कबूल आहे. मग आतां आई आणि नानासाहेब यांपैकीं पहिल्यानें कोणाची गांठ घेणार?

रघु०:—पहिल्यानें कठिण कामच हातीं घेऊं या. तुझ्या आईचें हृदय एकदां काबीज केलें कीं बाबांचें मन वळविणें कठिण नाहीं.

कांता:—चल तर, बरोबरच जाऊं.

रघु० व कांता:—

[ चाल—चल जारे० ]

चल वेगीं। पद टाकीं। गृहिं जाऊं जननीतें पाहूं। धीर न मुळिं धरवे ॥ तिज वळवूं सुखिं न्हाऊं ॥ ध्रु० ॥
बाहूं भाकूं साह्य प्रभूतें। मागुनि मागूं त्या पितरांतें।
आशीर्वच शुभचिंतनही तें। नंतर गाऊं मंगल गीतें ॥
बाहूं भाकूं० ॥१॥

( हातांत हात घालून जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

### [ मालती व कौसल्या. ]

माल०:—इतके सारे प्रकार झाले म्हणतां? कांतेला रघुनाथाच्या भेटीला धाडतांनाच मला पुढचें स्वप्न पडलें असतें तर किती चांगलें झालें असतें! पण रघुनाथाचा प्रामाणिकपणा आणि कांतेचा राग यांवर गेलें मी.

कौस०:—माज्या रणूला काईची बोल लावाया येत न्हाई. ह्ये संमद आपल्या पोरीच कौटाळ!

माल०:—अपराधाचें माप कोणाच्या पदरांत घालायचें याचा निवाडा करण्याची ही वेळ नाहीं. दोष कोणाचाहि असो, मला जसें हें लग्न व्हायला नको आहे तसेंच तुह्मांलाहि नको आहे.

कौस०:—व्हय व्हय! ह्ये मातुर आपुन बरावर ह्येरल.

माल०:—पोरीचें मन वळवून पाहूं म्हटलें तर ती मुळींच ऐकायची नाहीं. तिला कोणत्याहि विषयाचें महत्त्व कळत नाहीं. शूद्राशीं विवाह म्हणजे नरकप्राप्तीचें खात्रीचें साधन आहे अशी तिची समजूत घालूं लागलें तर ती खदखदां हंसूं मात्र लागेल. या अलीकडच्या पोरांचा धर्मांवर मुळीं कसा तो विश्वास नसतो. छे! याला एकच युक्ति आहे. माझ्या बाळेची दुर्गति जर मला चुकवायची असेल तर मला स्वतःला

दुर्गति पत्करली पाहिजे. कौसल्याबाई, मी जरा बाहेर जाऊन येतें. माझी युक्ति साधली तर बरेंच झालें. न साधली तर तुम्ही वाटेल तो उग्र उपाय योजून या लग्नाला व्यत्यय करा. माझ्या अंगची उणीव तुम्हीं भरून काढली पाहिजे. तीं दोघेंजणें आलीं तर त्यांना सांगा मी देवदर्शनाला गेलें आहें, परत येईपर्यंत वाट पहा ह्मणून. (स्वतःशीं) माझ्या ह्मणण्याला नानासाहेबांकडून रुकार पडेल यांत मला कांहीं संशय वाटत नाहीं. पण मला आजपर्यंत स्वर्गसुखाहून अधिक वाटणारें सुख याप्रमाणें माझ्या आटोक्यांत आलें असतां मला त्यापासून आनंद कां बरें वाटू नये ? कसा वाटावा ? या औट घटकेच्या सुखाच्या मागोमाग अनंत काळपर्यंत आह्मां उभयतांना ज्या नरकयातना भोगाव्या लागणार त्यांचा डोंगर समोर उभा राहून मला भेवडावीत आहे. पण त्याखालीं माझ्या बाळेचें शिर सांपडण्यापेक्षां माझें मस्तक चेंगरून जाणें कितीतरी चांगलें !

[ चाल—पवन चलति० ]

**परम अधम तरि मज ह्याचि मार्ग । गति शुभकर**
**अन्य न दिसते । अवधि न बहु मतिहि विकल अति**
**चळते ॥ ध्रु० ॥ निरयवास मज अदोष । जरि कन्या-**
**रक्षण होतें ॥१॥**

कांते, सुलक्षणी मुली आपल्या मातापितरांस स्वर्गाची जोड करून देतात. पण तूं मला नरकाचीच प्राप्ति करून देणार ना? तुला तरी दोष कां लावूं ! तुझ्या ललाटीं जें लिहिलें असेल तशीच तुला बुद्धि होणार !

(जाते. पडदा पडतो.)

---

# प्रवेश ६ वा.

**उद्धवराव**:—(स्वतःशीं) मुलांच्या लग्नाला आजपर्यंत मी प्रतिकूल असून मालती अनुकूल होती. पण आतां अगदीं उलट प्रकार झाला आहे. आतां मी अनुकूल तर ती प्रतिकूल. तिच्या जोडीला तिकडे कांता आणि इकडे रघुनाथ विथरून गेला आहे. माझी सर्वस्वीं अनुकूलता असतांहि तें लग्न

याप्रमाणें पूर्वीपेक्षांहि कठिण होऊन बसलें आहे. काय करावें ? ( मालती प्रवेश करिते. ) कोण ? मालतीबाई ? आणि अशा करकरीत तिनीसांजाशा!

माल०:—कालच्या प्रसंगीं रघुनाथ आपला मुलगा नाहीं हें कळल्याबरोबर माझा आपल्याबद्दल आजपर्यंत जो गैरसमज होता तो नाहींसा झाला. मला असें वाटत होतें कीं, माझें लग्न झाल्यावर लवकरच आपणहि गृहस्थाश्रमी झालांत. आणि खरेंच, मजविषयींची आशा समूळ नाहींशी झाल्यावर आणि आपले मातापितरहि आपणांला सोडून गेल्यावर आपल्या दुःखांत कोणी तरी वांटेकरीण असणें जरूरच होतें. पण आपण माझ्या प्रीत्यर्थ जो स्वार्थत्याग केला त्याची मला कालपर्यंत मुळींच कल्पना नव्हती. आपण अविवाहित असल्याबद्दल आपल्या तोंडांतून एखादे वेळीं बोलण्याच्या भरांत उद्गार निघत असत. पण त्या शब्दाचा खरा अर्थ न घेतां विधुर हाच अर्थ मी घेत असें. यामुळें विधवा आणि विधुर यांची तुलना करितांना मीआपणांबद्दल नेहमीं तिरस्कार दाखवीत असें. विधवा या दृष्टीनें माझें स्वतःचें चरित्र तरी निर्मळ असावयास पाहिजे होतें ! पण नाहीं. धर्मविधीनें संबंध जडलेल्या पतीची मूर्ति मनांत आणायला जावें तर लबाड मनानें स्वतःच वरलेल्या पतीची मूर्ति पुढें उभी करावी ! यापेक्षां आपलें चरित्र कितीं तरी एकनिष्ठ ! अशा चारित्राची जी अवहेलना मजकडून झाली तिजबद्दल पश्चात्तापपूर्वक आपली क्षमा मागण्याच्या आणि साधल्यास प्रायश्चित्त घेण्याच्या संधीची मी वाट पहात होतें. पण या घटकेपर्यंत ती मिळालीच नाहीं.

उद्धव०:—मालतीबाई, हे वृथा आयास कशाला घेतले ? तुम्हीं माझी कितीहि अवहेलना केली तरी मीं ती मनांत वागविल्याचें तुह्मांला स्मरतें तरी का ?

माल०:—त्यामुळें तर माझें मन मला फारच खातें आहे. आपण त्या अवहेलनेला पात्र असतां किंवा अपात्र असल्यामुळें आपणांस तिचा राग आला असता तर मला तितकें वाटलें नसतें. अवहेलना करणाऱ्या माझें शील निष्कलंक असतें तरीहि मला विशेष पश्चात्ताप वाटला नसता. पण आपणांवर टीका करण्याची माझी स्वतःची अपात्रता, आपली अवहेलनेला अपात्रता व ती सहन करतांना आपण धारण केलेली अढळ शांति यांच्या भाराखालीं माझें मन चिरडून गेलें आहे. नुसता पश्चात्ताप व

क्षमायाचना प्रगट करून त्या मनाला हलकें झाल्यासारखें वाटेल असें माझें मन मला सांगत नाहीं. या पापाच्या क्षालनार्थ मीं कोणतें प्रायश्चित्त घ्यावें तें मला सांगा. त्या प्रायश्चित्तानें माझें मन हलकें व्हावें आणि आपलें दुःखहि हलकें व्हावें.

[ चाल--पालय मां० ]

**मार्ग वदा । विचरायासि सुगम सरल परम ।। ध्रु० ।।**
**नेइ सदा । शुभ जो श्रेयाप्रति अपयश हरुनि यथाक्रम ।।१।।**

**उद्धव०**:—तुह्मांला आणि मला ज्या प्रायश्चित्तानें सुख होईल असें प्रायश्चित्त एकच आहे. पण तें आजपर्यंत तरी तुमच्या मतानें धर्मनिषिद्ध होतें आणि आतां माझ्या मतानें कर्तव्यविरुद्ध ठरण्याचा संभव आहे.

**माल०**:—असें कोणतें प्रायश्चित्त?

**उद्धव०**:—मला आणि तुह्मांला ज्या गोष्टीनें ऐहिक सुख प्राप्त होईल ती मीं उघड करून कां सांगितली पाहिजे? तुह्मीं ती ओळखिली हे तुमच्या लाजण्यावरूनच स्पष्ट होत आहे. मी तुह्मांस ज्या नांवानें हांक मारितों त्यांतील शेवटचीं दोन अक्षरें काढून टाकण्याची मला परवानगी देण्याला तुमची तयारी असेल असें मला वाटत नाहीं. कारण तें तुह्मांला धर्मबाह्य वाटतें.

**माल०**:—धर्मबाह्य असलें तरी माझ्या हल्लींच्या चरित्राहून अधिक तरी नाहीं. गत पतीशीं देहानें शुद्ध पण मनानें अपवित्र वर्तन करण्यापेक्षां दुसरा पति करून त्याच्याशीं देहानें आणि मनानें शुद्ध वर्तन ठेवणें श्रेयस्कर असें मला वाटूं लागलें आहे. आपलें कर्तव्य मात्र या कृत्याचा निषेध करीत असलें तर माझें कांहींच म्हणणें नाहीं.

**उद्धव०**:—आजपर्यंत मीं रघुनाथ आणि कांता यांच्या लग्नाला जो विरोध केला त्याचें कारणच आतां नाहींसें झालें आहे. तें लग्न जर शक्य असेल तर तें पार पाडणें माझें आदिकर्तव्य आहे. तें साधण्यासारखें नसेल तरच काय तो स्वतःच्या सुखाचा विचार करायचा.

**माल०**:—पण तें लग्न आतां उघड उघड अशक्य होऊन बसलें आहे. माझी तर त्याला मुळींच मान्यता नाहीं. पण त्या मान्यतेचा विचार

करण्याचेंहि आतां कारण उरलें नाहीं. त्यांनीं एकमेकांशीं लग्न न करण्याची शपथच वाहिली आहे मुळीं. (एकीकडे) देवा, या असत्याबद्दल क्षमा कर.

उद्धव०:—मग निरुपायच झाला म्हणायचा. बाकी त्यांच्या सुखाच्या होळीवर आपल्या सुखाची पोळी भाजून घेण्याचें स्वरूप आपल्या विवाहाला येत असल्यामुळें त्यासंबंधानें मनाला विशेष उत्साहहि वाटत नाहीं.

माल०:—या वयांत अशा गोष्टीसंबंधानें साहजिकच उत्साह वाटायचा नाहीं.

उद्धव०:—मालति, असें म्हणूं नकोस. प्रौढ वयांतील प्रेमांत कामुकतेचा अंश कमी असेल; पण त्यामुळें त्याच्या उत्कटतेची मुळींच हानि होत नाहीं. खऱ्या रसिकाला बालेच्या प्रेमापेक्षां प्रौढेच्या प्रेमाचीच किंमत अधिक वाटणार! अर्धबोबड्या मुलीच्या चुंबनापेक्षां मार्मिक भाषणें करणाऱ्या प्रौढेच्या ओष्ठांच्या चुंबनांतच त्याला अधिक गोडी दिसून यायची! अननुभवी बालेच्या आलिंगनापेक्षां जिचें हृदय अनुभूत प्रेमरसानें उचंबळून येत आहे अशा प्रौढेच्या आलिंगनांतच त्याला अधिक रस आढळायचा! जिचें मस्तक उज्ज्वल विचारमौक्तिकांचा व सुंदर कल्पनारत्नांचा करंडाच आहे अशा प्रौढेचें मस्तक हृदयाशीं धरण्यांत त्याला जें सुख वाटेल तें तरुणीचें बालिश मस्तक धरण्यांत खास वाटणार नाहीं. मालति, तुझें दुःखत्रस्त झालेलें मस्तक सांत्वनपर शब्दांनीं शांत करण्याचे मीं आजवर अनेक प्रयत्न केले. पण त्या मस्तकाला या वक्षःस्थलावर ठेवून विश्रांति देण्याचें भाग्य मला आजच प्राप्त झालें आहे. तुझ्या या काळ्याभोर, तुळतुळीत व विपुल केशकलापावरून हात फिरवितांना मला अननुभूत आनंद होत आहे. ते विखुरलेले असतां सांवरण्याची मनीषा मला आजवर कितीदां तरी मनांतल्या मनांत दाबून ठेवावी लागली. पण आज या अतृप्त हातांचें पारणें सव्याज फेडून टाकतों. मालति, हें काय? माझ्या उत्साहाचा सत्कार तूं निर्जीव भुजांनींच करणार का? तुझें तोंड अश्रूंनीं डबडबण्याचें कारण? हे आनंदाश्रु समजायचे कीं दुःखाश्रु? माझ्या अप्रासंगिक शृंगारिक उद्गारांनीं तुझ्या चित्ताला धक्का बसलेला दिसतो. कृतज्ञतेच्या

भरांत घडलेल्या कृत्याबद्दल तुला पश्चात्ताप वाटत असेल तर तुला मी तुझ्या वचनांतून मुक्त करायला तयार आहें.

मालः—नाहीं नाहीं! आपण माझा स्वीकार केलांत यानें मी धन्य झालें

उद्धवः—तिनीसांजांचे वेळीं घरीं चालत आलेली लक्ष्मी कोण दवडील?

मालः—मला येऊन किती तरी वेळ झाला! देवदर्शन घेऊन येतें असें घरीं सांगून आलें. पण देवदर्शनाला इतका वेळ कधींच लागला नव्हता.

उद्धवः—बाकी पतिदेवाच्या दर्शनाला हा वेळ सुद्धां अपुराच झाला! (मालती जाते. स्वतःशीं) आजपर्यंत ज्या सुखशिखराकडे दुरून आशाळभूत नजरेनें पाहत होतों त्याजवर मी इतक्या सहज रीतीनें आरूढ झालों असतां मला उद्विग्न कां वाटावें बरें? तरुणास सुखोपभोगाला जितका दीर्घ काल मिळतो तितका मला मिळणार नाहीं हा विचार या उद्विग्नतेच्या मुळाशीं आहे का? परंतु कालाची दीर्घता त्यांतील वर्षसंख्येवर अवलंबून नसून त्याच्या उपयोगावर अवलंबून असते. तरुण आपल्या वैवाहिक आयुष्याची उधळपट्टी करितो; तशी मी न करितां प्रत्येक क्षणाचा चोख हिशेब देतां यावा अशा रीतीनेंच तें खर्च करीन. आह्मांवर विश्वासून राहिलेल्या अर्भकांचा डोळा चुकवून आह्मी आपलें लग्न उरकून घेत आहोंत व त्यांचें लग्न अशक्य करीत आहोंत हा विचारहि या उद्वेगाच्या उगमाशीं असावा. पण जर तीं वैरभाव सोडून पतिपत्नी होण्याच्या विचारानें माझा आशीर्वाद मागण्याला अजूनहि येतील तरी मी नुकतेंच माझ्या हातीं आलेल्या अनपेक्षित स्वर्गसुखावर पाणी सोडून जगांत आजपर्यंत कधींहि न झालेला स्वार्थत्याग करून दाखवीन. (जातो.)



उद्ध०:—तुझ्या ह्या काळयाभोर, तुळतुळीत व विपुल केशकलापावरून हात फिरवितांना मला अननुभूत आनंद होत आहे

[ अंक ३ रा. प्रवेश ६ वा. पान ९५

# प्रवेश ७ वा.

[ रघुनाथ, कांता, मालती व कौसल्या ]

**माल०:**—हें काय ? कांते, रघुनाथ, तुह्मी एकमेकांवर रुसलां होतां ना ? आणि इतक्यांत पुन्हां एकहि झालांत ?

**कांता:**—आई, रघुनाथानें माझी चूक माझ्या पदरांत उत्तम प्रकारें घातली. चूक कळून आल्यावर ती कबूल न करणें म्हणजे पुन्हां चूक करण्यासारखें झालें असतें. ह्मणून मीं ती प्रांजळ बुद्धीनें कबूल केली, आणि यानेंहि मला उदारपणानें क्षमा केली.

**माल०:**—तूं यालाच आपल्यासमोर गुडघे टेंकून क्षमा मागायला लावण्याची प्रतिज्ञा करून गेली होतीस ना ?

**कांता:**—माझ्या प्रतिज्ञेंतील बहुतेक शब्द खरेच ठरले ! रघुनाथ आणि मी यांची अदलाबदल झाली इतकेंच काय तें ! पण त्यांत त्यालाहि वाटण्यासारखें नाहीं आणि मलाहि नाहीं.

**माल०:**—काय तरी बाई मुलांचा चंचलपणा ! बरें तर बरें, जात आड आली नसती तर लग्न ठरवूनहि मोकळीं व्हायचीं.

**कांता:**—आई, आमच्या लग्नाला जातहि आड येत नाहीं.

**माल०:**—म्हणजे ?

**कांता:**—आम्हीं पूर्वींचा लग्नाचा बेतच कायम केला आहे.

**माल०:**—काल याची जात कळल्याबरोबर नारसिंह अवतार धरणारी कांताच का हें बोलते आहे ?

**कांता:**—काल माझी चूक झाली होती. ती मीं आज सुधारली. मनुष्य चुका सुधारण्याऐवजीं उराशींच धरून बसूं लागला तर त्याच्यामध्यें सुधारणा तरी कशी व्हावी, आई ?

**माल०:**—उजेड पडला सुधारणेचा ! कांते, या गोष्टींत तूं माझी थोडी तरी संमति घ्यायला पाहिजे होतीस. मीं तुला जन्म दिला, तेव्हां माझा इतका तरी हक्क तुझ्यावर आहेच.

**कांता**:—आई, तूं मला जन्म दिलास, लहानपणीं माझ्या खस्ता खाल्ल्यास, तें सारें ठीकच झालें. पण आतां मी सज्ञान झाल्यावर सुद्धां तुला पदोंपदीं पहिल्याप्रमाणेंच त्रास देऊं लागलें तर तें शोभेल तरी का? तशांतून रघुनाथाशीं माझें लग्न होण्याला तुझी संमति होतीच. वरचेवर संमति मागून तुझी पाठ थोडीच पुरवायची आहे!

**माल०**:—रघुनाथाची जात कळण्यापूर्वीं मीं दिलेल्या संमतीवर का तुह्मी लग्न लावणार? छे:! ती गोष्ट आतां अशक्य झाली आहे. माझें मतच नाहीं मुळीं या लग्नाला.

**कांता**:—मग काय तुझ्या मतावांचूनच आम्हीं लग्न लावावें असें तुझें म्हणणें? आह्मी तुला मोठेपणा देऊन तुझा आशीर्वाद घेण्याकरितां येथें आलों. तुला तो मोठेपणा नको असेल तर राहिला. आह्मी तसेंच लग्न करूं.

**रघु०**:—कांते, तूं अमर्यादा करते आहेस. घे पाहूं परत आपले शब्द.

**कांता**:—आई, मी आपले शब्द परत घेतें. पण तूं आपला नकार नाहीं का परत घेणार? हें काय गडे असें? मी तुझीच ना?

**माल०**:—तूं माझी आहेस म्हणूनच तूं नरकाची जोड करून घेणें मला आवडणार नाहीं.

**कांता**:—मग काय तूं माझें लग्न जुलमानें दुसऱ्याशीं लावून मला जिवंतपणींच नरकयातना भोगायला लावणार? वहावारे प्रेम! वहावारे माया!

**माल०**:—या नरकयातना क्षणभंगुर आहेत. शाश्वतच्या नरकयातनां-पेक्षां त्या अनंतपट बऱ्या.

**कांता**:—या नरकयातनांना तूं क्षणभंगुर कसें म्हणतेस? रघुनाथाच्या विरहाचा प्रत्येक क्षण मला युगासारखा भासेल. माझ्या आयुष्यांतील क्षणां-इतकीं युगें मला नरकवासांत तळमळत ठेवायला तुझी तयारी आहे तर?

**माल०**:—जें जें कांहीं तुझ्या कल्याणाचें असेल तें तें करायला माझी तयारीच आहे.

**कांता**:—आणि इतकीं युगें तूं मला या जगांत खऱ्याखुऱ्या नरक-यातना देणार त्या मरणानंतरच्या काल्पनिक नरकयातना चुकवण्याच्या

आशेनेंच ना? आई, पुराणांतल्या भाकडकथांवर भरंवसा ठेवून आपल्या मुलीचा उघड उघड सत्यानास करूं नकोस. ऐक माझें.

माल०:—कांते, जी गोष्ट शक्य नाहीं तिच्यासंबंधानें विनाकारण काथ्याकूट करण्यांत काय अर्थ?

कांता:—शक्य नाहीं? रघुनाथ, चल आपण नानासाहेबांची संमति मिळवूं.

माल०:—शक्य नाहीं यांत त्यांच्या संमतीची अशक्यताहि आलीच.

कांता:—ह्मणजे? आई, असें केलेंस तरी काय तूं?

माल०:—कांते, तूं आणि रघुनाथ आतां बहीणभावंडें होणार.

कौस०:—नानासाबांचा आन् मालतीबाईचा म्होतुर लागनार.

कांता:—पुनर्विवाह? आई, हें खरें आहे का? (मालती स्तब्ध रहाते.) आणि यांत नाहीं वाटतें भ्रष्टाकार? यांत नाहीं वाटतें नरकाचें भय?

माल०:—कांते, तूं रौरव नरकांत पडण्यापेक्षां मी पडलेलें किती तरी चांगलें!

कांता:—मी तुझ्या बरोबरीची मुलगी जिवंत असतां तूं पुनर्विवाह केलास तर तुझ्या लौकिकांत चांगलीच भर पडेल!

माल०:—कांते, तुझ्या पारलौकिक कल्याणाकरितां मी इहलोकीं छी थू पत्करायला तयार आहें.

कांता:—आई, तूं आपल्या सुखाकरितां माझ्या सुखांत माती काल-विलीस! मीं तुझ्या मांडीवर विश्वासानें मान ठेविली, आणि तूं ती निर्दय-पणानें कापलीस!

माल०:—कांते, तूं मला प्राणांपेक्षांहि आवडती आहेस हें तुला माहित आहे. असें असूनहि मी धर्मासाठीं तुझ्या प्राणांचा बळी द्यायला तयार होईन.

कांता:—माझा बळी देण्यापेक्षां स्वतःचाच कां देत नाहींस?

माल०:—माझ्यामागें तुझ्याकडून धर्मबाह्य वर्तन होणार नाहीं अशी खात्री झाल्यावर तसेंहि करीन.

कांता:—तें दिसतेंच आहे!

रघु०:—कांते, रागामुळें अशी बेताल होऊं नकोस. काकू, तुमच्या

कृत्यामुळें माझें जन्माचें सुख धुळीला मिळालें खरें. पण तुह्मीं हा जो अपूर्व आत्मयज्ञ केलांत त्यानें दुःखांत सुद्धां मला सानंदाश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. कांते, आपल्या आईची योग्यता ओळख. तुला स्वर्गाचें दार खुलें व्हावें ह्मणून ती स्वतः नरकवास पत्करायला तयार झाली. काकू, धन्य आहे तुमची! तुह्मी साक्षात् स्वर्गांच्या देवता आहांत!

कांताः—रघुनाथ, आईनें नानासाहेबांचा आपल्या प्रेमाच्या बिघाडाबद्दल गैरसमज करूनच या पुनर्विवाहाला संमति मिळविली असली पाहिजे. त्यांना जर खरा प्रकार कळला तर ते अजून स्वतःचें सुख बाजूला ठेवून आपल्या लग्नाला संमति देतील.

रघु०ः—कांते, तुझ्या आईनें आपणांला जो स्वार्थत्यागाचा धडा घालून दिला तो फुकटच गेला का? बाबांनीं आपल्या सुखाकरितां स्वतःचें सुख बाजूला ठेवायचें, तसें तुला आणि मला त्यांच्या सुखाकरितां स्वतःचें सुख गुंडाळून ठेवायला नको का? काकूंची प्रतिकूलता नसती तर हा पुनर्विवाह पूर्वींच व्हायचा. बाबांनीं इतके दिवस कडकडीत ब्रह्मचर्यव्रतानें काढिले. त्यांच्या अतृप्त इच्छा पूर्ण व्हायच्या ऐन संधीस आपण आपलें रडगाणें गाऊन त्यांच्या सुखावर विरजण घालायचें कीं काय? तुझ्या व माझ्या लग्नाचा विचार नुक्ताच ठरला. आपलें प्रेम अजून जुनें झालें नाहीं. त्याचा अंकुर आपणांस वेळींच खुडून टाकितां येईल. यापुढें आपणांला बहीणभावंडांप्रमाणेंच वागलें पाहिजे.

कांताः—तूं जर नानासाहेबांचा मुलगा नाहींसच तर त्यांचा पुनर्विवाह होऊनहि आपलें लग्न व्हायला कांहीं हरकत नाहीं; आणि आपण बहीणभावंडांप्रमाणेंच राहिलें पाहिजे असेंहि नाहीं.

रघु०ः—तुला माझें नानासाहेबांवरील प्रेम माहित नाहीं, ह्मणून तूं असें म्हणतेस. माझ्या जन्मदात्यांबद्दल मला कितीहि आदर वाटला तरी खरा जिव्हाळा बाबांबद्दलच वाटतो. त्यांनाच बाबा म्हणण्यांत मला अभिमान वाटतो. कांते, दुसराहि एक विचार आपणांला केला पाहिजे. अजून माझ्या जन्माची हकीकत जाहीर झाली नाहीं. ती हकीकत जर यापुढेंहि गुप्तच राहिली तर लोकांच्या दृष्टीनें तुझें माझें नातें भावंडांचेंच राहील. बरें, ती हकीकत बाबांच्या पुनर्विवाहाबरोबरच जर

लोकांस कळली तर बाबांनीं केवळ सुखोपभोगाकरितां माझा अव्हेर केला असा चोहोंकडे बोभाटा होऊन त्यांत त्यांची किती तरी नाचक्की होईल! त्यांनीं माझ्या सुखाची आजपर्यंत जी काळजी वाहिली तिची फेड त्यांच्या सुखाच्या आड येऊन व त्यांच्या अपकीर्तीला कारण होऊन करायची कीं काय? कांते, तें कांहीं नाहीं. आपणांला यापुढें भावंडां-प्रमाणेंच वागलें पाहिजे.

माल०:—रघुनाथ, तूं आज कांतेचें मन कपटानेंच पुन्हां आपणाकडे आकर्षून घेतलेंस असा माझा गैरसमज झाला होता. पण बाळा, अजून तूं पूर्वीचाच सरळ, निष्कपट, प्रामाणिक रघुनाथ आहेस अशी माझी खात्री झाली.

कांताः—रघुनाथ, भावंडांप्रमाणेंच का होईना, आपणांला यापुढें एकत्र तरी रहातां येईल ना?

रघु०:—नाहीं, कांते, नाहीं. आपल्या सांप्रतच्या मनःस्थितींत आपण एका घरांत रहाणें मुळींच शक्य नाहीं. आपणांला आपलीं मनें चिरवियो-गाला तयार केलीं पाहिजेत. आई, बाबांच्या सुखाबद्दल निश्चिती होतांच तुमच्याबरोबर देशीं येण्याचें मीं कबूल केलें होतें. ती अट पुरी झाली आहे. कांतेचा आणि बाबांचा निरोप घेतला कीं तुमच्याबरोबर निघण्यास मी तयारच आहें. तूं प्रवासाची तयारी कर.

कौस०:—व्हय व्हय! (एकीकडे) ही अवदसा अजूनबी रगूसंग लगान कराया मागतियाच. रगूच्या संग तकड गावाकडबी येयाची! हतन जान्याच्या अदुगर त्येची बंदूबस्ती कराया व्होवी. मालतीबयान पोरीच परेम वाटलत्ये करूनशेनी तोडून टाकायाची परमानकी आपनास दिल्याली हाईच. (जाते.)

माल०:—रघुनाथ, मीहि बाहेर जातें. तूं कांतेचा अखेरचा निरोप घे. (जाते.)

कांताः—रघुनाथ, खरेंच का ही आपली शेवटची भेट? आणि तूं आतां खरोखर अर्ध्या एक घटकेचाच सोबती आहेस का? मघांपासून मला स्वप्नांत असल्याप्रमाणेंच वाटत आहे. उद्यां निजून उठलें कीं रघुनाथाचा हंसरा चेहरा नेहमींप्रमाणें पहायला मिळणार असेंच मला वाटत आहे.

रोजच्याप्रमाणेंच संध्याकाळचा खेळ उद्यांहि चुकणार नाहीं अशीच माझी अजून समजूत आहे. इतके दिवस येथें राहिलेला रघुनाथ आजच कां निघून जावा ?

रघु०:—कांते, मनुष्य मरण पावतो तेव्हां तो नाहीं का असाच एकदम आपल्या आप्तांमधून निघून जात ?

कांताः—गड्या, असें अमंगळ बोलूं नकोस. खरेंच का तुझी माझी पुन्हां भेट होणार नाहीं ?

रघु०:—कशी होणार ? माझें गांव येथून शेंकडों कोस दूर आहे. विशेष प्रसंगानें एकत्र येण्याचीहि आपणांला आशा नाहीं. तुझी जात निराळी, माझी निराळी. एका गांवांतील ब्राह्मणशूद्र जर फारसे भेटत नाहींत तर दूर अंतरावरचे कसे भेटणार ! त्यांतून तूं नेहमीं येथें रहाणार आहेस थोडीच ! लग्न झालें म्हणजे सासरीं जाशील.

कांताः—मी नाहीं लग्न करणार कधींच.

रघु०:—असें वेड्यासारखें बोलूं नये. हिंदु धर्मानें ब्राह्मणशूद्रांचा विवाह जसा निषिद्ध केला आहे, तसें स्त्रियांचें आजन्म कौमार्यहि निषिद्धच केलें आहे. आणि त्यांत वावगें तरी काय आहे ? एकदां तूं पतीबरोबर संसार करूं लागलीस कीं त्यांतच तुला आनंद वाटूं लागेल. कदाचित् मला विसरूनहि जाशील.

कांताः—रघुनाथ, तूंहि लग्न करून मला विसरशील का ?

रघु०:—पुरुषांची गोष्ट निराळी आहे. कांते, मी अखेरपर्यंत असाच रहाणार. मला तुझें कधींहि विस्मरण पडणार नाहीं.

कांताः—आणि मला तुझें पडेल वाटतें ? रघुनाथ, मी वरून जरी कितीहि चंचल दिसलें तरी आंतून माझ्यासारखी एकनिष्ठ मुलगी सांपडणार नाहीं. मी तुझ्याशीं आजपर्यंत इतकी भांडलें, पण अखेर मी तुझ्याशीं समेटच करीत होतें ना ?

रघु०:—गडे, तुझ्यासारखी रसिक भांडणारी मिळायला तरी भाग्य पाहिजे.

कांताः—मी काल तुला बोलूं नयेत ते शब्द बोललें. ती गोष्ट

जन्मभर माझ्या मनाला खात राहील. रघुनाथ, मला त्यांची क्षमा करशील ना?

रघु०:—कांते, तूं त्या चुकीची मागाहून आपल्या प्रेमळपणानें इतकी भरपाई केली आहेस कीं मला क्षमा करण्याला कांहीं राहिलेंच नाहीं.

कांताः—रघुनाथ, असा उदार स्नेही मला यापुढें मिळेल का? छेः, मी या जगाच्या अरण्यांत अशीच वणवण करीत हिंडत रहाणार!

रघु०:—असे दीनवाणे शब्द काढूं नकोस, गडे!

[ चाल—बाजे डमरु हरकर० ]

आणीं स्मित निज वदनिं। खेदा स्थल न दे मनिं।
अंत्य या क्षणिं। दे निरोपा मधुर भाषणिं ॥ ध्रु० ॥
सुप्रसन्न तुझीच मूर्ति। सांठविन हृत्संपुटीं ती। आमरण
आठविन चित्तीं। सौख्य मम तें तव करिं भगिनि ॥१॥

कांताः—रघुनाथ, मी हें सारें सुखासुखी का करतें आहे? तुझी मूर्ति अखेरची पाहण्याकरितां हे डोळे कसे आतुर झाले आहेत! पण हे अश्रु त्यांना विघ्न करितात, त्याला मी काय करूं? तुझ्याशीं शेवटचे चार गोड शब्द बोलायची मला किती तरी आतुरता आहे! पण गळा दाटून आल्यामुळें ते शब्द बाहेर उमटत नाहींत, याला माझा काय बरें उपाय?

रघु०:—तूं असें बोलूं लागलीस म्हणजे माझा पाय येथून कसा बरें निघावा? प्रत्येक पाऊल मला तुजपासून दूर ओढून नेणार आहे हाच विचार माझे पाय भारावून टाकायला पुरे आहे. त्यातून तुझी दीन मूर्ति दीन शब्द काढितांना दिसूं लागली कीं माझे पाय जमिनीला खिळूनच जातील.

कांताः—अहाहा! अशा रीतीनें तुझें जाणेंच राहिलें तर किती मौज होईल!

रघु०:—तसें कुठून व्हायला! ती आशाच नको. ज्या दैवानें माझ्या आईबापांना येथें खेंचून आणिलें, ज्यानें बाबांना आपल्या लग्नाला प्रतिकूल केलें, ज्यानें माझ्या जन्माच्या रहस्याचा स्फोट केला आणि तुझें मन बिथरवून टाकिलें, ज्यानें बाबांच्या पुनर्विवाहाची तयारी केली तेंच दैव आपला वियोग घडवून आणल्याशिवाय रहाणार नाहीं.

[ चाल–जिसके दिलपर गुजरी० ]

दैव होय विपदामूलाशीं। तें सर्वांशीं। नच निंदुं
अन्यांसी ॥ ध्रु० ॥ दैव होय देवा भारी। केवल न
मात्राविचारीं। छळितें तयासी ॥ १ ॥ काय कथा
मग मनुजाची। हुंकृतीनें त्यासि जाची। निमिषांत
नाशी ॥ २ ॥

कांते, मला आतां फार थांबतां येत नाहीं. माझी घटका भरत आली.

कांताः—हायरे दैवा! काय हा प्रसंग आणिलास!

[ चाल–कालि बदरिया० ]

हा! आला कठिण समय हा ॥ ध्रु० ॥ बालपणींचा
सखा जिवाचा। सोडुनि जाई मज विरहिं अहा ॥१॥
जाइ जरी तो परदेशीं तरि। वाटावि परकें मजसि मम
गृहा ॥ २ ॥

रघुनाथ, तूं जाण्यापूर्वी तुझें तोंड मला एकदां नीट निरखून पाहूं दे. ( रघुनाथ जवळ जातो. त्याचें तोंड दोन्ही हातांनीं धरून ) हें तोंड आतां मला पुन्हां पहायला सांपडणार नाहीं ना? रघुनाथ, हें अगदीं म्लान होऊन गेलें आहे. प्रवासाच्या श्रमानें आणि पुढील हालअपेष्टांनीं तें अगदींच सुकून जाईल, नाहीं? रघुनाथ, तुला तुझ्या देशाची कल्पना तरी आहे का?

रघु०:—मरणाराला परलोकाची असते तितकीच.

कांताः—तुला नवीन नवीन देश पहायला सांपडतील; आणि पराक्रम करून आपला उदय करून घेतां येईल. मी मात्र तुझ्या जाण्यानें निर्माल्यवत् झालेल्या या ठिकाणीं झुरून झुरून मरणार हें खास.

रघु०:—हं, कांते, असें वेडेविद्रें बोलूं नकोस. आणि हे अश्रुहि आंवरून धर. नशिबीं असेल तर आपण पुन्हांहि भेटूं.

कांताः—माझे अश्रु मला पुसायला सांगतोस, पण तुझे स्वतःचेच डोळे कसे डबडबून आले आहेत! हं हं, ते रुमालानें पुसूं नकोस. ते ओंठांनींच पुसून टाकिले पाहिजेत. पण मी अगदीं विसरलें. आपण भावंडें आहोंत, नाहीं का?

रघु०:—आणि भावंडांप्रमाणेंच निरोपहि घेतला पाहिजे. ( कांतेच्या पाठीवरून हात फिरवून ) कांताताई, येतों बरें.

[ चाल–दोष खल देत० ]

**सौख्य जगिंचें वर्षो या शीर्षीं सर्वेश तो । संपदा विपुल संततिही देउ तशी ॥ सर्वेश तो ॥ ध्रु० ॥ विरसा करी मत्स्मृति । रिघुनी हृदयीं न तरी । ठेवो तीही ॥ सर्वेश तो ॥ १ ॥**

( जातो. )

कांता:—( स्वतःशीं ) रघुनाथाची मूर्ति माझा सारा आनंद बरोबर घेऊन गेली !

[ चाल–कैसी है धूम मचाई० ]

**रात्रचि भीषण झाली । वाटे दीप्ति निमाली ॥ ध्रु० ॥ नाथमुखासह निघुनी वेगें रवि देशांतरिं जाई । आयुस्तेजोज्ञानचिदादिक जाइ सर्व सेनाही ॥ १ ॥**

आतां रघुनाथ पुन्हां दिसणार नाहीं, आणि त्याचे गोड शब्दहि ऐकायला मिळणार नाहींत! आतां मी कोणाबरोबर हंसत बसूं, कोणावर रुसूं ? कोण माझी समजूत घालील ? आपल्या सांनिध्यानें माझें सुख कोण दुप्पट करील, आणि माझें दुःख कोण विभागून टाकील ? सारें जग मला ओसाड आणि भयाण झाल्यासारखें वाटतें. परलोकासंबंधानें दुःखाची इतकी खात्री तरी नसते. तो परदेशीं निघून गेला, तशी मी परलोकीं जाऊं का ? मी आजपर्यंत प्रत्येक गोष्टींत त्याचें अनुकरण करीत गेलें, मग याच गोष्टींत कां नये करूं ? शिवाय त्याच्या विरहांत मी जिवंत रहाणार नाहीं असें जें मीं त्याला म्हटलें होतें, तेंहि माझ्या मरणानें खरें झाल्यासारखें होईल. मी कालनिद्रा पत्करूनहि वचनाला जागलें तर माझ्या सत्यनिष्ठ रघुनाथाला तें मनापासून आवडेल. मी मेल्यानें कोणासहि दुःख होणार नाहीं. आईला तर वाटेंतला कांटाच गेल्यासारखें होईल. तिनें मला आधींच तिलांजलि दिली आहे. बरें, प्राण द्यायचाच, तर तो द्यावा तरी कशानें ? दोरीचा फांस लावून, पाण्यांत बुडून किंवा आगीनें

जळून मेलें तर माझा चेहरा विद्रूप होईल. जो चेहरा रघुनाथाचा इतका आवडता तो मेल्यावरहि तसाच राहिला पाहिजे. कांहीं विषें अशीं असतात कीं, तीं प्राणज्योति तावडतोब मालवितात, पण चेहऱ्यावरील तेज कायमच ठेवितात. चौकशी केली पाहिजे. कोण आहे तिकडे ?

**कौस०:**—( प्रवेश करून ) मी हाय रगूची आई.

**कांता:**—अजून गेलां नाहींत तर ?

**कौस०:**—रगू नानासाबांची गाट घ्येतुया.

**कांता:**—( स्वतःशीं ) वा ! फारच छान झालें ! जिनें रघुनाथाला जन्म दिला तिच्याच हातून मला मरण आलें पाहिजे. ( उघड ) कौसल्याबाई, तुम्हांला झाडपाल्यांचीं औषधें बरींच माहित असतील ?

**कौस०:**—व्हय व्हय ! अक्षी व्होवी इत्की !

**कांता:**—औषधांप्रमाणें विषेंहि बरींच माहित असतील ?

**कौस०:**-व्हय! मायंदाळी! येक इख तर म्या माज्यासाटी तयार क्येलया. रगू आज रातच्या पारी न निगल तर इख पिऊनशेनी परान घ्येयाचा !

**कांता:**—-पण त्यानें चेहरा विद्रूप होत असेल ?

**कौस०:**—आन् त्यो कशापायी ? अस इख मी तरी काम्हून घ्येऊ ? माज त्वांड अक्षी रगूवानी हाय बगा. त्ये मी इद्रूप व्हऊ द्येईन म्हंगतीस ? त्ये सोडूनशेनी द्ये.

**कांता:**—त्या विषावर एखादा उतारा तर नाहीं ना ?

**कौस०:**—उतारां वितारा काई न्हाई. न्हाई तर मनुक्षान इख प्येव आन् भलत्या मानसानी त्येच्यावर वखाद द्येऊनशानी फिसकटाव.

**कांता:**—पाहूं पाहूं बरें तें विष ?

**कौस०:**—( पदराखालून विषाचा पेला काढून ) ह्ये बग.

**कांता:**—( स्वतःशीं ) परलोकीं जायचें वाहनच हें ! अंतर इतकेंच कीं, आपणाला या वाहनांत बसावें न लागतां त्यालाच आपल्या उदरांत ठेवावें लागतें ! ( पेला तोंडाशीं नेऊन पिऊं लागते. )

**कौस०:**—हां, हां, ह्ये काय ? माझ्यावर इनाकारन यईल न्हव संशव ?

**कांता:**—( विषाचा कांहीं भाग प्याल्यावर पेला खालीं ठेवून ) खरेंच,

मला त्याचा आधीं बंदोबस्त केला पाहिजे. मी करीत असलेल्या या आत्महत्येंत इतर कोणाचाहि संबंध नाहीं असा कबुली जबाबच मी लिहून ठेवितें, म्हणजे तुम्हांला कांहीं त्रास पोंचणार नाहीं. आणा पाहूं लिहिण्याचें साहित्य. उरलेलें विष मागाहून घेईन.

कौस०:—( साहित्य आणून देऊन स्वतःशीं ) आता आपुनबी हतन झटकाव. कोनी आल तर माजाच संशव घ्येईल. ( जाते. )

( पडदा पडतो. )

---

# प्रवेश ८ वा.

[ उद्धवराव व रघुनाथ. ]

उद्धव०:—माझ्या भोंवतालचीं सारीं माणसें याप्रमाणें एकापेक्षां एक अपूर्व स्वार्थत्याग करीत असतां मींच काय तें त्या सर्वांचा फायदा घेत आत्महितांत रत होऊन बसावें म्हणतोस? छेः, तें नाहीं होणार! कांता तुझ्याकरितां आपले पूर्वग्रह बाजूला ठेविते, मालती मुलीच्या शाश्वत सुखाकरितां शाश्वत दुर्गति पत्करायला तयार होते, तूं माझ्या सुखाकरितां स्वतःच्या सुखावर लाथ मारितोस आणि कांतेलाहि स्वसुखावर पाणी सोडण्याला तयार करितोस! तुमच्या सुखाची आह्मीं तरतूद करायची का आमच्या सुखाचें मूल्य तुह्मांला भरायला लावायचें? रघुनाथ, तूं तरी माझ्या नीतिमत्तेची चांगलीच कल्पना करून ठेविली आहेस म्हणायची! अरे, तुह्मांमध्यें कायमचा बिघाड झाला असें जेव्हां मला वाटलें तेव्हांच मीं मालतीबाईच्या बोलण्याला रुकार दिला. असो, अजून सुद्धां फारसें बिघडलें नाहीं. एक लग्न मोडायचें आणि दुसरें जोडायचें इतकेंच काय तें!

रघु०:—बाबा, आपण आजपर्यंत मजवर जे अनंत उपकार केले आहेत त्यांची किंचित् फेड थोड्याशा स्वार्थत्यागानें करण्याचा माझा विचार होता. पण तेंहि समाधान आपण मला प्राप्त होऊं देत नाहीं.

उद्धव०:—अनंत उपकार! रघुनाथ, मीं तुजवर जे उपकार केल्या-

सारखे तुला वाटतात ते माझ्या निराशेच्या प्रतिकारार्थ केले, आणि तुझ्या मनोहर लीलांनीं त्यांची आधींच फेड केली आहे. थोडासा स्वार्थत्याग! वेड्या, तुझ्या आयुष्यास नुकतीच कोठें सुरुवात झाली आहे. सुदैवानें कांतेसारखी अलोट प्रेम करणारी सहचरी तुला मिळण्यासारखी आहे. तिचें प्रेम झुगारून देऊन साऱ्या आयुष्याची माती करणें म्हणजे थोडासाच स्वार्थत्याग झाला वाटतें? मग माझा स्वार्थत्याग तर फारच थोडा आहे. कारण माझें उरलेलें आयुष्यहि थोडें, आणि मालतीबाई सुद्धां प्रेमाखातर विवाहाला तयार झाल्या नसून मुलीच्या हिताकरितां झालेल्या. अर्थात् हा स्वार्थत्याग केल्यानें माझें विशेष नुकसान होण्यासारखें नाहींच. मग तूं त्याला आड कां यावें? बरें, तूं स्वतःच्या सुखाचा त्याग करण्याला मुखत्यार आहेस. पण तुझ्याबरोबर कांतेलाहि दुःखकर्दमांत कां ओढतोस? ती तुजवर इतकें प्रेम करिते हा तिचा अपराध कीं काय? तूं पुढें हो, आणि कांतेला ही वार्ता सांगून टवटवीत कर. मी तुझ्या मागोमाग येऊन मालतीबाईंना पुनर्विवाहाच्या आपत्तींतून मोकळें आणि साधल्यास तुमच्या लग्नाला अनुकूलहि करितों.

रघु०:—जशी आपली इच्छा.

(रघुनाथ एका बाजूनें व उद्धवराव दुसऱ्या बाजूनें जातात.)

---

## प्रवेश ९ वा.

[कांता विव्हळत पडली आहे.]

कांताः—(स्वतःशीं) मीं थोडेंच विष घेतलें; पण अंगाचा नुसता भडका उडाला आहे! बाकी रघुनाथावांचून आयुष्य कंठण्यापेक्षां हा शतपट पुरवला! या यातना आणखी फारच थोडा वेळ सोसाव्या लागतील; पण नंतर मी दुःखांतून कायमची सुटेन. पेल्यांतील उरलेलें विष प्यायलें तर या यातनांचें आयुष्य आणखीहि संपुष्टांत आणितां येईल. पण माझे हातपायच आंखडून गेले आहेत, आणि थरथर कांपत आहेत.

आतां काय करूं ? पत्र लिहिण्यापूर्वीं विष कपाटामागें लपविण्याची मला कुठून बुद्धि झाली कुणास ठाऊक! कौसल्याबाई, हें उरलेलें विष मला पाजाहो! नाहीं तर थंडगार पाणी तरी घशांत ओता! रघुनाथ! रघुनाथ! तूं कुठें गेलास? धांव लवकर! तुझी कांता परलोकीं चालली! अहाहा! रघुनाथाचें नांव घेतांच थोडासा आराम वाटला. या नांवानें शंकराच्या हालाहलाला सुद्धां अमृत बनविलें; मग या विषाची ती काय कथा! अग आईग! पुन्हां विषानें उचल खाल्ली! माझ्या निंदेनें तें चिडून गेलें कीं काय? रघुनाथ! रघुनाथ!

**रघुनाथ** ( प्रवेश करून ):—कांते, कांते, आपले हेतु सफल झाले! बाबांनीं स्वतःच्या पुनर्विवाहाचा विचार रहित करून आपल्या लग्नाचा आग्रह धरिला आहे!

**कांता**:—(आनंदानें) हें ऐकायला मी जगलें हें माझें केवढें भाग्य! पण हाय हाय! फार उशीर झाला! रघुनाथ, घाई कर, उपाध्यायाला बोलाव, मंगलाष्टकें म्हणायला सांग. मुहूर्त फार जवळ आला!

**रघु०**:—कांते, असें वेड्यासारखें काय करतेस! आनंदानें वेडी झालीस का?

**कांता**:—नाहीं, रघुनाथ, नाहीं. पण तुला कळलें कीं तूं मात्र दुःखानें वेडा होशील.

**रघु०**:—कांते, सांग लवकर काय झालें तें.

**कांता**:—रघुनाथ, तुझ्या आनंदांत मी विरजण कसें घालूं? तुला पुढें मागें सारें कळेलच. पण तोंपर्यंत तरी मी तुझ्या सुखांत व्यत्यय आणणार नाहीं. रघुनाथ, मला कांहीं झालें नाहीं. गड्या, माझ्यापाशीं बसून चार प्रेमाचे शब्द बोल. माझ्या गळ्यांत हात घाल, म्हणजे मला बरें वाटेल. आतां आपण पुन्हां वधूवर झालों ना? मग असा संकोच कशाला करितोस?

**रघु०**:—( चोहोंकडे पाहून ) हा कागद कसला पडला आहे? ( कागद वाचून ) काय? तूं विष प्यालीस? खरें का हें? ( कांता मान हलविते. ) छेः, मला नाहीं हें खरें वाटत. आपल्या ओंठांशीं सुखाचा पेला आला असतां दैव तो हिसकावून तुझ्या ओंठांशीं विषाचा पेला

लावील? इतकें निर्दय तें खास होणार नाहीं. कांते, मी जाईपर्यंत तरी वाट पहायची होतीस. मी तिकडे बाबांची अमृततुल्य वाणी ऐकत होतों, तेव्हां तूं इकडे विष पीत बसली होतीस! कांते, सांग. तुला विष कोणीं आणून दिलें? त्याला त्याजवरील उताराहि माहित असेल.

कांताः—त्या माणसाचें नांव न सांगण्याचें मीं त्याला वचन दिलें आहे.

रघु०:—मग त्या विषावरचा उतारा कसा कळणार? कांते, बोल लवकर; एक एक क्षण पृथ्वीच्या मोलाचा आहे. तें दुष्ट विष तरी कुठें आहे पाहूं दे. वैद्याला बोलाविलें म्हणजे तो त्याजवरील उतारा शोधून काढील.

कांताः—रघुनाथ, या विषावर उतारा नाहीं अशी खात्री झाल्याबरच मीं तें घेतलें आहे. तुला खोटें वाटत असेल तर ही नाडी पहा. तूं वैद्याला आणीपर्यंत निश्चल होईल; आणि मला मरतांना तुझा गोड सहवास मिळायचा त्यालाहि मी अंतरेन. त्या सहवासाचा आतां मी मनमुराद उपयोग करून घेणार. प्रिया,–असा दचकलास कां? नाटकांतल्या नायिका आपल्या प्रियतमांस ज्या गोड नांवांनीं हांक मारितात तींच नांवें मी तुला अखेरपर्यंत देणार आहें. मी आतां जे जे वेडेचार करीन त्यांच्या आड येऊं नकोस. मघांशीं आपण बहीणभावंडें म्हणून भेटलों तेव्हांची माझी एक अतृप्त इच्छा राहिली आहे. करशील का ती पूर्ण? करशील ना?

रघु०:—कांते, प्रियतमे, मी तुझ्या सेवेला सादर आहें. काय वाटेल ती आज्ञा कर.

कांताः—मला ती इच्छा सांगायला लाज वाटते, गडे. पण एक एक क्षण मोलाचा आहे. तुझे ओंठ माझ्या ओंठाजवळ आण आणि—

रघु०:—तुझें चुंबन घेऊं का, कांते?

कांताः—नको, नको, रघुनाथ! माझ्या ओंठांना स्पर्शहि करूं नकोस.

रघु०:—हो, खरेंच, विसरलों मी! ब्राह्मणकन्या मरतांना तिच्या ओंठांना शूद्राच्या ओंठांचा स्पर्श होऊं देतां उपयोग नाहीं.

कांताः—नाहीं नाहीं! तें कारण नाहीं! रघुनाथ, कृपा कर आणि



**मालती**:—म्हणजे झालें तरी काय ?                    [ अंक ३ रा. प्रवेश ९ वा. पान ११२

कौस०:—(विषाचा पेला हातांत घेऊन स्वतःशीं) ह्ये न्हायल्याल इख ही न्हाई प्येली तर मंग ? प्येली असती तर ह्येच्या अदुगर तिचा परानबी ग्येला असता. मंग ह्ये कोन प्येल ?

कांताः—अग आई ग ! प्राण अगदीं व्याकुळ झाला !

माल०:—पोर कशी तडफडते आहे पहा ! बघवत मुद्धां नाहीं. कांते, पाणी देऊं का ? ( कांता मान हलविते ) माझ्या हातचें पाणी सुद्धां नको ना ? पण तुझ्याकडे काय बोल ? मी चांडाळीण तुझ्याशीं वागलेंच तशी ! मला क्षमा कर. कांते, तुझा जीव घुटमळतो आहे. बोल तरी तुझी शेवटची इच्छा !

कांताः—रघुनाथ —

माल०:—कांते, हा पहा रघुनाथ जवळच आहे अगबाई ! पण हा असा आळोखेपिळोखे काय देतो आहे!

कौस०:—मालतीबाई ! माजा सत्यानास जाला ! माजा बाळ त्ये न्हायल्याल इख प्येला ! देवाचा अन्यावं त्यो चुकनार कसा !

रघु०:—आतां यापुढें दम निघत नाहीं. अंगाची काहली झाली !

उद्धव०:—बाळा, काय केलेंस हें !

[ चाल—धांव सख्या माधवा० ]

**जासि कसा त्यजुनी । स्वजनां सकलां एकाएकीं विजनीं**
**या विपिनीं ॥ ध्रु० ॥ मातापितरें शोधित आलीं । कृत-**
**कार्य तुला बघुनी झालीं । जाउनि का विरहीं या कालीं ।**
**लोटिशि त्यां फिरुनी ॥ १ ॥**

बाळा, मजवर रागावलास का ?

रघु०:—बाबा, आपण मला सुखमंदिराच्या कळसावर बसवूं लागलां होतां. आपणावर मी रागावूं ?

कांताः—नानासाहेब, मी त्याला माझ्या विषारी ओंठांना ओंठ लावूं देत नव्हतें, म्हणून तो हें विष पिऊन गेला

कौस०:—मी त्येची आईन् त्येला इख चारलं !

दश०:—राकेसनी, काय क्येलस ह्ये ! बाळासाब, काय न तुमची ही गत !

कल्या०:—बाळासाहेब, आह्मांला सोडून चाललांत ना ?

रघु०:—आई, केवळ मत्सरामुळें तूं हें केलेंस.

कौस०:—रगू, माजी माया ही छिनून घ्येया लागली, म्हून मी ह्ये चंगाळ काम क्येल.

रघु०:—करूनसवरून वर प्रतिष्ठा सांगते आहे! चांडाळणी, तुला इचा मत्सर करण्याचा काय अधिकार होता ? तुझ्या आणि इच्यामध्यें कांहीं साम्य तरी ? ही स्वर्गींची अप्सरा, आणि तूं मसणवटींतील हडळ! तूं मला जन्म दिलास, तेवढ्याच्या जोरावर माझ्या प्राणांचा प्राण हिरावून न्यायला तुला लाज वाटली नाहीं ?

कांता—रघुनाथ, मीं यांच्यापासून विष मागून घेतलें तेव्हां मी तें घेणार हें यांना माहितहि नव्हतें. यांचा कांहीं दोष नाहीं. त्यांतून या तुझ्या मातुश्री आहेत याची मीं तुला आठवण दिली पाहिजे का ? मरणकालीं आपण क्षमाशीलच झालें पाहिजे.

रघु०:—खरेंच, या विषाच्या वेदनांच्या भरांत मी हे किती तरी कठोर शब्द बोलून गेलों! कांते, मी कर्तव्यच्युत झालों असतां तूंच मला सावध केलेंस ना! आपण आतां यापुढें स्वर्गाच्या वाटेवर आणि स्वर्गलोकीं अशीच एकमेकांस मदत केली पाहिजे. आई, मी चांडाळ तुला बेसावधपणानें मनास येईल तें बोलून गेलों, त्याची मला क्षमा कर.

कौस०:—रगू, तुज ग्वाड संबूद आता ऐकाया न्हाईना गवसायच ?

रघु०:—आई, अंगांची लाही लाही होत आहे. काय करूं ?

कौस०:—सोनल्या, तुला पानी घेऊ का आनून ?

रघु०:—नको नको, पाणी आणायची तसदी कशाला उगीच! या आगीवर एकच उपाय आहे.

माल०:—मघांशीं कांतेनेंहि पाणी नाकारलें. मुलांच्या मनांत काय आहे कुणास ठाऊक !

उद्धव०:—त्यांच्या मनांत जें आहे तें तुह्मांला रुचायचें नाहीं.

माल०:—नानासाहेब, या वेळीं सुद्धां मी आपलें मन दगडासारखेंच ठेवीन का ?

उद्धव०:—आपण आलों तेव्हां रघुनाथ कांतेचें चुंबन घेत होता, त्याला तुह्मीं हरकत ना केलीत ?

माल०:—मला हा प्रकार त्या वेळीं काय माहीत ?

उद्धव०:—या वेळीं त्या उभयतांची तृषा चुंबनाशिवाय कशानेंहि शांत होणार नाहीं.

माल०:—बाळांनो, तुमचें अखेरचें कोडकौतुक आह्मी नाहीं पुरविणार तर कोण पुरवील ? रघुनाथ, आतां लाज बाजूला ठेवून आपल्या बाळमैत्रिणीची शेवटची इच्छा पुरी कर. तिचा जीव घुटमळतो आहे. ( रघुनाथ सरपटत कांतेजवळ जातो व प्राण सोडतो. )

कांता:—हाय हाय ! माझा बालमित्र, माझा प्रिय वल्लभ, माझा प्राणनाथ तन्हेला असतांच स्वर्गीं निघून गेला ! त्यानें आपले प्राण सुद्धां माझी तहान भागविण्याकरितांच दिले ! नाथा, माझ्या मागाहून विष पिऊन माझ्या अगोदर माझी तर्तूद करण्याकरितांच निघून गेलास ना ? गड्या, आपला संसार लग्नापूर्वींच पुरा झाला ! मंगळाष्टकांपूर्वींच आपल्या आप्तांचे विलाप आपणांस ऐकावे लागत आहेत ! मृत्युशय्या हीच आपली वैवाहिक शय्या आणि एकत्र मरणें हेंच आपलें विलाससुख ! नाथा, मला तुझ्या चुंबनाची फार तहान लागली आहे रे ! पण गड्या, ती मी शांत करणार नाहीं. ज्या चुंबनांत तुला सुख मिळण्यासारखें नाहीं, तें मलाहि नको. आतां हे इहलोकींचे विलासोपभोग पुरेत ! आतां स्वर्गीं राहूनच चुंबनाचें अमृत व अमृताचें चुंबन घेऊं. ही मी आलें पहा !

( प्राण सोडिते. )

दश०:—कारबारनी, ह्यो पग तुज्या लांड्या कारबाराचा परनाम ! ह्येना इख चारल्याबदली तूच इख खाऊन परान दिला असतास तर काय दुनिया डुबली असती ?

कौस०:—मला परान द्येयाला इख खाया नग. माजी माया इत्की मोटी हाय की इखाबिगरबी ह्यो जीव निगून चाललाया. अर माज्या रगू ! आमी तुला दुनियाभर धुंडल! आन् गवासला न गवासलास तवाच आमावर रागाऊनशेनी निगूनबी ग्येलास ! रगू, तुज्या पाटुपाट म्या सरग गाटला तर न्हाईना माज्यावर राग करनार ? तत मी या पोरीसंग न्हाई

भांडायची ! मग तर जाल ? जेवा ! माझ्या रगूसंग मलाबी न्ये आपल्या पायाशी. (धाडकन् पडते व प्राण सोडते.)

उद्धवः—हरहर ! तीन अत्यंत प्रेमळ आत्मे पहातां पहातां निघून गेले. प्रेमाच्या जोडीला मत्सराचें वास्तव्य नसतें तर आज या जागेला स्मशानभूमीचें स्वरूप न येतां उत्सवभूमीचें आलें असतें. पण ईश्वराच्या कृतींत याप्रमाणें दोष काढण्यापेक्षां गुलाबाचा कांट्यासह, सुखाचा दुःखासह व प्रेमाचा मत्सरासह स्वीकार करून त्यास धन्यवाद देणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे.

[चाल—भोरइ निंदिया जगाइ०]

प्रभु जें भाग्य नरा दे भावें । सादर त्यासि असावें ॥ ध्रु० ॥
अनंत त्याची सृष्टि न तिजला । मर्यादित दृष्टिनें पहावें ॥१॥
परमसुखद योजना तयाची । या श्रद्धेसि धरावें ॥ २ ॥

(पडदा पडतो.)

---

समाप्त.

[illegible] ... सार्वजनिक वाचनालय
[illegible] ... दि ........
[illegible] ... ........
IRBK-0100261